
## ।। जयजय रघुवीर समर्थ ।।

यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।

आधी तें करावें कर्म ।
कर्ममार्गे उपासना ।

शरीरा सारिखे यंत्र
आणीक नाहीं ।



विवेकाचे फळ तें सुख ।

आधीं प्रपंच करावा नेटका ।
मग घ्यावें परमार्थ विवेका ।

प्रपंची जो सावधान ।
तो परमार्थ करील जाण ।

# दासबोध प्रवेश (भावार्थासह)

## श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)

उपक्रमाची सुरवात इ.स. १९७९

संपादक : श्री. द्वा. वा. केळकर

**''पत्रद्वारा दासबोध'' अभ्यासार्थींसाठी माहिती** : १) २१ वर्षांवरील कोणासही या उपक्रमात प्रवेश दिला जातो. (तरुण आणि प्रौढांसाठीच हा अभ्यासक्रम असल्याने वयाची अट महत्त्वाची आहे. २) नवीन अभ्यासार्थींना जानेवारी ते १ मार्चपर्यंत प्रवेश दिला जातो. ३) या उपक्रमात भाग घेण्यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. यातील पहिली प्रश्नपत्रिका सोडवून तो स्वाध्याय आपल्या विभागाच्या केंद्रप्रमुखाकडे पाठवावा.

**स्वाध्याय कोठे पाठवावा -** आपण ज्या विभागात राहतो त्यासाठी असलेल्या खालीलपैकी केंद्राकडेच पहिला स्वाध्याय पाठवावा. उत्तरासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीटच पाठवावे. (अंतर्देशीय किंवा कार्ड पाठवू नये) खालीलपैकी योग्य केंद्राचा पत्ता लिहून स्वाध्याय पाठवावा. सोबत प्रवेशपत्रिका त्यातील मजकूर लिहून पाठवावी. डाव्या कोपऱ्यात प्रेषकाने स्वतःचा पत्ता लिहावा.

## विभाग व केंद्रसंचालकांचे पत्ते


**एकत्रित आवृती ३ री**
चैत्र शु. ९, शके १९३७
श्री रामनवमी
दि. २८ मार्च २०१५
मूल्य : २० रुपये फक्त

**प्रकाशक व पत्रव्यवहाराचा पत्ता :**
श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) २०४, श्रीसमर्थ को-ऑप. हौसिंग सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, एरंडवणे, पुणे - ४११ ००४.
अध्यक्ष : **श्री. गानू**
मो. ०९६०४३०२९९८

**मुद्रक :**
के. जोशी आणि कंपनी
ऑफसेट प्रिन्टर्स
भिकारदास मारुती मंदिराजवळ, सदाशिव पेठ, पुणे ३०.
फोन : ०२०-२४४७१४०९
ई-मेल : kjoshipress@gmail.com


**विशेष सूचना :**
पुस्तकांच्या जास्त प्रती साध्या बुकपोस्टाने गहाळ होतात म्हणून खालील पत्त्यावरुन त्या रजिस्टर्ड पोस्टानेच मागवाव्या. त्यासाठी रजिस्ट्रेशनचे रु. २०/- अधिक पाठवावे.

**मागविण्याचा पत्ता :**
प्रकाशन विभाग प्रमुख,
श्रीसमर्थ सेवा मंडळ,
सज्जनगड,
जि. सातारा - ४१५ ०१३.
फोन : ०२१६२-२७८०१९

| | |
|---|---|
| १) जि. पुणे, अहमदनगर | सौ. यशस्विनी मुकुंद केंदूरकर, केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.', श्रीसमर्थ सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे - ४११००४. मो. : ०९४२२३३४८८३ |
| २) संपूर्ण मुंबई महानगर आणि नवी मुंबई | श्रीमती रत्नप्रभा जोशी, केंद्रसंचालक 'श्री. दा. अ.', ४३/३ 'साधना' टी. पी. एस् ६, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०००५४. फोन :(०२२) २६१४६२९५ मो. ०९८१९८२४५४३ |
| ३) जि. रायगड, ठाणे | सौ. नीलम सुहास जोशी, केंद्रसंचालक श्री.दा.अ. २०१ आदित्यवैभव, श्रीगजाननमहाराज मंदिरासमोर, कुळगाव, बदलापूर (पूर्व) जि. ठाणे -४२१५०३ (०२५१)२६९१२२४, ०९४२३९८८७३६ |
| ४) जि. सातारा, सोलापूर | श्री. अनंत विश्वनाथ बोधे, केंद्रसंचालक. श्री. दा. अ. ए - १० आण्णा नांगरे नगर, कृष्णा कॅनॉल, विद्यानगर, कराड, जि. सातारा - ४१५१२४. मो. ०९६०४४३३५२३ |
| ५) जि. जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार | डॉ. सुरेश रामदास पाठक, केंद्रसंचालक 'श्री. दा. अ.', ''स्वामीकृपा'', ५६, प्रधानपार्क, दुसरा मजला, म. गांधी रोड, नाशिक - ४२२००१. फोन : (०२५३)२५८०३८३ मो. ०९८६०४१९०१७ |
| ६)जि.औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, बीड, लातूर | सौ. ज्योती प्रमोद चिटगोपेकर, केंद्रसंचालक 'श्री. दा. अ.' , प्लॉट नं. १८१, समर्थनगर, ''प्रज्योत'', औरंगाबाद ४३१००१ फोन नं.- (०२४०) २३३०७८२ मो. ०९४०३१२५१२५ |
| ७) जि. वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली | श्री. रमेश वासुदेव फडके, केंद्रसंचालक, श्री. दा. अ. १ - बी, दामोदर हौसिंग लेआऊट आर. पी. टी. एस. रोड, सुरेंद्रनगर, विवेकानंद पोस्ट, नागपूर ४४००१५. फोन : (०७१२) ३२९०४३४ मो. - ०९८५००७०४३४ |
| ८) जि. सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी | सौ. ज्योती कोरबु, केंद्रसंचालक, 'श्री. दा.अ.', कल्याण कुटी, प्लॉट नं. १५, पद्मावती नगर, धामणी रोड, सांगली - ४१६४१६. फोन : (०२३३) २३०१४२४, मो. - ०९४२२६१८२०३ |
| ९) जि. अकोला, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वाशिम | डॉ. श्री. दत्तात्रय व्यंकटराव रत्नाळीकर केंद्रसंचालक 'श्री. दा. अ.', श्रीप्रल्हादकृपा'' अपार्टमेंट, संत ज्ञानेश्वर मार्ग, गड्डम प्लॉट, जठार पेठ, अकोला ४४४००५. फोन : (०७२४) २४११७१४ मो. ०९९२३६०३०४५ |
| १०) संपूर्ण गोवा राज्य आणि जि. सिंधुदुर्ग | डॉ. रा. त्रिं. भागवत, केंद्रसंचालक, 'श्री. दा. अ.', 'श्रीसमर्थकृपा' ६५ वरगांव, माशेल, गोवा ४०३१०७. फोन : (०८३२) २४२८६१४ मो. ०९९७५८५८५०५ |
| ११) मध्यप्रदेश, छत्तीसगड व उत्तर भारत | डॉ. श्रीराम मोरेश्वर रानडे, केंद्रसंचालक, 'श्री. दा. अ.', ए १९/२०, वेदनगर, गणपती मंदिर सामने, उज्जैन, (मध्यप्रदेश) - ४५६०१०. मोबाईल : ०८१२००४९६७३ |
| १२ ) इ-मेल | श्री. सुहास क्षीरसागर, केंद्र संचालक, श्री. दा. अ. dasbodhabhyas@gmail.com मो. : ०९८८१४७६०२० |

## अभ्यासार्थींना व्यावहारिक पण महत्त्वाच्या सूचना

(१) पहिला स्वाध्याय पाठविण्यापूर्वी ग्रंथारंभलक्षण हा **पहिला समास अतिशय सावकाश वाचावा.** नंतर प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे समासातून शोधून लिहावी व स्वाध्याय तयार करावा. वहीची २ पाने (किंवा ४ पृष्ठे) इतकाच मजकूर अपेक्षित आहे. **स्थळप्रत (कार्बन प्रत) स्वत:पाशी ठेवावी.**

(२) शुद्धलेखनाचे सुधारित नियम पाळावे. मात्र दासबोधातील ओवी लिहिताना मूळ ओवीप्रमाणेच ऱ्हस्व, दीर्घ वा अनुस्वार लिहावेत. स्वाध्यायामध्ये प्रश्नक्रमांकच फक्त लिहावेत, प्रश्न लिहू नयेत.

(३) नंतर पहिला पक्का स्वाध्याय लिहिल्यावर **प्रवेश-पत्रिका भरावी.** पूर्ण नाव लिहिणे आवश्यक असते. वय, शिक्षण व व्यवसाय ही माहिती नीट भरावी. पहिला स्वाध्याय पाठविताना पोस्टाची दोन पाकिटे लागतात. **एका पाकिटावर केंद्र प्रमुखाचा पत्ता** लिहावा. कोणताही पत्ता लिहिताना त्या गावचा पोस्टल पिनक्रमांक लिहिलाच पाहिजे. आपल्या विभागाच्या केंद्रचालकांचे पत्ते मुखपृष्ठाचे आतील बाजूस दिले आहेत. तेथे स्वाध्याय पाठविताना पोस्टाच्या पाकिटावर डाव्या बाजूच्या कोपऱ्यात 'प्रेषक' म्हणून स्वत:चे नाव आणि पत्ता लिहिण्याची आवश्यकता असते. **दुसऱ्या पाकिटावर स्वत:चा पत्ता** लिहून ते घडी घालून केंद्रप्रमुखाच्या पाकिटात घालावे. पहिल्या स्वाध्यायासमवेत **स्वत:चा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीटच** अभ्यासार्थीने पाठवावयाचे आहे.

(४) पहिला स्वाध्याय पाठविल्यावर आपणास **अभ्यासार्थी क्रमांक** आणि भावी काळात ज्यांच्याकडे स्वाध्याय पाठवावयाचे त्या समीक्षकाचे नाव आणि पत्ता कळविला जाईल. त्याच पत्त्यावर पुढील स्वाध्याय पाठवावेत.

(५) पुढील स्वाध्याय पाठविताना स्वत:चा पत्ता लिहिलेले अंतर्देशीय पत्र स्वाध्यायासमवेत समीक्षणासाठी पाठवावे. प्रत्येक वेळी निदान चार ओळीचे तरी पोहोचपत्र समीक्षकांना लिहावे.

(६) दरमहा एकच स्वाध्याय पाठवावा. **अभ्यासक्रम एक वर्षाचा आहे. तो गडबडीने पूर्ण करावयाचा नाही.** फक्त सप्टेंबरमध्ये २ स्वाध्याय पाठवावे.

(७) **'दा. प्रवेश' नंतर 'दा. परिचय' त्यानंतर 'दा. प्रबोध' असे पुढील स्वाध्याय, क्रमाक्रमाने पूर्ण करतांना पूर्वीचे जे समीक्षक असतील त्यांच्याकडेच पाठवावेत.** यासंबंधात आपली कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर "सौ. यशस्विनी केंदूरकर, संचालक 'श्री.दा.अ.' श्रीसमर्थ हौसिंग सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, पुणे ४११ ००४" या पत्त्यावर जबाबी जोडकार्डच पाठवावे. **जोडकार्डाला पीन मारणे किंवा टाका घालणे जरूर आहे.** (असे न केल्यास 'जबाबी' कार्डावरही बहुधा शिक्का पडतो, ते रद्द होते.)

**समीक्षकांची भूमिका : –** 'श्री. दा. अ.' उपक्रमातील सर्व समीक्षक, केवळ 'समर्थ-सेवा' भावनेने, निरपेक्षपणे, निरहंकारी वृत्तीने काम करीत आहेत. स्वाध्याय तपासण्यास आपण कोणी ज्ञाते आहोत म्हणून मार्गदर्शकाचे काम करीत आहोत, ही भूमिका त्यामागे सुतराम नाही, तर अभ्यासार्थींच्या समवेत आपलाही दासबोधाचा अभ्यास वाढावा हीच भावना आहे. सात्त्विक समाधान लाभणे, हा मोबदला सर्वांना लाभतो आहे. या उपक्रमातून दासबोधाची गोडी एकदा लागली की, स्वानुभूती ही ज्याची त्याने उपासनेद्वारे मिळवावयाची आहे. त्यामुळे अभ्यासार्थींची आणि उपक्रमातील सर्व संबंधित यांची, श्रीसमर्थांच्या चरणी प्रार्थना आहे की,

"मला वाटते अंतरी त्वां वसावें । तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें ।
अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा । महाराजया सद्गुरु रामदासा ।।"

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# अनुक्रमणिका


❋ अभ्यासार्थींना व्यावहारिक पण महत्त्वाच्या सूचना पृष्ठ १
❋ प्रास्ताविक पृष्ठ २
❋ 'श्री. दा. अ.' अभ्यासक्रमाचे स्वरूप पृष्ठ ४

| स्वाध्याय क्र. | दशक समासांचा क्रमांक | ओव्या | पृष्ठांक | समासांची नांवे | महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | द. १ – १ | ३८ | ५–१० | ग्रंथारंभ लक्षण | जानेवारी |
| २ | १२ – १ | २० | ११–१४ | विमळ लक्षण | फेब्रुवारी |
| ३ | १२ – २ | ३० | १५–२० | प्रत्ययनिरूपण | मार्च |
| ४ | २ – २ | ४२ | २१–२७ | उत्तम लक्षण | एप्रिल |
| ५ | ११ – ३ | ३० | २९–३३ | सिकवणनिरूपण | मे |
| ६ | ४ – ३ | २५ | ३४–३८ | नामस्मरणभक्ति | जून |
| ७ | १२ – ९ | ३० | ३९–४३ | येत्नसिकवण | जुलै |
| ८ | १२ – १० | ४३ | ४४–५४ | उत्तमपुरूषनिरूपण | ऑगस्ट |
| ९ | १८ – ६ | २२ | ५१–५५ | उत्तमपुरूषनिरूपण } | सप्टेंबर |
| १० | १९ – १० | ३० | ५६–५९ | विवेकलक्षणनिरूपण } | |
| ११ | १४ – ६ | ३३ | ६१–६६ | चातुर्यलक्षण | ऑक्टोबर |
| १२ | २० – १० | ३७ | ६६–७२ | विमळब्रह्मनिरूपण | नोव्हेंबर |
| | **एकूण १२ समास** | **३८० ओव्या** | | | |

❋ दैनंदिन जीवनात दासबोध : स्वयंमूल्यमापन - पृ. ७४
❋ श्री.दा.अ. प्रचारासंबंधाने काही मुद्दे - पृ. ८०
❋ 'श्री.दा.अ.' अभ्यासार्थींसाठी काही आवश्यक माहिती - मलपृष्ठ आतील बाजू
❋ श्री.दा.अ.उपक्रमाचे ब्रीद वाक्य; अभ्यासक्रमास आधारभूत समर्थांची बोधवचने - मलपृष्ठ बाहेरील बाजू
❋ सामूहिक अभ्यास – दासबोध अभ्यास मंडळे


## प्रास्ताविक : पाठ्यपुस्तक व भावार्थच्या एकत्रित आवृत्तीनिमित्ताने

दासबोध प्रवेश (भावार्थासह) या पुस्तकाची ही आवृत्ती असली तरी त्यांत मूळ दासबोध प्रवेश पाठ्यपुस्तक, प्रथम प्रकाशन एप्रिल १९८२ आणि भावार्थ दासबोध प्रवेश, प्रथम प्रकाशन, नोव्हेंबर १९९२ या दोन पुस्तकांचे एकत्रित पुनर्मुद्रणच आहे.

या उपक्रमाचे एकंदर स्वरूप, त्याची सुरुवात, प्रगती, मूळ उद्देश, प्रवेश प्रक्रिया इत्यादींची योग्य कल्पना अभ्यासार्थींना यावी या दृष्टीनेही प्रास्ताविक आहे. समर्थभक्त श्री. द्वा. वा. केळकर यांनी विविध पुनर्मुद्रणांच्या निमित्ताने लिहिलेल्या प्रास्ताविकांतील मुद्द्यांचेच हे केवळ संकलन आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामी (इ.स. १६०८–१६८२) हे आत्मसाक्षात्कारी राष्ट्रसंत होऊन गेले. त्यांनी समाजावर इतके थोर उपकार केले आहेत की, त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना मन भारावून जाते. त्यांचे पुण्यस्मरण करण्याचा खराखुरा एकच मार्ग - तो म्हणजे व्यक्ती व समाज यांची ऐहिक व पारलौकिक उन्नती ज्यामुळे साधते अशा त्यांच्या दासबोध ग्रंथाचा अभ्यास व प्रसार करणे. कै. श्री. शंकर श्रीकृष्ण देव (१८७१–१९५८) यांनी मूळ कल्याणस्वामी (१६२३–१७१४) लिखीत दासबोधप्रत डोमगाव मठ, ता.परांडा, जि. उस्मानाबाद येथून शोधून काढली. त्यानंतरच श्री. देव यांनी ती प्रत मुद्रीत स्वरूपात दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर १९०५ साली सर्वांना उपलब्ध करून दिली.

आत्माराम दासबोध। माझे स्वरूप स्वत: सिद्ध।

असता न करावा खेद। भक्त जनी।। नका करू खटपट। पहा माझा ग्रंथ नीट। तेणें सायुज्याची वाट। गवसेल की।।

असा आदेशही श्रीसमर्थांनी देहत्यागाचे वेळी दिला आहे. त्याला अनुसरून 'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' (प.दा.अ.) हा उपक्रम आदरणीय समर्थभक्त श्री. द्वा. वा. केळकर यांनी १९७९ साली सज्जनगड मासिकाच्या माध्यमातून सुरू केला.

प.दा.अ. उपक्रमाचे पहिले पाठ्यपुस्तक 'दासबोध प्रवेश' हे १९८२ मध्ये तयार करण्यात आले. त्यानंतर डिसेंबर १९८२ मध्ये दुसरे पाठ्यपुस्तक 'दासबोध परिचय' आणि नोव्हेंबर १९८४ मध्ये तिसरे पाठ्यपुस्तक 'दासबोध प्रबोध' हे तयार करण्यात आले. प्रा. के. वि. बेलसरे (१९०९-१९९८) यांनी संपादन केलेल्या सार्थ दासबोधातील समासांच्या सारांशाचा अंतर्भाव या सर्व पाठ्यपुस्तकात करण्यास समर्थ सेवामंडळ, सज्जनगड यांनी अनुमती दिली आणि ते सारांश सर्व पाठ्यपुस्तकांत घेण्यात आले आहेत. समर्थभक्तांच्या उत्स्फूर्त देणग्यांमुळेच ही स्वस्त पुस्तक योजना चालते आहे. परंतु अभ्यासार्थींना अभ्यासासाठी सार्थ दासबोध ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो आणि त्याच्या किंमती मात्र दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच सार्थ दासबोध हा मोठा ग्रंथ हाताळणे अभ्यासार्थींना गैरसोयीचे वाटते म्हणून नोव्हेंबर १९९२ मध्ये भावार्थ दासबोध प्रवेश हे पुस्तक श्री. द्वा. वा. केळकर यांनी काढले. नंतर सप्टेंबर ९६ मध्ये भावार्थ दासबोध परिचय व जानेवारी १९९८ मध्ये भावार्थ दासबोध प्रबोध ही पुस्तकेही स्वस्त पुस्तक योजनेतून काढली गेली. त्यातून अभ्यासार्थींची खूपच सोय झाली.

प.दा.अ. या उपक्रमाची समाप्ती १-४-२००८ रोजी झाली आणि आता श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) हा उपक्रम श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या पुढाकाराने सुरू ठेवण्यात आला आहे. सर्व अभ्यासक्रम प.दा.अ. प्रमाणेच श्री.दा.अ. नावाने पुढे सुरू ठेवण्यास श्री. द्वा. वा. केळकर यांनी आशीर्वादपूर्वक परवानगी दिली याबद्दल श्री.दा.अ. संयोजन समिती श्री. द्वा. वा. केळकर यांची ऋणी आहे.

दासबोध ग्रंथामध्ये एकूण २०० समास आहेत. त्यापैकी फक्त बारा निवडक समासांचा अभ्यास प्रवेश स्तराच्या पहिल्या वर्षात व्हावा लागतो. दर महिन्यात केवळ एका समासाचा अभ्यास करून त्यावर काढण्यात आलेल्या पाच प्रश्नांची उत्तरे अभ्यासार्थींना लिहावयाची असतात. या उत्तरपत्रिकेला स्वाध्याय असे म्हणतात. हे स्वाध्याय सोडविताना पाठ्यपुस्तक आणि भावार्थचे पुस्तक अशा दोन स्वतंत्र पुस्तकांचा आधार घेणे अभ्यासार्थींना थोडेसे अडचणीचे होते. तसेच मूळ समास वाचताना लगेच त्याचा अर्थही डोळ्यासमोर असेल तर आकलनाचे दृष्टीने ते सोयीचे ठरेल म्हणून पाठ्यपुस्तक व भावार्थ यांचे एकत्रित पुस्तक, निदान प्रवेश स्तराचे तरी, काढावे असे श्री.दा.अ. समितीच्या बैठकीत ठरले. मूळ समासातील ओव्या ठळक मोठ्या टाईपमध्ये व एका ओळीत एक ओवी असे घेतल्याने मूळ समासाच्या सलग वाचनातही अडचण येणार नाही अशी योजना व्हावी असेही ठरले.

दासबोध प्रवेश पाठ्यपुस्तकाची आजपर्यंत पंचवीस पुनर्मुद्रणे झाली आहेत तर भावार्थ प्रवेशची १२ पुनर्मुद्रणे झाली आहेत. भावार्थसह दासबोध प्रवेशची पहिली आवृत्ती काढत असताना स्वस्त पुस्तक योजनेनुसार त्याची किंमत मूळ प्रतीच्या किंमतीइतकीच (रु. ३ + रु. ५) रुपये ८ अशी ठेवली होती. आता ती कालमानानुसार २० रु. करावी लागली आहे.

या पत्राद्वारे दासबोध अभ्यास उपक्रमाची आधारभूत सहा सूत्रेच समर्थ हात वर करून सांगत आहेत असे बोधचित्रच मुखपृष्ठासाठी वापरले आहे.

या नव्या आवृत्तीमुळे अभ्यासार्थींची सोय होऊन पहिल्याच वर्षात होणाऱ्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे हा उद्देश या खटपटीमागे आहे.

या उपक्रमात भाग घेण्यासाठी कोणतेही शुल्क नाही. फक्त दुहेरी पोस्टखर्च तेवढा दरमहा आपणास करावा लागणार आहे. **खरे तर आजकाल पोस्टामुळे फारच दिरंगाई होत आहे. अभ्यासार्थींनी दरवेळी २ किंवा ३ स्वाध्याय एकत्रितपणे कुरीयर किंवा स्पीड पोस्टने धाडून हे स्वहिताचे पवित्र कार्य थोडी आर्थिक तोशीश सोसून पूर्ण करणे अधिक स्वहिताचे व शहाणपणाचे आहे. आधुनिक काळाशी सुसंगत** e-mail **द्वारे अभ्यास करण्यासाठी** www.dasbodhabhyas@gmail.com **पहा.** तीन वर्षांच्या या अभ्यासक्रमात दर वर्षानंतर प्रशस्तिपत्र दिले जाते.

या उपक्रमात प्रवेश घेण्यासाठी प्रवेशार्थीने पहिला स्वाध्याय तयार करावा; पुस्तकाच्या प्रारंभी छापलेली प्रवेशपत्रिका भरून (किंवा तो मजकूर एका कागदावर लिहून) ती आपल्या स्वाध्यायाला जोडावी. पोस्टाची दोन पाकिटे आणावीत. एका पाकिटावर स्वत:चा पत्ता लिहून ते पाकिटही स्वाध्यायाबरोबर जोडावे. नंतर आपण ज्या जिल्ह्यात राहतो त्या विभागाच्या केंद्र संचालकांचे नाव व पत्ता दुसऱ्या पाकिटावर लिहून, त्या पाकिटात पहिला स्वाध्याय, प्रवेश पत्रिका, स्वत:च्या पत्त्याचे घडी घातलेले पाकीट घालून, त्या केंद्र संचालकांकडे पाठवावे.

केंद्रसंचालकांकडे आपला स्वाध्याय पोहोचल्यावर त्यांच्याकडून आपणास स्वाध्यायाबद्दल अभिप्राय आणि पुढील स्वाध्याय पाठविण्याचा ˉ समीक्षकांचा पत्ता कळविला जातो. आपणास मार्गदर्शक छापील सूचनाही मिळतात म्हणून पहिल्या स्वाध्यायाबरोबर पोस्टाचे पाकिटच पाठवायचे असते. दुसऱ्या स्वाध्यायाचे वेळी मात्र समीक्षणासाठी स्वत:च्या पत्त्याचे अंतर्देशीय/पोस्टाचे पाकीट पाठवायचे असते.

मानवी जीवनाचे सार्थक करण्याची दिशा देणाऱ्या ग्रंथराज दासबोधासारख्या प्रासादिक व अलौकिक ग्रंथाचा अभ्यास श्री.दा.अ. या उपक्रमातून आपण अवश्य करावा.

या उपक्रमाचे नियोजन आणि प्रसार यांत प.दा.अ. उपक्रमाचे सहसंयोजक कै. डॉ. व. ना. वैद्य (१९१८–२००६) आणि डॉ. श्री. द. देशमुख यांचेही योगदान फार मोलाचे होते. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे.

अंबरनाथच्या कै. अक्का वेलणकर (१९२२–१९९८) यांनी त्यांच्या भागवतसप्ताहातून प.दा.अ.चा प्रसार खूप मोठ्या प्रमाणात, विशेषत्वाने विदर्भात केला. त्यांच्या स्मृतीस अभिवादन.

मुखपृष्ठावरील छायाचित्र संकल्पना समर्थभक्त कै. पां. रं. बरिदे यांची आहे. प.दा.अ. उपक्रमाचे ते निष्ठावान व अभ्यासू कार्यकर्ते होते. त्यांच्याही स्मृतीस आदरपूर्वक अभिवादन.

दासबोध ग्रंथ आणि एकंदरच श्रीसमर्थांचे विचार यांचा हिरीरीने प्रचार करण्याचे काम श्री. सुनीलजी चिंचोलकर नेहमीच करत असतात. त्यांचेही प.दा.अ. उपक्रमातील योगदान फार मोठे आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार.

कै. बन्याबापू गोडबोले(१९१४–१९९८) माजी कार्याध्यक्ष, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड आणि सज्जनगड मासिक पत्रिका यांच्या पूर्ण सहकार्यामुळेच हा उपक्रम कार्यान्वित झाला. अजूनही श्री.दा.अ. उपक्रमाचे संचालन सज्जनगड मासिक पत्रिकेतूनच होते. त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

अनुभवप्राप्तीमुळे माणसाच्या वर्तनामध्ये इष्ट दिशेने घडून येणाऱ्या वर्तनबदलास 'शिकणे' असे म्हणतात. दासबोध हा एक शैक्षणिक ग्रंथ आहे. दासबोध वाचनाच्या फलप्राप्तीमध्ये 'क्रिया पालटे तत्काळ।' याला श्रीसमर्थांनी प्राधान्य दिले आहे. अभ्यासार्थींनी स्वत:च परीक्षा घेऊन आपल्यातील परिवर्तनाचे मोजमाप करण्यासाठी, माजी शिक्षण संचालक मा. श्री. चिपळूणकर यांनी सज्जनगडावरील १९८२ च्या शिबिरात, एक स्वयंमूल्यमापनाची मोजपट्टीच पंचवीस प्रश्नांतून दिली. ती या पुस्तकात दिली आहे. तिच्यामुळे या अभ्यास उपक्रमाला खरी पूर्णता आली आहे. श्री. चिपळूणकरांच्या योगदानाबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद.

'भव्य उत्कट ते ते घ्यावे। मिळमिळीत अवघेचि टाकावे।' असा समर्थांचा दृष्टीकोन होता. झापड बांधलेली सांप्रदायिकता समर्थांना मान्य नाही. दासबोधाचा अभ्यास करीत असतानाच अन्य संतांच्या वाङ्मयाचाही परिचय अभ्यासार्थींना व्हावा ही श्री.दा.अ. उपक्रमाची अपेक्षा आहे. त्यादृष्टीने संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील काही अभंग या पुस्तकात घालावे अशी सूचना डॉ. विक्रम केळकर यांनी केली. अभंग अर्थासह निवडून काढले. प्रवेशस्तरातील समासांना समानार्थी अभंगांचा अंतर्भाव परिशिष्टामध्ये केला आहे. त्यामुळे अभ्यासाला व्यापकता येईल असे वाटते.

समर्थभक्त श्री. द्वा. वा. केळकर यांनी या क्रांतिकारी उपक्रमाची संकल्पना मांडली, कार्यान्वित केली, वाढविली. तीस वर्षे त्यांनी तन मन धनाने सहकुटुंब सहपरिवार या उपक्रमाला वाहून घेतले. त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे हे ऋण समर्थ संप्रदाय आदराने स्मरणात ठेवेल यात शंका नाही.

समर्थभक्तांच्या उत्स्फूर्त देणग्यांमुळेच स्वस्त पुस्तक योजना कार्यान्वित आहे. त्या सर्व देणगीदारांचे सर्व अभ्यासार्थींचे वतीने आभार. श्रीसमर्थचरणी त्यांची सेवा रूजू आहेच.

के. जोशी आणि कंपनी, ऑफसेट प्रिन्टर्स आणि त्यांचे सहकारी मुद्रणाचे सर्व काम, समर्थसेवा या भावनेने, तळमळीने करतात त्यांचेही आभार.

पुस्तकाचा, दासबोध अभ्यासाचा प्रसार वाढावा यासाठी श्रीसमर्थांच्या आशीर्वादाची याचना करुया. सर्व केंद्रसंचालक, प्रचार करणारे समर्थभक्त, अभ्यासार्थी यांना त्यांच्या कामात यश येवो अशी श्रीरामप्रभूंच्या चरणी प्रार्थना करून हे प्रास्ताविक संपवतो.

**– अध्यक्ष, श्री.दा.अ.**

## अभ्यासक्रमाचे स्वरूप

श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) हा अभ्यास उपक्रम माहिती गोळा करण्यासारखा अभ्यास नाही तर तो स्वाध्याय ‐ स्वत:चा अभ्यास ‐ मनन, चिंतन व त्यातून स्वत:चा व्यक्तिमत्व विकास ‐ अशा स्वरूपाचा आहे. त्यातून व्यक्तिमत्व विकासाच्या तीनही अंगांनी प्रगती होणे अपेक्षित आहे. १) स्वत:ची वैयक्तिक क्षमता वाढणे.

२) परस्परावलंबित्वाची योग्य जाणीव निर्माण होऊन सहकार्याची भावना वृद्धिंगत होणे आणि ३) आपल्या नियंत्रणाबाहेर असलेल्या प्राप्त परिस्थितीला धीराने तोंड देण्याची तरीही सकारात्मक अशी मानसिकता निर्माण होणे.

दासबोधामध्ये १० समासांचे २० दशक असून एकूण २०० समास आहेत. त्यातील फक्त १२ समासाची निवड 'दासबोध–प्रवेश' या अभ्यासक्रमासाठी करण्यात आली आहे. अभ्यासार्थींना मूळ ग्रंथ वाचण्यात गोडी वाटावी हा प्रमुख उद्देश अभ्यासक्रम आखताना होता. प्रत्येक समासाचा सारांश व विशेषता पण दिली आहे. अभ्यासार्थींनी ती समजावून घेण्याचा प्रयत्न करावा.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

# श्रीदासबोध

## सांप्रदायिक मंगलाचरण

**गणेशः शारदा चैव सद्‌गुरूः सज्जनस्तथा। आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः।। १।। गणेश शारदा सद्‌गुरू। संत सज्जन कुळेश्वरू। सर्वही माझा रघुवीरू। सद्‌गुरूरूपें।। २।। माझें आराध्य दैवत। परमगुह्य गुह्यातीत। गुह्यपणाची मात। न चले जेथें।। ३।। यो जातो मरूदंशजोक्षितितले संबोधयन् सज्जनान्। ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम्। यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वांतापहारिः सदा। सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः।। ४।। शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें। वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें। कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा।। ५।। मला वाटतें अंतरीं त्वां वसावें। तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें।। अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा। महाराजया सद्‌गुरो रामदासा।। ६।।**

प्रास्ताविक : मंगलाचरणामध्ये श्रीसमर्थांनी श्रीराम या माझ्या दैवतामध्ये गणेश, शारदा, सद्‌गुरु, संतसज्जन, कुळेश्वर या सर्वांचा अंतर्भाव होतो असे म्हटले आहे. त्यामुळे दासबोध या ग्रंथाचा प्रारंभ करताना 'श्रीराम' या एकाच शब्दात त्यांनी सर्वांचे स्मरण करून एकदमच ग्रंथाला प्रारंभ केला आहे. जुन्या शास्त्रीय प्रथेप्रमाणे प्रारंभी नमनासाठी एकही ओवी लिहिलेली नाही. एकदमच ग्रंथाला प्रारंभ झाला आहे. ही विशेषताच आहे. एकदा वाचकांना ग्रंथकर्त्याचा हेतु समजला म्हणजे त्या ग्रंथाचे वाचन करण्याची ओढ त्यांना लागते.

## दासबोध प्रवेश : स्वाध्याय १ ला : दशक १ समास १ : ग्रंथारंभ लक्षण

सारांश : ग्रंथारंभलक्षण, द. १ स. १. हा समास म्हणजे जणू दासबोध ग्रंथाची श्रीसमर्थांनी स्वतःच लिहिलेली प्रस्तावना आहे. त्यात सांगितलेली ग्रंथाची फलश्रुती अत्यंत मार्मिक आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने मनुष्याच्या अंतरंगात बदल घडतो. त्यामुळे त्याची क्रियाच पालटते. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा यात आहे. २८ व्या ओवीपासून ३७ व्या ओवीपर्यंत फलश्रुती वाचल्यानंतर असे आढळून येते की, श्रीसमर्थांची इच्छा अशी होती की, अवनतीला गेलेल्या समाजाला उर्जितावस्था आणण्यासाठी त्यांना येथील माणूस नव्याने घडवावयाचा होता. आजच्या काळातसुद्धा समर्थ विचारांचा माणूस घडविणे ही काळाची मागणी आहे. म्हणून दासबोधाच्या अभ्यासाची गरज आहे.

हा समास प्रस्तावनारूप आहे. आपल्या ग्रंथाचे नाव काय, ग्रंथ लिहिण्याचा हेतू काय, ग्रंथात विवेचिलेले विषय कोणते, ग्रंथाच्या अभ्यासाचे फल काय, ग्रंथातील प्रमेयांना आधार कोणते, इत्यादि गोष्टी श्री समर्थांनी येथे आरंभीच स्पष्टपणे सांगितल्या आहेत.

।। श्रीराम।।

**श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिलें जी येथ। श्रवण केलियानें प्राप्त। काय आहे।।१।।**

ज्या श्रोत्यांसमोर ग्रंथ ठेवला आहे ते लगेचच प्रश्न स्वाभाविकपणेच विचारतात, हा कोणता ग्रंथ आहे?

त्यामध्ये काय सांगितले आहे आणि त्याचे श्रवण केल्यावर आम्हाला फलप्राप्ती काय होईल?

**ग्रंथा नाम दासबोध। गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद[१]। भक्तिमार्ग।।२।।**

श्रीसमर्थ सांगतात - या ग्रंथाचे नाव दासबोध आहे. यात गुरु आणि शिष्य यांचा संवाद आहे. यात भक्तिमार्गाचे सुस्पष्ट विवेचन आहे.

**नवविधा भक्ति[२] आणि ज्ञान। बोलिलें वैराग्याचें लक्षण । बहुधा अध्यात्मनिरोपण। निरोपिलें।।३।।**

दासबोधामध्ये ईश्वरभक्तीचे नऊ मार्ग, ब्रह्मज्ञान तसेच वैराग्याचे लक्षण सांगितले आहे. बहुधा नाना प्रकारांनी अध्यात्मनिरूपण केले आहे. (यातून आणखी एक अर्थ निघतो की इतरही अनुषंगिक विषय ग्रंथात आहेत. पण अध्यात्म हाच प्रमुख विषय आहे. इतर विषयात मूर्खलक्षणे, लेखन प्रक्रिया, राजकारण, नि:स्पृहव्याप, इत्यादि कितीतरी विषय आले आहेत.)

**भक्तिचेन योगें देव। निश्चये पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं।।४।।**

माणसाला भक्तिमार्गानेच ईश्वराची प्राप्ती निश्चितपणे होते असा या ग्रंथाचा अभिप्राय आहे. (दासबोधाचा प्रधान सिद्धान्त कोणता, तोच या ओवीमध्ये सांगितला आहे.)

**मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्धज्ञानाचा निश्चयो । आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ।।५।।**

(कोणत्या गोष्टींचे सुस्पष्ट विवेचन ग्रंथात आहे; ते यानंतरच्या ७ ओव्यांमध्ये सांगतात.) ज्या भक्तीमुळे ईश्वरप्राप्ती होते तीच मुख्य आहे. तिचे निश्चित स्वरूप, शुद्ध ज्ञान कोणते, आत्मस्थिती म्हणजे काय, यांचेही संदेह निवळून टाकणारे विवेचन ग्रंथात सांगितले आहे. (अध्यात्मामध्ये आत्मानुभव देणाऱ्या ज्ञानालाच शुद्ध ज्ञान किंवा ज्ञान ही संज्ञा आहे.)

ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान।
पाहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान।। ५-६-१।।

ओवीनंतर ५-६-१ असे ३ अंक लिहिले असता त्यांचा अर्थ दशक ५ समास ६ मधील १ ली ओवी असा आहे. नव्यानेच दासबोधाचा अभ्यास करणाऱ्यांना ही माहिती आवश्यक आहे. या पुस्तकात अनेक ठिकाणी असे आकडे ओवीनंतर दिलेले आढळतील.

**शुद्ध उपदेशाचा निश्चयो। सायोज्यमुक्तीचा निश्चयो। मोक्षप्राप्तीचा निश्चयो। बोलिला असे।।६।।**

शुद्ध उपदेश, सायुज्य मुक्ती, मोक्षप्राप्तीचे लक्षण यांचे निश्चित स्वरूपात निरूपण यात आहे. (मुक्तीचे चार प्रकार आहेत - स्वलोकता, समीपता, स्वरूपता आणि सायुज्यता. त्यातील पहिल्या तीन मुक्ती अशाश्वत असून फक्त सायुज्यमुक्ती शाश्वत असल्याचे द. ४-१०-२७ मध्ये सांगितले आहे. अधिक माहितीसाठी द. ४-१० जरूर तर पहावा.)

**शुद्ध स्वरूपाचा निश्चयो। विदेहस्थितीचा निश्चयो। अलिप्तपणाचा निश्चयो। बोलिला असे।।७।।**

शुद्ध आत्मस्वरूप कसे असते, विदेह अवस्था कशी असते, अलिप्तपणाचा नेमका अर्थ काय हे यात सांगितले आहे.

---

१) विशद - स्पष्ट २) नवविधाभक्ति - श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, पूजन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन

**मुख्य देवाचा निश्चयो। मुख्य भक्ताचा निश्चयो। जीवशिवाचा निश्चयो। बोलिला असे।।८।।**

मुख्य देव (किंवा परब्रह्म) कोणता, खरा भक्त कोणास म्हणावे, जीव आणि शिव यांचे संबंधात सुस्पष्ट किंवा निश्चयाचे ज्ञान या ग्रंथात आहे.

**मुख्य ब्रह्माचा निश्चयो। नाना मतांचा निश्चयो। आपण कोण हा निश्चयो। बोलिला असे।।९।।**

मुख्य ब्रह्माचे निरुपाधी स्वरूप, अनेक प्रकारचे वैचारिक भेद आणि आपली (म्हणजे मानवी जीवाची) स्थिती याबद्दल संशयातीत निरूपण येथे आहे.

**मुख्य उपासनालक्षण। नाना कवित्वलक्षण। नाना चातुर्यलक्षण। बोलिलें असे।।१०।।**

उपासनेचे प्रमुख लक्षण, काव्याची लक्षणे, विविध प्रकारची चातुर्य लक्षणे यात दिली आहेत.

**मायोद्भवाचे लक्षण। पंचभूतांचे लक्षण। कर्ता कोण हें लक्षण। बोलिलें असे।।११।।**

माया कशी निर्माण झाली, पंचभूतांची लक्षणे व त्या सर्वांच्या निर्मात्याचे स्वरूपलक्षण यांचे निश्चित ज्ञान येथे आहे.

**नाना किंत[३] निवारिले। नाना संशयो छेदिले। नाना आशंका फेडिले।। नाना प्रश्न।।१२।।**

शिष्यांचे नाना संशय या ग्रंथात निवारले आहेत. नाना आशंका (चुकीच्या समजुती) नाहीशा केल्या असून अनेक प्रश्नांची उत्तरे देऊन शिष्याला संदेहरहित केले आहे. (किंत, संशय, आशंका आणि प्रश्न हे चार संशयाचे सूक्ष्म छटादर्शक शब्द या ओवीत आहेत.)

**ऐसें बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भी जें बोलिलें । तें अवघेंचि अनुवादलें । न वचे किं कदा।।१३।।**

अशा अनेक विषयांवर निरूपण या ग्रंथामध्ये केले आहे. त्या सर्वांचा उल्लेख (प्रारंभीच) करता येणे शक्य नाही.

**तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केला विशद । जे जे दशकींचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला।।१४।।**

तथापि सगळ्या ग्रंथाचे दशकवार विभाग केले असून प्रत्येक दशकात जो विषय मांडला आहे त्याचे नाव त्याला दिले आहे. (दासबोधातील प्रकरणांना 'समास' असे म्हणतात. दहा समासांच्या गटाला दशक म्हणतात.)

**नाना ग्रंथांच्या संमती। उपनिषदें वेदांतश्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित।।१५।।**

या ग्रंथाला उपनिषदे, वेदान्त, श्रुती यासारख्या धर्मग्रंथांचा आधार घेतला असून मुख्य आधार आत्मज्ञानाच्या स्वानुभवाचा आहे.

**नाना समतीअन्वये । म्हणौनी मिथ्या म्हणतां न ये । तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां।।१६।।**

या ग्रंथाला अनेक आधार असल्याने तो खोटा असल्याचे म्हणता येणार नाही. तथापि याचा अनुभव पुढे प्रत्यक्ष येईलच.

**मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती । नाना ग्रंथांच्या समती । भगवद्वाक्यें।।१७।।**

मत्सरामुळे हे लोक या ग्रंथाला खोटा किंवा चुकीचा म्हणतील पण त्यामुळे सर्व आधारभूत ग्रंथांना आणि वेदासारख्या ईश्वरवचनांना खोटे म्हटल्याप्रमाणे होईल. (प्रत्यक्ष ईश्वरापासून प्राप्त झालेले ज्ञान म्हणजेच वेद. हे ज्ञान आठवून ऋषींनी जे ग्रंथ लिहिले त्यांना 'श्रुती' म्हणतात.) १८ ते २० या ओव्यांमध्ये संदर्भासाठी

३) किंत – शंका

घेतलेल्या आणखीही आधारग्रंथांची यादीच श्रीसमर्थ देत आहेत.

**शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता। उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत।।१८।।**

**भगवद्‌गीता ब्रह्मगीता। हंसगीता पांडवगीता। गणेशगीता येमगीता। उपनिषदें भागवत।।१९।।**

**इत्यादिक नाना ग्रंथ। समतीस बोलिले येथ। भगवद्वाक्यें येथार्थ। निश्चयेंसीं।।२०।।**

शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, वेद आणि वेदान्त, भगवद्गीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता, उपनिषदे आणि भागवत या ग्रंथांचा आधार घेतला आहे. हे सर्व ग्रंथ निश्चयपूर्वक भगवंताची सत्यवचने आहेत. (श्रीसमर्थांनी मूळ संस्कृतातील हे सारे ग्रंथ त्यांच्या तपश्चर्याकाळामध्ये अभ्यासिले होते. त्यातील ज्ञानाचा आधार घेऊन मराठीमध्ये दासबोधाचे लेखन केल्यामुळे वाचकांची केवढी तरी सोय झाली आहे. ज्या अभ्यासार्थींना या आधारग्रंथांची अधिक माहिती हवी असेल त्यांनी डॉ. शं. ना. पेंडसे यांच्या ‘राजगुरू समर्थ रामदास’ या ग्रंथातील प्रकरण १ ले पहावे.)

**भगवद्वचनीं अविश्वासे। ऐसा कोण पतित असे । भगवद्वाक्याविरहित नसे। बोलणें येथीचें।।२१।।**

या ग्रंथातील विवेचन म्हणजे भगवद्‌वाक्येच आहेत त्यावर अविश्वास करील असा कोणी पापी मनुष्य असू शकेल का? येथील कोणताही उपदेश भगवद्‌वचनाहून वेगळा नाही.

**पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। तो दुरात्मा दुरभिमान। मत्सरें करी।।२२।।**

ग्रंथाचे पूर्णपणे वाचन न करताच त्याला जो दोष देतो तो दुष्ट बुद्धीचा असतो. त्या माणसाचा दुराभिमान व मत्सरीवृत्ती त्यातून प्रगट होते.

**अभिमानें उठे मत्सर। मत्सरें ये तिरस्कार। पुढें क्रोधाचा विकार। प्रबळे बळे।।२३।।**

दुराभिमानामुळे मत्सर उत्पन्न होतो. मत्सरातून तिरस्काराची भावना व तिच्यातूनच क्रोध उत्पन्न होतो.

**ऐसा अंतरी नासला। कामक्रोधें खवळला। अहंभावें पालटला। प्रत्यक्ष दिसे।।२४।।**

अशा प्रकारे ज्याचे अंत:करणच नासलेले आहे तो अहंकाराने व क्रोधामुळे संतापतो, हे प्रत्यक्ष दिसते.

**कामक्रोधें लिथाडिला[४]। तो कैसा म्हणावा भला। अमृत सेंवितांच पावला[५]। मृत्य राहो।।२५।।**

कामक्रोधाने जो लिडबिडला आहे त्याला चांगला माणूस म्हणताच येत नाही. अमृत सेवन केल्यास वास्तविक अमर होता येते पण राहू हा दैत्य अमृतपान करूनही मरण पावला. (दासबोधासारख्या अमृतवचने असलेल्या ग्रंथाचे वाचन करताना मत्सरीवृत्ती ठेवल्यास ग्रंथापासून कोणताच लाभ होणार नाही हे सांगण्यासाठी येथे राहूच्या पौराणिक कथेचा दृष्टांत दिला आहे. भागवतामध्ये अष्टम स्कंधात ही कथा आहे : समुद्रमंथन प्रसंगी श्रीविष्णूंनी मोहिनीचे रूप घेऊन देवांना अमृत वाढले त्यावेळी राहू हा राक्षस लबाडीने देवांच्या पंक्तीत जाऊन बसला. त्याला अमृत वाढले देखील गेले! पण चंद्र सूर्य यांनी श्रीविष्णूंच्या ध्यानी ही गोष्ट इशाऱ्याने आणून दिली तेव्हा राहूने तोंडात घेतलेले अमृत त्याच्या पोटात जाण्यापूर्वीच त्याचा शिरच्छेद श्रीविष्णूंच्या सुदर्शनचक्रामुळे झाला. त्यामुळे राहूला मृत्यू आला. अशी ही कथा आहे.)

**आतां असो हें बोलणें। अधिकारासारिखें घेणें। परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम।।२६।।**

हा विषय एवढाच पुरे. प्रत्येकाने ग्रंथातील घेता येईल तेवढे घ्यावे. अहंभाव बाजूला ठेवून ते घेण्याचा

४) लिथाडिला-बरबटला (५) ‘अमृत सेवितांच पावला । मृत्य राहो ।।’ अमृताचे सेवन करूनसुद्धा दुष्टबुद्धीमुळे राहू मृत्यु पावला, या पौराणिक कथेचा हा उल्लेख आहे.

प्रयत्न करणे हे सर्वात उत्तम होय.

**मागां श्रोतीं आक्षेपिलें। जी ये ग्रंथीं काय बोलिलें। तें सकळहि निरोपिलें। संकळीत मार्गें[६]।।२७।।**

**आतां श्रवण केलियाचें फळ। क्रिया पालटे तत्काळ। तुटे संशयाचें मूळ। येकसरां।।२८।।**

प्रारंभी श्रोत्यांनी विचारले होते की या ग्रंथात काय सांगितले आहे ते येथपर्यंत संक्षेपाने सांगितले आहे. आता दासबोधाच्या श्रवणाचे फळ सांगतो. यामुळे माणसाच्या क्रियेमध्ये किंवा आचारामध्ये बदल घडतो. (दासबोध वाचनाच्या अनेक फलांचा उल्लेख आहे पण 'वर्तनबदल' किंवा 'क्रियापालट' या बदलास श्रीसमर्थांनी प्राधान्य दिले आहे. ''अनुभव-प्राप्तीमुळे माणसाच्या वर्तनामध्ये इष्ट दिशेने घडून येणाऱ्या वर्तनबदलास 'शिकणे' असे म्हणतात.'' त्या दृष्टीने पाहिल्यास दासबोध हा एक शैक्षणिक ग्रंथ सुद्धा आहे. त्याच्यामुळे माणसाच्या विचारांमध्ये प्रथम बदल घडतो नंतर तो प्रत्यक्ष वर्तनात येतो.) माणसाच्या मनातील संदेहाचे मूळच नष्ट होते. (संदेह अनेक प्रकारचे असतात. शेंदूर फासलेले देव खरे आहेत का? येथपासून या सृष्टीच्या संचालनामध्ये 'ईश्वर' नावाची काही शक्ती असेल का? येथपर्यंत अनेक संदेह मनात असतात. दासबोधामुळे ते नष्ट होतात.)

**मार्ग सांपडे सुगम[७]। न लगे साधन दुर्गम । सायोज्यमुक्तीचें[८] वर्म । ठाई पडे।।२९।।**

सायुज्यमुक्तीचे रहस्य आकलनात येते आणि ती प्राप्त करण्याचा सुलभ मार्ग सापडतो. त्रासदायक किंवा कठीण साधनांची गरज लागत नाही. (सायुज्यमुक्ती म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची सुटका होय. मानवाचे सर्वश्रेष्ठ ध्येय हेच मानले आहे.)

**नासे अज्ञान दु:ख भ्रांती। शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फळश्रुती। ईये ग्रंथीं।।३०।।**

आत्मस्थितीबद्दलचे अज्ञान, जीवनातील दु:ख आणि भ्रामक समजुती नाहीशा होतात व ज्ञानाची प्राप्ती तत्काळ होते ही या ग्रंथाची फलप्राप्ती आहे. (मानवाच्या ज्या भ्रामक समजुती असतात त्यांची अधिक चर्चा दासबोधात द. १०-६ मध्ये आहे.)

**योगियांचें परम भाग्य । आंगीं बाणे तें वैराग्य । चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित।।३१।।**

योग्यांचे परमभाग्य असे जे वैराग्य ते या ग्रंथामुळे प्राप्त होते. व्यवहारामध्ये चातुर्याने आणि विवेकाने कसे वागावे ते कळते. (ज्यांचा अहंकार नष्ट झाला नाही अशा योग्यांची उदाहरणे पुराणात अनेक आहेत. वैराग्य असल्याविना योगसाधना व्यर्थ होय. जगात वागताना साधकबाधक विचार करणे आणि परमार्थामध्ये सार-असार याबद्दल विचार करणे म्हणजेच विवेक. तो अंगी बाणावा यासाठी दासबोधाचे नित्य वाचन करावे.)

**भ्रांत अवगुणी अवलक्षण। तेचि होती सुलक्षण। धूर्त तार्किक विचक्षण। समयो जाणती।।३२।।**

भ्रमिष्ट, अवगुणी आणि अवलक्षणी माणसे या ग्रंथाच्या वाचनाने सुलक्षणी होतात. दुसऱ्याच्या मनातील दुष्ट हेतू समजण्याची धूर्तता; घटनांचे पृथ:करण करून सुयोग्य तर्क करण्याचे ज्ञान आणि कोणत्या समयी कसे वागावे हे सारे या ग्रंथामुळे समजते.

**आळसी तेचि साक्षपी[९] होती। पापी तेचि प्रस्तावती । निंदक तेचि वंदू लागती । भक्तिमार्गासी।।३३।।**

आळशी माणसे उद्योगी होतात व पापी माणसे पश्चात्तापाने पुण्यशील होतात. भक्तिमार्गाची निंदा करणारे

६) संकळीत मार्गे - सारांशाने ७) सुगम - सोपा ८) सायोज्यमुक्ति - परमात्मस्वरूपाशी एकरूप होणे. ९) साक्षपी - उद्योगी

प्रेमादराने भक्ती करू लागतात.

**बद्धचि होती मुमुक्ष। मूर्ख होती अतिदक्ष। अभक्तचि पावती मोक्ष। भक्तिमार्गें।।३४।।**

बद्धांचे मुमुक्षू होतात व मूर्ख माणसे अतिदक्ष होतात. जे भक्तिहीन असतील त्यांना भक्तिमार्गाने मोक्ष प्राप्ती होते. (द. ५ मधील ७ व ८ हे दोन समास बद्ध आणि मुमुक्षू या संज्ञा समजून घेण्यासाठी जरूर वाचावेत. द्रव्य, दारा आणि प्रपंच यांचा सदैव विचार करणारे म्हणजेच देहबुद्धीची बेडी पडलेले 'बद्ध' असतात. ज्यांना संसाराबद्दल विरक्ती उत्पन्न होते आणि ईश्वरप्राप्तीची इच्छा होते ते मुमुक्षू होत.)

**नाना दोष ते नासती। पतित तेचि पावन होती। प्राणी पावे उत्तमगती। श्रवणमात्रें।।३५।।**

माणसांचे अनेक दोष नाहीसे होतात. पापी माणसे पवित्र होतात. याच्या श्रवणाने चांगली गती प्राप्त होते.

**नाना धोके देहबुद्धीचे। नाना किंत संदेहाचे। नाना उद्वेग संसाराचे। नासती श्रवणें।।३६।।**

देहबुद्धीमुळे निर्माण होणारे अनेक प्रकारचे धोके, नाना प्रकारच्या संशयामुळे होणारे भ्रम, आणि संसारातील हरतऱ्हेचे उद्वेग याच्या श्रवणाने नष्ट होतात.

**ऐसी याची फलश्रुती। श्रवणें चुके अधोगती। मनास होय विश्रांति। समाधान।।३७।।**

अशी या ग्रंथाची फलश्रुती आहे. याच्या श्रवणामुळे अवनति थांबते आणि (वाऱ्याप्रमाणे चंचळ असलेल्या) मनास विश्रांती मिळून समाधान लाभते.

**जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा। मत्सर धरी जो पुंसा[१०]। तयास तेंचि प्राप्त।।३८।।**

अशी दासबोधाची फलश्रुती आहे खरी पण ज्याची जशी मनोवृत्ती असेल तसेच फळ त्याला मिळेल. मत्सरग्रस्त मन किंवा दूषित दृष्टी ठेवून श्रवण करील त्याला त्याच धर्तीचे फळ मिळेल, हे सांगणे नकोच. (याच समासामध्ये २३ ते २६ या ओव्यांमध्ये याबद्दल विवेचन झाले आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम।।१।।**

## दासबोध प्रवेश : प्रश्नपत्रिका १ ली

## (दासबोध दशक १ समास १ 'ग्रंथारंभलक्षण' वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्यात गाळलेल्या जागा भरा.

१) नाना --- -- संमती। ----- वेदांत श्रुती। आणि मुख्य -----। शास्त्रेंसहित।।

२) नाना धोके -----। नाना किंत -----। नाना ----- संसाराचे। नासती श्रवणें ।।

३) ----- योगें देव। निश्चयें पावती -----। ऐसा आहे -----। ईये ग्रंथी।।

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा. चूक असल्यास विधान बरोबर करून लिहा.

अ) दासबोध ग्रंथाला फक्त भगवद्गीतेचा आधार आहे.

ब) फक्त आत्मप्रचीतीच्या आधारावर दासबोध समर्थांनी लिहिला.

क) पूर्ण ग्रंथ वाचल्यानंतरच एखाद्या ग्रंथावर टीका करण्याचा अधिकार वाचकाला असतो.

प्र. ३ दासबोध ग्रंथाची फलप्राप्ती सांगणाऱ्या दहा ओव्यांचा फक्त क्रमांक लिहून अर्थ सांगा.

प्र. ४ पुढील ओव्यांच्या अर्थाचे स्पष्टीकरण थोडक्यात करा.

---

१०) पुंसा - पुरुष

१) अमृत सेवितांच पावला। मृत्य राहो।।

२) जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा।।

प्र. ५ अ) दासबोधाचे वाचन आपण यापूर्वी केले आहे का? या ग्रंथाचा संकल्प आपणास का करावासा वाटतो; याबद्दल सुमारे दहा ओळी लिहा.

किंवा

दासबोधाचे वाचन यापूर्वी आपण केले त्यावेळी आपणास कोणता समाधानदायी अनुभव आला हे सुमारे दहा ओळीत लिहा.

# स्वाध्याय २ रा : दशक १२ : समास १ : विमळ लक्षण

**सारांश :** 'विमललक्षण द. १२ स. १' एकदम १२ व्या दशकातील १ ला समास निवडण्याचा हेतू असा की, आजच्या काळातील तरुणाला ज्या समस्या आहेत त्यांचीच जणू उत्तरे श्रीसमर्थ येथे देत आहेत. संसार सोडल्याविना परमार्थाचा विचारच करणे शक्य नाही, ही समजूत भ्रामक असल्याचे स्पष्टपणे येथे सांगितले आहे. ज्याला संसार नेटका करता येत नाही, त्याला परमार्थही साधणार नाही हा महत्त्वाचा सिद्धांत येथे अगदी सोप्या भाषेत मांडला आहे. या समासातील विचार नीट समजून घेऊन आचरणात आणल्यास देहाचे सार्थक होईल, इतक्या बहुमोल ओव्या यात आहेत.

मानवी जीवनात प्रपंच व परमार्थ एकमेकांस पूरक असतात. प्रपंचात कामास येणारे गुणच परमार्थात उपयोगी पडतात. म्हणून सर्वसाधारण माणसाने प्रपंच नीटपणे सांभाळून परमार्थ करावा. माणसापाशी जो विवेक आहे त्याच्या बळावर जसा प्रपंच यशस्वी होतो तसा परमार्थदेखील हस्तगत होतो. विवेकाने दूरदृष्टी येते. माणसाने दूरदृष्टी वापरून पुढे येणाऱ्या प्रसंगासाठी आधीच तरतूद करून ठेवावी. विवेकशील माणसाने अवगुण सांडावे आणि गुणवंताचे गुण घ्यावे. असा माणूस बाहेरून दिसायला जरी चारचौघांसारखा दिसला तरी त्याच्या अंतर्यामी विवेक अति जागा असतो. सांगण्याचा मुद्दा इतकाच की माणसाने प्रपंच सावधपणाने करावा व त्याच्या मागोमाग परमार्थाची पण रोकडी प्रचीती घ्यावी.

।। **श्रीराम**।।

**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ-विवेका। येथें आळस करूं नका। विवेकी हो।।१।।**

'आधी प्रपंच विवेकाने सुव्यवस्थित करावा आणि त्याच विवेकाला परमार्थाकडे वळवावे. विचारवंत लोकांनी यामध्ये आळस करू नये. ('आधी आणि मग' असे शब्द या ओवीत आले आहेत त्याचा शब्दश: अर्थ येथे घ्यावयाचा नाही हे पुढील ओव्यांवरून कळून येईल. प्रपंचाला परमार्थाइतकेच महत्त्व दिले पाहिजे असा भावार्थ आहे.)

**प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी।।२।।**

प्रपंचाकडे दुर्लक्ष करून परमार्थ करू म्हणाल तर तुम्ही दु:खी व्हाल. प्रपंच व परमार्थ एकाच वेळी हातात हात घालून चालवाल तरच तुम्हाला विवेकी म्हणता येईल.

**प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला। मग तया करंट्याला। परमार्थ कैंचा।।३।।**

प्रपंच सोडून परमार्थ कराल तर तुम्हाला खाण्याला अन्नसुद्धा मिळणार नाही. अशा करंट्याला त्याविना परमार्थ तरी कसा करता येईल? (असा रोखठोक प्रश्न श्रीसमर्थ विचारतात.)

**परमार्थ सांडून प्रपंच करिसी। तरी तूं येमयातना भोगिसी। अंतीं परम कष्टी होसी। येमयातना भोगितां।।४।।**

परमार्थाचा विचारच न करता केवळ प्रपंच हयातभर केला तर जीवाला यमयातना भोगाव्या लागतात आणि त्यामुळे अत्यंत हाल होतात. (आत्मप्राप्ती हे ध्येय विसरून केवळ वासनातृप्ती करणाऱ्याच्या नशीबी यातना असतात. कारण वासनांची तृप्ती भोगाने कधीच होत नाही. अतृप्त वासना हेच जन्माचे मूळ आहे; आणि जन्म तर दु:खाचा अंकुर आहे.)

**साहेब कामास[१] नाहीं गेला। गृहीच सुरवाडोन[२] बैसला। तरी साहेब कुटील तयाला। पाहाती लोक।।५।।**

एखादा नोकर कामावर न जाता घरीच मौज करीत आरामात राहिला तर नंतर मालक त्याला चोप देतो आणि लोकांना तो तमाशा पहावयास मिळतो.

**तेव्हा महत्वचि गेलें। दुर्जनाचें हांसें जालें। दु:ख उदंड भोगिलें। आपुल्या जीवें।।६।।**

यामुळे त्याचे महत्त्व जाऊन दुर्जनसुद्धा फजीती करतात. त्यामुळे जीवाला उदंड यातना होतात.

**तैसेंचि होणार अंतीं। म्हणौन भजावें भगवंतीं। परमार्थाची प्रचिती। रोकडी घ्यावी।।७।।**

ईश्वराचे भजन न केल्यास असेच होईल म्हणून त्याचे भजन चिंतन करावे आणि परमार्थाची प्रचिती घ्यावी. ('परमार्थ संसारी तारक' हा अनुभवण्याचा विषय आहे. द. १-१० नरदेहस्तवन पहावा.)

**संसारीं असता मुक्त। तोचि जाणावा संयुक्त। अखंड पाहे युक्तायुक्त। विचारणा हे।।८।।**

संसार करीत असतानासुद्धा जो मनाने अलिप्त असतो तोच खरा कर्मयोगी आहे. (त्याचा संयुक्त असा येथे उल्लेख केला आहे.) कोणता विचार किंवा कृती उचित आहे किंवा अनुचित आहे याचा विचार तो पाहातो.

**प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण। प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।९।।**

प्रपंचात जो सावध असतो तो परमार्थामध्येही सावध असतो. तो कोठेही घसरत नाही. (प्रपंचात यशप्राप्तीसाठी जे गुण आवश्यक असतात त्यांचा आधार परमार्थप्राप्तीसाठी सुद्धा असतो. अव्यवस्थित प्रापंचिकाला परमार्थही करता येणार नाही. परमार्थाला आवश्यक असलेले गुण प्राप्त करण्यासाठी प्रपंच हीच शाळा आहे. प्रपंचात ज्याला नेमकपणे वागता येत नाही, त्याला परमार्थ साधू शकत नाही.)

**म्हणौन सावधानपणें। प्रपंच परमार्थ चालवणें। ऐसें न करितां भोगणें। नाना दु:खें।।१०।।**

म्हणून प्रपंच व परमार्थ या दोहोंमध्ये सावधानता हवी. त्या अभावी नाना प्रकारची दु:खे जीवाला भोगावी लागतात.

**पर्णाळि[३] पाहोन उचले। जीवसृष्टि विवेकें चाले। आणि पुरुष होऊन भ्रमले। यासी काये ह्मणावें।।११।।**

झाडाच्या पानावरील अळी हा य:कश्चित जीव असतो पण ती सुद्धा शरीराची हालचाल करताना पुढे आधार आहे किंवा नाही याची खात्री करून घेऊनच शरीर पुढे ढकलते. अशाप्रकारे साऱ्या क्षुद्र

१) साहेबकामास - वरिष्ठाच्या कामास २) सुरवाडोन - सुखाने, आळसाने ३) 'पर्णाळि पाहोन उचले' - पानावरील (अळी किंवा) किडा अगोदरच पुढचा आधार नीट घेतो आणि मगच आपले शरीर पुढे ढकलतो.

जीवसृष्टीतसुद्धा विवेकाचे दर्शन होते आणि श्रेष्ठ म्हणविणारा माणूस मात्र भ्रमिष्टाप्रमाणे अविचाराने वागतो त्याला काय म्हणावे हेच कळत नाही. (या ओवीत 'पुरूष होऊन भ्रमले ।'' येथे पुरूष हा शब्द वापरला आहे. प्रपंचामध्ये पतिपत्नी दोघांचा सहभाग असतो पण पुरूषावर जास्त भार आहे. संसाराचे यशापयशाला तोच प्रामुख्याने जबाबदार असतो या अर्थीही तो शब्द आहे.)

**म्हणौन असावी दीर्घसूचना। अखंड करावी चाळणा। पुढील होणार अनुमाना। आणून सोडावें।।१२।।**

यासाठी दूरदृष्टी ठेवून माणसाने विचार करावा. निरनिराळे जे विचारांचे मार्ग परिस्थितीतून निघतात त्यांतून निवड करावी. (चाळणीतून धान्य स्वच्छ करतात तशाप्रकारे विचारांची चाळणा करावी.) पुढे काय होण्याचा संभव आहे त्याचा सुयोग्य तर्क करावा.

**सुखी असतो खबर्दार[४]। दु:खी होतो बेखबर। ऐसा हा लौकिक विचार। दिसतचि आहे।।१३।।**

जो सावध असतो तो सुखी, तर गाफील राहातो तो दु:खी असतो हा प्रपंचातील नित्याचा अनुभव आहे.

**म्हणौन सर्वसावधान। धन्य तयाचें महिमान। जनीं राखे समाधान। तोचि येक।।१४।।**

म्हणून जो अखंड सावधानता (प्रपंचात व परमार्थातही) बाळगतो तो धन्य होय. असा मनुष्यच कुटुंबात किंवा समाजामध्ये व स्वत:च्या अंतर्यामीही समाधान राखू शकतो.

**चाळणेचा आळस केला। तरी अवचिता पडेल घाला। ते वेळे सावरायाला। अवकाश कैंचा।।१५।।**

भावी काळामधील परिस्थितीबद्दल जर वैचारिक चाळणा करून वागले नाही तर अचानकपणे संकटे उद्भवतात. अकल्पित संकट एकदा कोसळल्यावर पूर्वचिंतन नसल्यामुळे त्यातून सावरून बाहेर पडणे मुष्किल होते.

**म्हणौन दीर्घसूचनेचे लोक। त्यांचा पाहावा विवेक। लोकांकरितां लोक[५] । शाहाणे होती।।१६।।**

जे लोक दूरदृष्टीने विचार करतात त्यांच्या विचारसरणीपासून बोध घ्यावा. अशा लोकांचे अनुकरण केल्याने दुसरे लोकही शहाणे होतात.

**परी ते शाहाणे वोळखावे। गुणवंताचे गुण घ्यावे। अवगुण देखोन सांडावे। जनामधें।।१७।।**

पण समाजामध्ये खरे शहाणे कोण आहेत हे ओळखता आले पाहिजे. (जो अवगुणी असतो तो सुद्धा काही वेळा यशस्वी झालेला दिसतो पण तो खरा शहाणा नव्हे हे कळले पाहिजे) जे खरे गुणवंत असतील त्यांचे गुण आपणही आत्मसात करावे. लोकांमध्ये जे अवगुण असतात ते सोडून द्यावे.

**मनुष्य पारखूं राहेना। आणि कोणाचें मन तोडीना। मनुष्यमात्र अनुमाना। आणून पाहे।।१८।।**

(१७ व्या ओवीतील पहिल्या चरणार्धाचा अधिक खुलासा येथे आहे.) आपल्याला लोकांची अंतरपरीक्षा करता आली पाहिजे पण असे करीत असताना त्यांना दुखवू मात्र नये. कोणत्या माणसाची कुवत काय आहे याचा मात्र अचूक तर्क करावा.

**दिसे सकळांस सारिखा। पाहातां विवेकी नेटका। कामी निकामी[६] लोकां। बरें पाहे।।१९।।**

बाह्यदर्शनावरून असा मनुष्य साधासुधाच दिसतो पण आतून मात्र त्याचा विवेक नीटनेटका असतो त्यामुळे (एखाद्या सत्कार्यासाठी) उपयोगी आणि निरूपयोगी अशा उभयतांना तो बरोबर ओळखतो. (अशी

---

४) खबर्दार – दक्ष, सावध ५) लोकांकरिता लोक । शाहाणे लोक । शाहाणे होती – एकाच्या उदाहरणाने दुसरा शहाणा होतो. ६) कामी निकामी – उपयोगी आणि निरूपयोगी.

जाण असणे हे चातुर्याचे लक्षणच आहे.)

**जाणोन पाहिजेत सर्व। हेंचि तयाचें अपूर्व। ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणें।।२०।।**

एखादा मनुष्य उपयुक्त आहे किंवा एखादा कुचकामी आहे हे ठावूक असूनसुद्धा ती सारी माणसे (विमळलक्षणी) माणसास पाहिजे असतात. ज्याला जेवढे महत्त्व द्यावयाचे तेवढेच देण्याचे (त्याच्याकडून एखादे सत्कार्य करून घेण्याचे) शहाणपण त्याच्या अंगी असते. हीच त्याची अपूर्वाईची गोष्ट असते.

(संघटनेची अनेक सूत्रे दासबोधात आहेत. लोकसंग्रही महंताने या सूत्रांचा अभ्यास करावयास हवा. एखादा मनुष्य टाकावू असा शिक्का मारून त्याला दूर सारून कार्य करू नये हे सूत्र सध्याच्या लोकशाही जमान्यामध्ये विशेषच महत्त्वाचे आहे. कारण दरडोई एक मत ही लोकशाही पद्धती आता सर्वत्र आहे.

फक्त २० ओव्यांचा छोटासा हा समास असला तरी त्यात प्रपंच विज्ञान, प्रपंच परमार्थ सामंजस्य, आणि विवेकवाद अत्यंत स्पष्ट शब्दात दिग्दर्शित केला आहे. सर्वसावधानता आणि दीर्घसूचना ही विवेकापोटी जन्म घेतात त्यांचे मोठेच मार्मिक विवेचन येथे आले आहे. ते करीत असता श्रीसमर्थांनी वापरलेली भाषा अगदी सुबोध आहे. लोकांना ती समजावी म्हणून त्याकाळी रूढ झालेल्या परभाषेतील शब्दांचा उपयोगही येथे आढळून येतो. खबर्दार, बेखबर, साहेब यासारखे परभाषेतील शब्द या समासात आहेत.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळलक्षणनाम समास प्रथम।।१।।**

## प्रश्नपत्रिका २ री (दशक १२ समास १ 'विमळलक्षण'वर आधारित)

प्र. १ प्रपंच न करता केवळ परमार्थ केला तर सर्वसामान्य माणसावर कोणत्या आपत्ती येतात? याउलट केवळ प्रपंचच केला तर कोणत्या आपत्ती येतात असे समर्थांनी म्हटले आहे?

प्र. २ प्रपंच व परमार्थ, दोन्हीमध्ये यश मिळण्यासाठी कोणता एक विशेष गुण येथे सांगितला आहे?

प्र. ३ या उताऱ्यामध्ये कोणते उर्दू शब्द समर्थांनी उपयोजिले आहेत?

प्र. ४ खालील दोन अवतरणांवर पाच ओळी स्पष्टीकरण करा –

१) 'जीवसृष्टी विवेकें चाले'

२) 'प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।'

प्र. ५ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) सुखी असतो -----। दु:खी होतो -----।।

२) संसारी असतां -----। तोचि जाणावा -----।

३) म्हणौन -----। धन्य तयाचें महिमान। जनीं राखे -----। तोचि येक।।

# स्वाध्याय ३ रा : दशक १२ : समास २ : प्रत्ययनिरूपण

सारांश : यत्नवादाची महती सांगणारा द. १२-२ हा समास आहे. योग्य दिशेने आणि पुरेसा यत्न केला तर हमखास यशप्राप्ती होते, हा सिद्धांत येथे मांडला आहे. परिस्थिती-शरण-वाद किंवा प्रारब्धवाद श्रीसमर्थांना मान्य नाही. श्रीशिवरायाचे चरित्र त्यांच्यासमोर घडत असतानाच हा समास लिहिला गेला आहे.

कोणत्याही समाजामध्ये सामान्य माणूस वासनाप्रधान असतो. सांसारिक माणसाला आपली प्रापंचिक परिस्थिती उत्तम असावी असे मनापासून वाटते. पण ती अशी असत नाही. प्रपंचात कमी पडते व माणसाला दु:ख भोगावे लागते. याचे कारण प्रारब्ध नसून त्याच्या हातून जो योग्य प्रयत्न व्हायला पाहिजे तो होत नाही हे खरे कारण आहे. माणूस जर योग्य दिशेने प्रयत्न करील तर त्याला प्रपंचामध्ये सहसा कमी पडणारच नाही. हा अचूक यत्न कोणता त्याचे वर्णन या समासामध्ये आढळते. आपण आपल्या अवगुणांची ओळख करून घ्यावी. लोकांशी कसे वागावे हे न कळल्याने आपसात बेबनाव व भांडणे होतात. भांडणामुळे दोघेही कष्टी होतात आणि मग प्रयत्न तेवढा राहून जातो. सामान्यत: लोकांची सवय अशी की आपण आपली बाजू बरोबर आहे, असे धरून चालायचे आणि दुसऱ्याला नावे ठेवायची. मग लोकांकडून बरे म्हणून घ्यायला हवे असेल तर लोकांचे बरेवाईट सोसणे जरूर आहे. लोकांना कळत नाही. लोक असेच स्वार्थीपणाने वागणार. आपण वरच्या पातळीवर राहून त्यांना क्षमा केली पाहिजे. असे जर केले नाही तर त्यांच्यात व आपल्यात फरकच उरत नाही. आपण असेच वागावे की लोकांचे अंतरंग आपल्याविषयी निर्मळ होत जावे. जो नेहमी खरे बोलतो व जसे बोलतो तसा चालतो त्याला सारे लोक मानतात. जनतारूपी जनार्दन एकदा का प्रसन्न झाला म्हणजे मग काही कमी पडत नाही. सर्वांना खूष ठेवणे कठिणच आहे. पण कोणाचे वर्म कधी काढू नये. कारण माणसाचे मन त्यामुळे दुखावते. दुसऱ्याचा दोष काढण्यात अर्थ नाही. आपलेच सामर्थ्य कमी पडते हा दृष्टिकोन आपल्या मनाला पुन: पुन्हा शिकविणे आवश्यक आहे. माणसाने मरणाचे स्मरण ठेवावे, आपल्याबरोबर काय येणार आहे ते ओळखावे आणि विवेकाने चांगले वागावे. समजा, एक माणूस पुष्कळ विद्या शिकला पण आलेला प्रसंग त्यास ओळखता येत नाही, प्रसंगाला योग्य असे त्यास वागता येत नाही, अशा माणसाची विद्या कुचकामाची समजावी. म्हणून माणसाने प्रसंगमान ओळखावे. आपल्याला जे हवेसे वाटते त्यासाठी योग्य प्रयत्न करावा. मग त्याला काही कमी पडणार नाही.

।। **श्रीराम**।।

**ऐका संसारासी आले हो। स्त्री पुरुष निस्पृह हो। सुचितपणें पाहो। अर्थांतर।।१।।**

जगवासी संसारी स्त्री/पुरुष आणि नि:स्पृह महंतहो, मी जे काही सांगत आहे त्याकडे एकाग्रचित्ताने लक्ष द्या, आणि त्याचा नेमका अर्थ समजून घ्या. (ऐका संसारासी आले हो । स्त्रीपुरुष नि:स्पृहहो ।। याचा संसारात पडलेल्या नि:स्पृह स्त्री/पुरूषहो असाही अर्थ काही दासबोधात आला आहे. पण प्रापंचिक लोकांना नि:स्पृह हा शब्द विशेषण म्हणून लावता येईल का? शिवाय श्रोत्यांमध्ये जे समर्थशिष्य किंवा महंत असत त्यांनाही उद्देशून ओवी असल्याने त्यांचे नि:स्पृहहो हे संबोधन होऊ शकते. संसार याचा अर्थ जग असाही घेता येतो. त्या दृष्टीने पहिल्या ओवीच्या अर्थाबद्दल दोन्ही पद्धतीने विचार करता येईल. त्यात फारसे चुकणार नाही.)

**काये म्हणते वासना। काये कल्पिते कल्पना। अंतरींचें तरंग नाना। प्रकारें उठती।।२।।**

आपली वासना काहीतरी चिंतन करीत असते, आपली कल्पना काहीतरी मनोराज्ये करीत असते आणि त्यामुळे मनात हरतऱ्हेचे तरंग उमटत असतात.

**बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावे। मनासारिखें असावें। सकळ कांहीं।।३।।**

खाण्यासाठी पिण्यासाठी काहीतरी चांगले मिळावे, चांगले वस्त्र (कपडे) मिळावे आणि सगळे काही मनासारखे असावे असे आपणास (नि:संशय) वाटत असते (आणि वाटत राहाणार!)

**ऐसें आहे मनोगत। तरी ते कांहींच न होत। बरें करितां अकस्मात। वाईट होतें।।४।।**

पण आपल्या मनोगताप्रमाणे काहीच होत नाही (हे चिरसत्य आहे, सर्वसुखी कुणीच असत नाही) उलट काही वेळा बरे करीत असताना अकल्पितपणे भलतेच घडून येते.

**येक सुखी येक दु:खी। प्रत्यक्ष वर्ततें लोकीं। कष्टी होऊनियां सेखीं। प्रारब्धावरी घालिती।।५।।**

(त्यामुळे) एक सुखी तर दुसरा दु:खी असतो हे जीवनात प्रत्ययाला येते (समासाचे नावच प्रत्ययनिरूपण आहे). जे दु:खी असतात ते आपल्या (दु:खाचे कारणाचा बरोबर शोध न घेता) प्रारब्धाला दोष देतात. (घडणाऱ्या लहान थोर प्रत्येक घटनेला प्रारब्धाचेच कारण असते काय? गाडीला वेळेवर गेले नाही गाडी चुकली, अभ्यास मन लावून केला नाही परीक्षेत अपयश आले, यासारख्या घटना प्रारब्धाच्या कारणाने घडतात काय? श्रीसमर्थांच्या काळी प्रारब्धवाद फारच माजला होता. देशाला पारतंत्र्य आले त्याला कारण आपल्या प्रारब्धातच ते होते इतके म्हणण्यापर्यंत लोकांची मजल होती. श्रीसमर्थांना हा प्रारब्धवाद पुसून टाकून यत्नवादाची शिकवण येथे द्यावयाची आहे.)

**अचुक येत्न करवेना। म्हणौन केलें तें सजेना[१] । आपला अवगुण जाणवेना। कांहीं केल्यां।।६।।**

आपणास अचूक यत्न करता येत नाहीत म्हणून केलेल्या कामात यश येत नाही. आपले दोष (किंवा चुकीचा मार्ग) आपणास दिसत नाहीत. (हे खरे कारण आहे.)

(एका दृष्टान्ताने 'अचुक येत्न' या शब्दांचे विवरण करता येईल. समजा परगावी गाडीने जावयाचे आहे तर स्टेशनवर जाण्यासाठी योग्य वेळी निघाले पाहिजे, योग्य वाहनाने गेले पाहिजे, योग्य दिशेने गेले पाहिजे, तेथपर्यंत जाईपर्यंत थांबता कामा नये या साध्या गोष्टीच आहेत. त्याप्रमाणे कार्य यशस्वी करण्यासाठी, योग्य दिशेने, योग्य वेळी, योग्य साधनाने, पुरेसा यत्न केला पाहिजे.)

''निर्वाण दीपे खलु तैलदानम् । चौरे गते वा किम सावधानम् ।
वयोगते वा खलु मल्ल विद्याम् । पयोगते वा खलु सेतुबंध: ।।''

असे सुभाषित आहे. वर जे काही मुद्दे दिले आहेत त्याबद्दल अभ्यासार्थीनी स्वत:च विचार करावा; तसेच ज्यांनी खडतर प्रसंगातूनही ध्येयसिद्धी प्राप्त केली त्यांची चरित्रे पहावी. शिवाजी महाराजांचे चरित्र तर त्यांच्या अचूक यत्नाचा सुंदर वस्तुपाठच आहे. थोर संशोधक, उद्योगपति, आणि जीवनाच्या अनेक क्षेत्रात ज्यांनी कामगिरी करून यशाचे शिखर गाठले त्यांनी प्रारब्धवाद कवटाळला नव्हता.

**जो आपला आपण नेणे। तो दुसऱ्याचें काये जाणे। न्यायें सांडितां दैन्यवाणे। होती लोक।।७।।**

ज्याला आपले गुणदोष स्वत:लाच कळत नाहीत त्याला दुसरा कसा आहे याची समज साहजिकच असू शकत नाही. माणसांना योग्य मार्ग कळत नाही आणि मग (अपयशाने) दु:खी कष्टी होतात.

---

१) सजेना – साजेना, यशस्वी होत नाही.

**लोकांचें मनोगत कळेना। लोकांसारिखें वर्तवेना। मूर्खपणें लोकीं नाना। कळह उठती।।८।।**

लोकांचे मनोगत न समजल्यामुळे त्यांना पसंत पडेल असे वागता येत नाही. अशी माणसे मूर्खपणाने इतरांशी भांडू लागतात.

**मग ते कळो वाढती[२] । परस्परें कष्टी होती। प्रेत्न राहातां अंतीं। श्रमचि होये।।९।।**

ही भांडणे वाढतच राहतात आणि त्यामुळे परस्परांना क्लेशच होतात. त्यामुळे एखादे कार्य करण्याप्रीत्यर्थ जे प्रयत्न व्हावयास हवेत तेच बंद पडतात आणि शेवटी श्रम व्यर्थ जातात.

**ऐसी नव्हे वर्तणुक। परीक्षावे नाना लोक। समजले पाहिजे नेमक। ज्याचें त्यापरी।।१०।।**

हा प्रकार काही योग्य नव्हे. आपल्या कार्याच्या संबंधित (अगर प्रपंचातील) लोकांच्या अंतरंगाची तपासणी करावी. कोणाचे वर्तन कसे आहे याची जाण आपणास असली पाहिजे.

**शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा। कांहीं येक कळे दक्षा। मनोगत नतद्रक्षा। काय कळे।।११।।**

दुसऱ्याच्या बोलण्यावरून त्याच्या अंतरंगातील विचारांची परीक्षा दक्ष किंवा सावध माणसाला करता येते. नतद्रष्ट (किंवा कोत्यादृष्टीच्या) लोकांना मनोगत काय कळणार?

**दुसऱ्यास शब्द ठेवणें। आपला कैपक्ष[३] घेणें। पाहों जातां लोकिक लक्षणें। बहुतेक ऐसीं।।१२।।**

लोकांना नावे ठेवावयाची आणि आपली आपणच तरफदारी करावयाची हा बहुतेकांचा स्वभावच असतो. (अहंभाव हाच ज्यांचा स्थायीभाव आहे त्यांच्या संबंधातील श्रीसमर्थांचे हे अचूक निरीक्षण आहे.)

**लोकीं बरें म्हणायाकारणें। भल्यांस लागतें सोसणें। न सोसितां भंडवाणें[४]। सहजचि होये।।१३।।**

लोकांनी आपणास भले म्हणावे अशी ज्या सज्जनाची इच्छा असेल त्याला लोकांसाठी झिजावे लागते. अशी झीज जो सोसत नाही त्याची फजिती होते म्हणजेच त्याचा बोजवारा उडतो.

**आपणास जें मानेना। तेथें कदापि राहावेना। उरी तोडून जावेना[५] । कोणीयेकें।।१४।।**

आपणास ज्या लोकांचे रूचत नाही तेथे आपण राहूच नये पण भिडेखातर काही लोकांना ती जागा सोडून जाववत नाही. त्यामुळे इतरांचे मन मोडेल अशी धास्ती त्यांना वाटते.

**बोलतो खरें चालतो खरें। त्यास मानिती लहानथोरें। न्याये अन्याये परस्परें। सहजचि कळे।।१५।।**

जो खरे बोलतो व त्याप्रमाणे वागतो त्याला सारे लहान थोर मान देतात. योग्य अथवा अयोग्य याचा निवाडा मग आपोआपच लागतो.

**लोकांस कळेना तंवरी। विवेकें क्ष्मा जो न करी। तेणेंकरितां बराबरी। होत जाते।।१६।।**

आपली वास्तविक योग्यता लोकांना जोवर समजली नाही तोवर शहाण्या माणसाने विवेकपूर्वक क्षमाशील राहावे. असे केले नाही तर मग शहाणा मनुष्य आणि अन्य जन यात फरक तो काय राहिला?

**जंवरी चंदन झिजेना। तंव तो सुगंध कळेना। चंदन आणि वृक्ष नाना। सगट होती।।१७।।**

जोपर्यंत चंदन झिजत नाही तोवर त्याचा सुगंध कळत नाही. चंदन आणि इतर झाडांचे लाकूड हे सारखेच वाटते.

**जंव उत्तम गुण न कळे। तों या जनास काये कळे। उत्तम गुण देखतां निवळें। जगदांतर।।१८।।**

२) कळो वाढती – कलह वाढतात. ३) कैपक्ष – कैवार ४) भंडवाणे – फजिती ५) उरी तोडून जावेना – भांडण करून जाऊ नये.

त्याप्रमाणे जोपर्यंत माणसाचे उत्तम गुण प्रगट झालेले नसतात तोपर्यंत लोकांना त्याची योग्यता कळत नाही. एकदा ते गुण प्रगट झाले म्हणजे लोकांचे त्याच्याबद्दलचे मत चांगले बनते. (पूर्वीचे त्याच्याबद्दलचे दुषित ग्रह निवळतात.)

**जगदांतर निवळत गेलें। जगदांतरी सख्य जालें। मग जाणावें वोळले[६] । विश्वजन।।१९।।**

लोकांचे अंतरंग निवळून आपल्याबद्दल चांगले जनमत तयार झाले की लोक आपणावर संतुष्ट होतात असे ओळखावे.

**जनींजनार्दन वोळला। तरी काये उणें तयाला। राजी राखावें सकळांला। कठीण आहे।।२०।।**

अशाप्रकारे जनताजनार्दन ज्याच्यावर संतुष्ट असेल त्याला काहीही कमी पडत नाही. पण जनतारूपी या जनार्दनाला खूष ठेवणे सोपे नाही. (भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या सर्व लोकांना वश करणे हे सामान्य काम नव्हे हे एक मार्मिक निरीक्षण आहे.)

**पेरिलें तें उगवतें। उसिणें द्यावें घ्यावें लागतें। वर्म काढिता भंगतें। परांतर।।२१।।**

पेरावे ते उगवते त्याप्रमाणे जसे कर्म करावे तशी फळे मिळतात. उसने काही घेतले तर फेडावे लागते. कोणाचे गुपित फोडले तर त्याचे मन दुखावते (व त्याचे परिणाम आपणास भोगावे लागतात.)

**लोकिकीं बरेंपण केलें। तेणें सौख्य वाढलें। उत्तरासारिखें आलें। प्रत्योत्तर।।२२।।**

आपण इतरांशी चांगले वर्तन केले तर आपले सुखही वाढते. (कारण त्यामुळे इतरही आपणाशी सुखद व्यवहार करू लागतात.) आपल्या उत्तराप्रमाणे प्रत्युत्तर येते. (अहो कांहो, अरे कारे । जनी ऐंकिजेतें किं रे। कळत असतांच कां रे । निकामीपण ।। १४-६-१७)

**हें आवघें आपणांपासीं। येथें बोल नाहीं जनासी। सिकवावें आपल्या मनासी। क्षणक्षणा।।२३।।**

हे सर्व वागणे आपल्या हाती आहे याबद्दल लोकांना दोषी धरता येणार नाही म्हणून (सद्वर्तन करण्यासाठी) आपणच आपल्या मनाला एकसारखे शिकवीत असावे. ( How to win friends and influence people या Dale Carnegie यांच्या जगन्मान्य पुस्तकात हेच लिहिले गेले आहे. त्याच्या अगोदर दोन शतके श्रीसमर्थांनी हाच उपदेश केला पण प्रादेशिक भाषेमुळे तो विश्वजनापर्यंत जाऊ शकला नाही.)

**खळ दुर्जन भेटला। क्षमेचा धीर बुडाला। तरी मोनेंचि स्थळत्याग केला। पाहिजे साधकें।।२४।।**

काही वेळा खळ-दुर्जनांशीच आपली भेट होते. त्यावेळी क्षमावृत्तीचा तोल सांभाळणे आपणास अशक्य होते. अशावेळी साधना ज्याला करावयाची आहे त्याने मौन पाळून तेथून दूर निघून जावे.

**लोक नाना परीक्षा जाणती। अंतरपरीक्षा नेणती। तेणें प्राणी करंटे होती। संदेह नाहीं।।२५।।**

लोक वरवरच्या खुणांवरून दुसऱ्याची पारख करतात पण परांतराची नेमकी अवस्था काय आहे याची परीक्षा मात्र करू शकत नाहीत त्यामुळे भाग्यहीन ठरतात हे नि:संशय होय. (वर्तणुकीवरून माणसांची अंतरस्थिती काहीशी समजता येते असे मानसशास्त्र सांगते. माणसाच्या हस्ताक्षरावरून किंवा त्याच्या स्वाक्षरी करण्याच्या पद्धतीवरूनही व्यक्तीचा अंदाज कसा करावा याबद्दल आधुनिक काळात संशोधन सुरू आहे म्हणे! तथापि माणसाचे अंतरंग हे पूर्णपणे आकलन करणे हे नि:संशय चातुर्याचेच काम आहे.)

६) वोळले - प्रसन्न झाले.

**आपणास आहे मरण। म्हणौन राखावें बरेंपण। कठिण आहे लक्षण। विवेकाचें।।२६।।**

आपणास एक दिवस जायचे आहे याचे स्मरण म्हणून सर्वांशी चांगले संबंध ठेवावे. पण या विवेकाचे अनुसंधान नित्य राखणे कठीण असते. (मायादेवीच्या साम्राज्याखालील या जगात स्वत:च्या मरणाची सुद्धा माणसाला विस्मृती होते. त्यामुळे अंतकाळपर्यंत कठोर व्यवहार तो करीत रहातो. शेवटी भ्रमनिरास होतो पण त्यावेळी फार उशीर झालेला असतो.

'येथील येथें अवघेंचि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें ।

कोण काये घेऊन जातें । सांगना का ।। १२-८-२८।।

साधकांना उद्देशून २४ ते २६ या ओव्या विशेषत्त्वाने दिसतात. समासाच्या प्रारंभी ''निस्पृह हो'' ही हाक त्यांना दिलेली आहेच.)

**थोर लहान समान। आपले पारिखे सकळ जन। चढतें वाढतें सनेधान। करितां बरें।।२७।।**

लहान, थोर, आपल्या वयाच्या, आपल्या आणि परक्या अशा सर्व लोकांशी चढती वाढती मैत्री ठेवावी हे चांगले.

**बरें करितां बरें होतें। हें तों प्रत्ययास येतें। आतां पुढें सांगावें तें। कोणास काये।।२८।।**

आपण दुसऱ्याचे बरे केले तर दुसरेही आपले चांगले होईल असे वागतात  हा अनुभव (प्रत्यय) येतो. यापेक्षा आणखी जास्त काय सांगू?

**हरिकथानिरूपण। बरेपणें राजकारण। प्रसंग पाहिल्याविण। सकळ खोटें।।२९।।**

भगवंताची कथा असो की निरूपण, किंवा चांगल्या कामासाठी राजकारण असो, ते प्रसंग ओळखूनच करावे (अन्यथा ते अनिष्ट किंवा निष्फळ ठरण्याची शक्यता असते. जाणपण निरूपण द. ९-४ यामध्ये जाणतेपणाची महति विस्ताराने सांगितली आहे ''नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।।'' ९-४-३५) अजाणतेपणे राजकारण करताना ते उघडकीस आले तर शत्रू आपला अपमान करून प्राणही घेतो. (द.११-५-४ ही ओवी २९ व्या ओवीला समानार्थी आहे.)

**विद्या उदंडचि सिकला। प्रसंगमान चुकतचि गेला। तरी मग तये विद्येला। कोण पुसे।।३०।।**

एखाद्याने खूप विद्या संपादन केली खरी पण जर तिचा उपयोग योग्य वेळी योग्य प्रकारे करता आला नाही तर तिचा उपयोग काय? जी विद्या उपयोगी पडत नाही ती वाया जाते अशा विद्येला कोण विचारतो? कोणत्या प्रसंगी काय बोलावे व काय बोलू नये याचीही जाण पाहिजे. भोजनाची पंगत बसली असता 'जनी भोजनीं नाम वाचे वदावें' या सारखा श्लोक म्हणावा पण त्याऐवजी 'मना पाहतां सत्य हे मृत्यभूमी' हा श्लोक म्हटला तर भोजनाचा आनंदच नष्ट होईल. प्रसंग कोणता आहे याची जाण नसणारे कितीतरी विद्वान आढळतात. शोकसभेमध्ये काय बोलावे आणि मृतव्यक्तीबद्दल काय बोलू नये हे सुद्धा काही लोकांना कळत नाही. त्यांनी मिळविलेल्या पदव्यांचा मग काय उपयोग?

एखाद्या रुग्णाच्या समाचारासाठी गेल्यानंतर त्याला धीर देणारे चार शब्द बोलले पाहिजेत. जरी तो आजार बरा होणार नसल्याचे आपणास कळले असले तरीही त्याला सत्य परिस्थिती सांगणे योग्य नाही पण याचेही भान काही तथाकथित विद्यावंताना नसल्याचे कित्येकदा आढळते. शिकलेल्या विद्येचा प्रसंगामध्ये सुयोग्य वापर करून स्वत:चा जीव वाचविल्याची उदाहरणेसुद्धा घडतात (Knowledge becomes power when

it is used) या वचनाची तेव्हा आठवण येते. एका व्यक्तीला नागाचा दंश झाला होता. त्या नागाला त्याने ठार केले व हॉस्पिटलमध्ये त्या मृत नागालासुद्धा आपल्याबरोबर घेण्यास सांगितले. ती व्यक्ती थोड्या वेळात बेशुद्ध झाली पण दंश केलेल्या नागाची नेमकी जात कळल्यामुळे योग्य ते उपचार करून त्या व्यक्तीचे प्राण वाचविणे डॉक्टरांना शक्य झाले.

**इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे प्रत्ययनिरूपणनाम समास द्वितीय।।२।।**

## प्रश्नपत्रिका ३ री (दासबोध दशक १२ समास २ 'प्रत्ययनिरूपण' वर आधारित)

प्र. १ 'अ' स्तंभामध्ये ओवीच्या चरणाचा पूर्वार्ध दिला आहे आणि 'ब' स्तंभामध्ये उत्तरार्ध दिला आहे. त्यावरून योग्य जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| १) अचूक येत्न करवेना। | १) तंव तो सुगंध कळेना। |
| २) जंवरी चंदन झिजेना। | २) अंतरपरीक्षा नेणती। |
| ३) पेरिलें तें उगवतें। | ३) त्यास मानिती लहानथोरें। |
| ४) आपणास आहे मरण। | ४) म्हणौन केलें तें सजेना। |
| ५) लोक नाना परीक्षा जाणती। | ५) म्हणौन राखावें बरेंपण। |
| ६) बोलतो खरें चालतो खरें। | ६) उसिणें द्यावें घ्यावें लागतें। |

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा. (चूक असल्यास बरोबर विधान करा) आधारासाठी ओवी लिहा.

१) जगात एकजण सुखी तर दुसरा दु:खी असतो व याला कारण त्याचे प्रारब्ध!

२) लोकांनी आपणास सज्जन म्हणावे यासाठी लोकांचा उपद्रवही सोसावा लागतो.

३) माणसाचे सद्गुण निदर्शनास आल्यावरही जगाचे अंत:करण त्याच्याबद्दल निवळू शकत नाही.

४) दुसऱ्याला नावे ठेवायची आणि आपली तरफदारी करायची ही सामान्य लोकांची लक्षणेच आहेत.

५) माणसाच्या बोलण्यावरून त्याची मन:स्थिती दक्ष माणसाला अजमावता येते.

प्र. ३ अ) सर्वसामान्य माणसाच्या वासना व कल्पना कशा स्वरूपाच्या असतात?

ब) माणसाला अपयश येण्याचे मुख्य कारण समर्थांच्या मते कोणते?

प्र. ४ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) जो आपला ----- नेणे। तो ----- काये जाणे। ----- सांडितां दैन्यवाणे। ----- लोक।।

२) ----- जे मानेना। तेथे ----- राहावेना। ----- तोडून जावेना। कोणीयेकें।।

३) ----- आहे मरण। म्हणौन राखावें -----। कठीण आहे -----। -----।।

प्र. ५ (दा. १२-२) या समासामधील तीन ओव्यांचा एक मोठा तक्ता करून स्वत:च्या घरी लावावयाचा आहे अशी इच्छा असल्यास त्यातील कोणत्या तीन ओव्यांची निवड आपणास करावीशी वाटेल?

# स्वाध्याय ४ था : दशक २ : समास २ रा : उत्तमलक्षण

सारांश : द. २-२ हा उत्तम लक्षणांचा समास अत्यंत अभ्यासनीय आहे. 'बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये।।' यासारखा आत्मसंयमनाचा उपदेश आचरणात आणणे कठीण जात असेल, पण ज्यांना जीवनात साफल्य मिळवावयाचे आहे, आपले जीवन Life of Achievement व्हावे असे ज्यांना वाटते त्यांनी या समासाचा अभ्यास करणे अपरिहार्यच आहे. धूम्रपानाचे दुष्परिणाम जाणून त्याकाळी सुद्धा या व्यसनापासून सावध राहाण्याचा उपदेश यात आहे.

नीच गुरुंच्या माहितीमध्ये दावलमलक, पीर आणि स्वेच्छेने धर्मांतरित या तीन प्रकारांचा समावेश होतो. एकनाथ महाराज तर परधर्मीय या अर्थानेच त्या शब्दाचा उपयोग करीत ('स्वाध्याय साधना' लेखक पु. पां. गोखले हे पुस्तक अभ्यासार्थींना फार उपयुक्त ठरते. 'नीच प्राणी' ही टीप पृ. १५१ पहावी.) याच संदर्भात श्रीसमर्थांनी 'नीच यातीचा गुरु करू नये !' असे स्पष्ट बजावले आहे. समर्थांच्या काळी काही जण स्वेच्छेने 'तुरुक' गुरु करू लागले होते. हा धोका समर्थांनी अचूक हेरला होता.

देहबुद्धीमध्ये 'मी देहच आहे' अशी भावना असते तर आत्मबुद्धीमध्ये 'मी आत्माच आहे' अशी भावना होते. देहबुद्धी जाऊन आत्मबुद्धी स्थिर होणे याचे नाव परमार्थ. देहबुद्धीबद्दलचा विचार नाहीपणाने करायला सोपा तर आत्मबुद्धीबद्दलचा विचार आहेपणाने करायला सोपा असतो. देहबुद्धी सुटल्याशिवाय परमार्थ हाती लागत नाही हे जितके खरे तितकेच देहबुद्धी एकदम सुटत नाही, क्रमाक्रमाने सुटते हेही खरे. देहबुद्धी सोडण्याच्या प्रक्रियेमध्ये तिला स्वेच्छेने आवर घालणे ही पहिली पायरी आहे. ती चढण्यास मानवी जीवनात देहबुद्धी कशा रूपाने प्रगट होते हे समजले पाहिजे. म्हणून मूर्ख लक्षणांमध्ये श्री समर्थांनी देहबुद्धीचे म्हणजेच उघड्यानागड्या स्वार्थाचे दर्शन आपल्याला घडविले. नीतीचे आचरण, धर्माचे पालन आणि त्यात व्यवहाराचे जतन केले तर प्रापंचिक माणसाची देहबुद्धी सहज आवरली जाते हे ध्यानात धरून श्रीसमर्थ आता उत्तम लक्षणे सांगतात. देहबुद्धीच्या प्रगट प्रवृत्ती टाळायच्या असतात व आवरायच्या असतात. यासाठी उत्तम लक्षणे नकारपणाने सांगावी लागली.

|| **श्रीराम**||

**श्रोतां व्हावें सावधान। आतां सांगतों उत्तम गुण। जेणें करितां बाणे खुण। सर्वज्ञपणाची।।१।।**

प्रारंभीच श्रोत्यांना सावधानपूर्वक श्रवण करण्यास श्रीसमर्थ सांगत आहेत. ''श्रोत्यांनो, आता मी उत्तम गुण कोणते ते सांगत आहे ते अवधान देऊन ऐका. त्यांच्या श्रवणामुळे (प्रपंच व परमार्थ यात दोहोंबद्दल) जाण उत्पन्न होईल.''

**वाट पुसल्याविण जाऊं नये। फळ वोळखिल्याविण खाऊं नये। पडिली वस्तु घेऊं नये। येकायेकीं।।२।।**

जेथे जावयाचे असेल तेथील वाटेची माहिती विचारल्याशिवाय जाऊ नये. एखादे फळ कसले आहे हे माहिती नसता खाऊ नये. (रस्त्यात वा अन्यत्र) पडलेली एखादी वस्तू चटकन उचलून घेऊ नये.

(या ओवीचा सरळ अर्थ असा असला तरी फार मोठा आशय विचारान्ती ध्यानात येतो. परमार्थाची वाट संत ज्ञानेश्वरांनी भाष्यकारांना विचारली त्याप्रमाणे संताचे मार्गदर्शन घ्यावे. साधनेचे फळ ओळखावे पण सिद्धी प्राप्त झाली तरी ती ओळखली पाहिजे पण ती उपयोगात आणू नये. एखादी सापडलेली वस्तू पटकन

उचलल्यामुळे घात होण्याचा संभव असतो आणि कदाचित चोरीचा आळ येण्याचा संभवही असतो.)

**अति वाद करूं नये। पोटीं कपट धरूं नये। शोधल्याविण करूं नये। कुळहीन कांता।।३।।**

फार वादविवाद करू नये. पोटामध्ये कपटीभाव असू नये. विवाहापूर्वी मुलीच्या कुलशीलाची माहिति घेतल्याशिवाय लग्न करू नये. (माणसाने वादंग माजवू नये याबाबतीत 'तुटे वाद संवाद तो हीतकारी।' हे मनाचे श्लोक सर्वांनी वाचावे. 'तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।' सुखसंवाद अवश्य करावा. कपटकर्माची फळे चांगली नसतात मात्र दुसऱ्याच्या मनातील कपट ओळखले पाहिजे. कुलशीलाची चौकशी, वधू आणि वर उभयपक्षांनी करावी नाहीतर 'काझी' प्रकरण उद्भवेल. ''तो मी नव्हेच'' या नाटकाचा सारांश हाच नाही का?)

**विचारेंविण[1] बोलों नये। विवंचनेविण चालों नये। मर्यादेविण हालों नये। कांहीं येक।।४।।**

पूर्व विचार केल्याशिवाय बोलू नये. एखादी गोष्ट करण्यापूर्वी सांगोपांग विचार केल्याशिवाय करू नये. कृति करण्यापूर्वी तिची मर्यादा ओळखावी. स्थळकाळाचे बंधन, नीतिन्यायाच्या मर्यादा ध्यानात घ्याव्या. (विचार न करिता जें केंलें । तें तें वाउगे वेर्थ गेलें । म्हणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ।। १०-९-२७ या ओवीचे स्मरण येथे येते. 'पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि न ये उणें । कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो।।)

**प्रीतीविण रुसों नये। चोरास वोळखी पुसों नये। रात्री पंथ क्रमूं नये। येकायेकीं।।५।।**

ज्याच्यावर रूसावयाचे असेल त्याच्या मनामध्ये आपल्याबद्दल प्रीतीचा जिव्हाळा असला पाहिजे. तोच मुळात नसेल तर ते रूसणे, फुगणे किंवा अबोला धरणे व्यर्थ होते. चोराला ओळख विचारू नये. (प्रवासात अगर अन्य व्यवहारात) एकाएकी दुसऱ्यावर विश्वास टाकणे धोक्याचे ठरते. एखादी लबाड व्यक्ती नाहक सलगी करून आपल्या नात्यागोत्याचे पत्ते टिपून घेत असेल तर मनात संशय आला पाहिजे. दक्ष मनुष्याला अंतरपरीक्षा थोडी तरी करता येते. चोर बहुधा खोट्या ओळखी देतो आणि आपली मात्र खरी बित्तंबातमी त्याआधारे काढतो. उपरा मनुष्य व चोर ओळखता आला पाहिजे. रात्री अपरात्री एकाएकी प्रवासाला निघू नये. (असे निघणे पूर्वी जसे अवघड होते तसे ते आतासुद्धा आहे. पूर्वी श्वापदकीटकांची भीती होती आता प्रवास करताना चोराचिलटांची भीती असतेच. शहरी रस्त्यांवर देखील असे गुन्हे घडतात.)

**जनीं आर्जव[2] तोडूं नये। पापद्रव्य जोडूं नये। पुण्यमार्ग सोडूं नये। कदाकाळीं।।६।।**

आर्जवी वृत्ती सोडू नये. (लीन वृत्तीने व्यवहार जसे प्रेमपूर्ण होतात तसे तोऱ्यात बोलण्याने होत नाहीत.) भ्रष्टाचारी मार्गाने पैसा मिळवू नये. सन्मार्ग सोडणे केव्हाही श्रेयस्कर नसते.

**निंदा द्वेष करूं नये। असत्संग धरूं नये। द्रव्यदारा हरूं नये। बळात्कारें।।७।।**

परनिंदा आणि द्वेष करू नये. दुर्जनांची संगत टाळावी. दुसऱ्याचे द्रव्य किंवा परस्त्री सामर्थ्याच्या जोरावर हरण करू नये.

**वक्तयास खोदूं[3] नये। ऐक्यतेसी फोडूं नये। विद्याअभ्यास सोडूं नये। कांहीं केल्या।।८।।**

एखाद्या सभेमध्ये वक्त्याला आडवेतिडवे प्रश्न विचारू नयेत. लोकात दुही उत्पन्न होऊ देऊ नये. आपला विद्याव्यासंग काही झाले तरी सोडून देऊ नये. (विद्येची उजळणी न केल्यास ती विद्या व्यर्थ जाते.)

---

१) विचारेंविण - पूर्ण चर्चेशिवाय २) आर्जव - नम्रता ३) खोदूं - खंडण करणे, टीका करणे

**तोंडाळासि भांडो नये। वाचाळासी तंडों नये। संतसंग खंडूं नये। अंतर्यामीं।।९।।**

मर्यादा न राखता बोलणारास तोंडाळ म्हणतात. त्याच्याशी भांडण होऊ देऊ नये तसेच जो बाष्कळपणे बडबडतो त्याच्याशी वाद घालू नये.

(या दोहोंमुळे मन:शांती नष्ट होते. बाचाबाची हा शब्दच फार अर्थपूर्ण आहे. तोंडाळ माणसे भांडणात पितरांचासुद्धा उद्धार करतात त्यामुळे मन:स्ताप फार होतो. त्यांना मात्र स्वत:ला काहीच वाटत नाही.) संतसंग मनामध्ये असावा. संत हे त्यांच्या वाङ्मयरूपात अमरच असतात. त्या वाङ्मयाचे चिंतन होत असताना संतसंगाचा आनंद लाभतो.

**अति क्रोध करूं नये। जिवलगांस खेदूं नये। मनीं वीट मानूं नये। सिकवणेचा।।१०।।**

(व्यवहारात रागाचे प्रसंग येतात पण) अतिशय क्रोध करू नये. (मानसशास्त्र सांगते की क्रोधामुळे हृदयाचे ठोके वाढतात त्यामुळे रक्तदाबही वाढतो. त्यामुळे शारीरिक आरोग्याच्या दृष्टीनेही राग अनावर होणे हे चांगले नसते.) जिवलगांना दु:ख होईल असे काही करू नये. कोणी आपल्या भल्यासाठी काही शिकवणीचे शब्द सांगितले तर त्यांचा तिरस्कार करू नये. (कदाचित शिकवण आपणास अप्रस्तुत वाटली तरी त्यामागील हेतूकडे सहृदयतेने पाहावे.)

**क्षणक्षणां रुसों नये। लटिका पुरुषार्थ बोलों नये। केल्याविण सांगों नये। आपला पराक्रमु।।११।।**

क्षणक्षणाला रागावू नये. खोटी प्रौढी मिरवू नये. (त्यातून जो अहंकार प्रगट होतो त्यामुळे माणसे आपला तिरस्कारच करू लागतात.) पराक्रमाचे कृत्य हातून घडले असेल तरच सांगावे. (हिंमतीची कथा इतरांनाही प्रेरणा देते. श्रीसमर्थांची शिकवण अत्यंतिक निवृत्तिवादाची नसल्याचे दिसून येते. समाजामध्ये ''पौरुषाची साधना'' झाली पाहिजे. कोणताही अन्याय निमूटपणे सहन करणारी भेकड प्रजा त्यांना नको होती. अजिबातच राग न येणारा आणि निस्तेज समाज त्यांना अभिप्रेत नव्हता.)

**बोलिला बोल विसरों नये। प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये। केल्याविण निखंदूं[४] नये। पुढिलांसि कदा।।१२।।**

दिलेला शब्द पाळावा. वेळप्रसंगी स्वबळाचा उपयोग करण्यास कचरू नये. (बावळा शिष्य समर्थांना नको आहे हे दर्शविणारी ही ओवी आहे.) आपण करून दाखविल्याशिवाय इतरांना लागेल असे बोलू नये.

**आळसें सुख मानूं नये। चाहाडी मनास आणूं नये। शोधल्याविण करूं नये। कार्य कांहीं।।१३।।**

आळसात मशगूल राहू नये. (एखाद्याच्या पश्चात त्याच्याबद्दल कागाळी करणे याला चहाडी करणे म्हणतात.) चहाडी करण्याची कल्पनासुद्धा मनात आणू नये. (कारण ज्याच्या अपरोक्ष कागाळी केली जाते त्याला स्वत:ची बाजू मांडण्याची संधीच नसते.) कोणतेही काम करण्यापूर्वी त्याचे स्वरूप नीट समजावून घ्यावे आणि मगच कामाला हात घालावा. (हाच विचार ४ थ्या ओवीत आला आहे.)

**सुखा आंग देऊं नये। प्रेत्न पुरुषें सांडू नये। कष्ट करितां त्रासों नये। निरंतर।।१४।।**

शरीराला सुखवस्तू बनवू नये, अपयश आले तरी प्रयत्न सोडू नये. कष्ट करीत असताना त्रासून जाऊ नये; नेहमी प्रसन्न वृत्ती ठेवून कष्ट करावे. (ओव्या म्हणत दळणकांडण करण्याची पद्धती हेच शिकवून जाते.)

**सभेमध्यें लाजों नये। बाष्कळपणें बोलों नये। पैज होड घालूं नये। कांहीं केल्या।।१५।।**

सभेत धीटपणाने बोलावे पण अर्थहीन बडबड करू नये. काही झाले तर पैज लावू नये. (भलतीच पैज

४) निखंदूं - निषेध करणे

भावनेच्या भरात लावली जाते आणि हरल्यावर अपमानास्पद प्रसंग येतो.)

**बहुत चिंता करूं नये। निसुगपणें[५] राहों नये। परस्त्रीतें पाहों नये। पापबुद्धी।।१६।।**

नित्य चिंता करू नये. आळसात लोळत राहू नये. परस्त्रीकडे वाईट वासनेने पाहू नये. (पाप प्रथम मनात येते त्यावर तत्काळ नियंत्रण घालावे म्हणजे रावणासारखे दुष्कृत्य हातून होत नाही. अध्यात्मामध्ये चित्तशुद्धीवर भर दिला जातो तो याच कारणाने.)

**कोणाचा उपकार घेऊं नये। घेतला तरी राखों नये। परपीडा करूं नये। विस्वासघात।।१७।।**

अगोदर कोणाचा उपकार घेऊ नये आणि घ्यावा लागलाच तर त्याची परतफेड करावी. लोकांना त्रास देऊन दु:खी करू नये. त्यांचा विश्वासघातही करू नये.

**शोच्येंविण[६] असों नये। मळिण वस्त्र नेसों नये। जाणारास पुसों नये। कोठें जातोस म्हणौनी।।१८।।**

स्वच्छतेशिवाय असू नये. मळलेले वस्त्र नेसू नये. (श्रीसमर्थांनी यात्रेमध्ये गोसावड्यांची गलिच्छ राहाणी पाहिली होती.) कोणी कामासाठी बाहेर निघाला असल्यास त्यास 'कोठे जातोस' असे विचारून हटकू नये.

**व्यापकपण सांडूं नये। पराधेन होऊं नये। आपलें वोझें घालूं नये। कोणीयेकासी।।१९।।**

आपले विचार विशाल, सर्वांगिण, व्यापक असावे, पराधीन जिणे नसावे, आपले ओझे दुसऱ्यावर घालू नये.

**पत्रेंविण[७] पर्वत करूं नये। हीनाचें रुण घेऊं नये। गोहीविण[८] जाऊं नये।। राजद्वारा।।२०।।**

देण्याघेण्याचे मोठे व्यवहार दस्तऐवजीविण करू नये. (चांगली सभ्य मानली जाणारी माणसेसुद्धा प्रसंगी विश्वासघात करतात. तेव्हा व्यवहारामध्ये कागदपत्र साक्षीसाठी हवेतच.) वृत्तीने हलक्या असलेल्या (हीनवृत्तीच्या) माणसाकडून कर्ज घेऊ नये. (वेळप्रसंगी चारचौघात त्याचा उच्चार अशी माणसे करतात आणि आपली मानहानी होते किंवा त्या कर्जाच्या ओझ्याखाली कुकर्म करण्यास आपणास भाग पाडले जाते. महाभारतात कर्णाचे उदाहरण आहे.) साक्षीचा प्रसंग आला असेल तरच राजदरबारी जावे.

**लटिकी जाजू घेऊं नये। सभेस लटिकें करूं नये। आदर नस्तां बोलूं नये। स्वाभाविक।।२१।।**

क्षुल्लक कारणासाठी (जाजू = वितंडवाद) हुज्जत घालू नये. सगळी सभा खोटी असे म्हणू नये. (सभेमध्ये अनेक बुद्धिमान, विचक्षण लोक मते मांडतात त्यांना सर्वांना खोटे म्हणणे अविचार होय.) आपल्याबद्दल जेथे आदर नसतो तेथे सहजपणे आपण (बोलतो पण त्याची टिंगल होते म्हणून) बोलू नये.

**आदखणेपण[९] करूं नये। अन्यायेंविण गांजूं नये। अवनीतीनें वर्तों नये। आंगबळें।।२२।।**

(कर्तव्याकडे किंवा महत्त्वाच्या गोष्टीकडे) डोळेझाक करू नये. कोणी अन्याय केला तरच त्यास त्रास द्यावा. अंगामध्ये ताकद आहे म्हणून हलकटपणाने वागू नये.

**बहुत अन्न खाऊं नये। बहुत निद्रा करूं नये। बहुत दिवस राहों नये। पिसुणाचेथें[१०] ।।२३।।**

(गोड लागले तरी) जास्त अन्न खाऊ नये, फार झोप घेऊ नये (आहार व निद्रा यावर नियंत्रण घालण्याचा संयम हवा.) दुष्ट माणसाकडे जरुरीशिवाय फार दिवस राहू नये.

**आपल्याची गोही देऊं नये। आपली कीर्ती वर्णूं नये। आपलें आपण हांसों नये। गोष्टी सांगोनी।।२४।।**

५) निसुगपणें - चिंतेरहित ६) शोच्येंविण - अशुद्ध ७) पत्रेविण पर्वत करू नये - दस्तऐवजाखेरीज कुणाशी देवघेव करू नये. ८) गोही - साक्ष ९) आदरवणेपण - डोळेझाक १०) पिसुणाचेथें - दुष्टाकडे

केवळ आपला मनुष्य म्हणून त्याच्यासाठी साक्ष देऊ नये. (अगदी आपली म्हटली जाणारी माणसेसुद्धा काही वेळा चुका करतात.) आपण आपलाच मोठेपणा सांगू नये. (कथाकथन करताना किंवा) कुठे हसण्यासारखा भाग सांगताना आपले आपणच हसू नये.

**धूम्रपान घेऊं नये। उन्मत्त द्रव्य सेऊं नये। बहुचकासीं[११] करूं नये। मैत्री कदा।।२५।।**

धूम्रपान घेऊ नये, मादक पदार्थ सेवू नयेत. चोंबड्या मनुष्याची (किंवा उगाचच इकडचे तिकडे करणाऱ्या माणसाची) संगत धरू नये. (आता विज्ञानदृष्टीने धूम्रपान निषिद्ध ठरविण्यात आले आहे. मद्यपानाविरुद्ध स्वातंत्र्य लढ्यापासूनच प्रचार सुरु आहे पण सुयोग्य प्रतिसाद नाही! निदान संतजनांचे तरी लोकांनी ऐकावे.)

**कामेंविण राहों नये। नीच उत्तर साहों नये। आसुदें[१२] अन्न सेऊं नये। वडिलांचेंहि।।२६।।**

नित्य कामात असावे. (मनाला कामाचे व्यवधान हवे) अपमानकारक शब्द सहन करू नयेत. (अस्मिता पाहिजे. अस्मिता हा सद्गुण आहे. अहंकार हा दुर्गुण आहे. यातील फरक समजावा. अहंभाव हा पावसाच्या पाण्यासारखा आहे, जर पाऊस मुळीच नसेल तर पीक करपून जाते. अतिवृष्टीमुळेही पीक जाते. फाजील अहंकाराने मनुष्य पशू होतो तर अहंभाव मुळीच नसेल तर तो दगडासारखा होतो.) वडिलांचेसुद्धा आयते अन्न खाऊ नये. (मिंधेपणाने खाऊ नये).

**तोंडीं सीवी असों नये। दुसऱ्यास देखोन हांसों नये। उणे अंगीं संचारों नये। कुळवंताचे।।२७।।**

बोलताना तोंडातून शिवी जाऊ नये. दुसऱ्याकडे पाहून हिणविण्याच्या हेतूने हसू नये. कुलवान व्यक्तीला (कुलाभिमान असतो) त्याला हीनत्व (किंवा कमीपणा) येईल असा दोष चिकटवू नये.

**देखिली वस्तु चोरूं नये। बहुत कृपण होऊं नये। जिवलगांसी करूं नये। कळह कदा।।२८।।**

(लोभसवाणी) दिसणारी वस्तू चोरू नये. फार कृपण होऊ नये. (कंजूसपणा आणि काटकसर यांची सीमारेषा पुसट असते. ती नीट ध्यानात घ्यावी) जिवलगांशी भांडण करू नये. (जिव्हाळ्याचे संबंध जोडण्यास अनेक वर्षे लागतात, तोडण्यास वेळ लागत नाही व ते तोडताना हृदयात खोलवर जखम होते; याचे भान ठेवले पाहिजे.)

**येकाचा घात करूं नये। लटिकी गोही देऊं नये। अप्रमाण वर्तों नये। कदाकाळीं।।२९।।**

कोणाच्या सर्वस्वाचा घात होईल असे वागू नये. खोटी साक्ष देऊ नये. (एक खोटे दडविण्यासाठी खोट्याची मालिका जोडली जाते.) सज्जनांना आणि धर्माला अमान्य असे केव्हाही वागू नये.

**चाहाडी चोरी धरूं नये। परद्वार करूं नये। मागें उणें बोलों नये। कोणीयेकाचें।।३०।।**

चोरी, चहाडी यांची इच्छाच मनात धरू नये. दुसऱ्याच्या संसारात माती कालवू नये. परस्त्रीची अभिलाषा बाळगू नये. दुसऱ्याच्या अपरोक्ष त्याचे दोष इतरांना सांगणे हा आपल्या मनाचा हलकेपणा होय म्हणून एखाद्याच्या पाठीमागे चहाडी करू नये. (खरे तर इतरांचे दोष घालविण्यासाठी प्रत्यक्ष त्या व्यक्तीस तोंडावरच शक्यतर सांगावे.)

**समईं यावा चुकों नये। सत्वगुण सांडूं नये। वैरियांस दंडूं नये। शरण आलियां।।३१।।**

वेळप्रसंगी दुसऱ्याच्या मदतीला जावे. सात्त्विकगुण सोडू नयेत. वैरी जर शरण आला तर त्याला शिक्षा

११) बहुचकासीं – वाचाळाशी १२) आसुदें – आयतें

करू नये. (ओवीच्या या दुसऱ्या चरणाबद्दल नेहमी थोडासा वाद होतो कारण इतिहासात अशी उदाहरणे आहेत की शत्रूवर दया केली की नंतर तो घात करतो. पण या समासातील उपदेश सर्वसामान्य लोकांसाठी आहे. खाजगी वैमनस्य मिटविण्याचा मार्ग म्हणून अशा वैऱ्यांनी प्रामाणिकपणे शरणागति व्यक्त केल्यावर उदार मनाने त्याना क्षमा करावी. पण राष्ट्रीय पातळीवर वागताना श्रीसमर्थांनी ''देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।'' असाच क्षात्रधर्म सांगितला आहे. ''अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संव्हार ।।'' असे म्हणणारे श्रीसमर्थ संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात ''मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।।'' पाताळयंत्री परकीय धूर्त शत्रूंशी वागण्याची पद्धत वेगळी असावी आणि स्वकीय विरोधकांशी वागण्याची रीत वेगळी असावी असा खुलासा श्रोत्यांचे समाधान करतो.)

**अल्पधनें माजों नये। हरिभक्तीस लाजों नये। मर्यादेविण चालों नये। पवित्र जनीं।।३२।।**

थोडी बहुत द्रव्यप्राप्ती होताच माजून जाऊ नये. ईश्वराची भक्ती करताना जनांची लाज बाळगू नये. (कीर्तनाचे वेळी नामघोष करावयास सांगतात तेव्हा सभ्यपणाच्या आवरणाखाली घोष करण्याची काही श्रोत्यांना लाज वाटते या निरीक्षणावर ही ओवी असावी.) पुण्यशील सात्त्विक लोकांमध्ये वावरताना मर्यादाशील वर्तन असावे. (आपल्या शंका विचारताना आदबशीर भाषा असावी.)

**मूर्खासीं संमंध पडो नये। अंधारीं हात घालूं नये। दुश्चितपणें विसरों नये। वस्तु आपुली।।३३।।**

मूर्ख लोकांशी संबंध (शक्यतो) नसावा. अंधारामध्ये हात घालू नये. चित्त थाऱ्यावर नसल्यामुळे आपली वस्तू आपण विसरतो आणि ती हरवते म्हणून सावधपणे वागावे. (दुश्चित्तपणावर दासबोधात द. ८– ६ हा पूर्ण समास आहे. पुढच्याच स्वाध्यायात द.११–३–२० ही ओवी

चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी ।

दुश्चीत आळसाची रोकडी । प्रचीत पाहा ।। अशी आहे.)

**स्नानसंध्या सांडूं नये। कुळाचार खंडूं नये। अनाचार मांडूं नये। चुकुरपणें।।३४।।**

स्नानसंध्या सोडू नये. कुळाचारात खंड पडू देऊ नये. चुकारपणाने सदाचाराकडे पाठ फिरवून अनाचाराने वागू नये.

**हरिकथा सांडूं नये। निरूपण तोडूं नये। परमार्थास मोडूं नये। प्रपंचबळें।।३५।।**

हरिकथा श्रवण सोडू नये. प्रवचने ऐकणे टाळू नये. प्रपंचाच्या आकर्षणामुळे परमार्थ सोडून देऊ नये. (प्रपंचाच्या भरवशामुळे पारलौकिक विचारांची विस्मृती होते. उशीरा डोळे उघडतात!)

**देवाचा नवस बुडऊं नये। आपला धर्म उडऊं नये। भलते भरीं भरों नये। विचारेंविण।।३६।।**

देवाला केलेला नवस विसरून जाऊ नये. स्वधर्म कधी सोडू नये. अविचाराने भलत्याच कार्याला हात घालू नये. (याच समासातील ४थ्या ओवीवरील टीप पहावी.)

(सर्वसामान्य माणसेच नव्हे तर संत देखील कठीण प्रसंगी देवाला नवस बोलतात. श्रीसमर्थांचे वडील बंधू श्रेष्ठ यानी तुळजामातेला संकटनिवारणार्थ नवस केला होता. देवीला एक पुष्प वाहाणे इतकाच नवस होता. त्यांच्या वतीने श्रीसमर्थांनी सुवर्णपुष्प तुळजामातेला अर्पण केले व नवस फेडला.)

**निष्ठुरपण धरूं नये। जीवहत्या करूं नये। पाऊस देखोन जाऊं नये। अथवा अवकाळीं।।३७।।**

कठोरपणाने वागू नये. (सृष्टीमध्ये लहानमोठे अनेक जीव आहेत) त्यांची हत्त्या करू नये. (पर्यावरणाच्या

समतोलासंबंधी सध्या जगभर चर्चा सुरु आहे त्यातूनही हीच शिकवण आधुनिक भाषेतून मांडली जाते.) पाऊस पडत असताना अथवा वेळ अयोग्य असेल तर प्रवासाला जाऊ नये. (आकाश अंधारून आले आहे, वेडावाकडा वारा सुटला आहे, विजांचा कडकडाट होऊ लागला आहे ही प्रवासाला योग्य वेळ नव्हे.)

**सभा देखोन गळों नये। समईं उत्तर टळों नये। धि:कारितां चळों नये। धारिष्ट आपुलें।।३८।।**

सभेतील श्रोत्यांची मोठी संख्या किंवा उच्च दर्जा अजमावून वक्त्याने आपले अवसान गळू देता कामा नये. वेळप्रसंगी प्रसंगावधान ठेऊन उत्तर द्यावे. लोकांनी आपली निंदा केली, अव्हेर केला तरी आपली स्थिरवृत्ती, धीरवृत्ती गमावू नये. (हजरजबाबी वक्ता असावा.)

**गुरुविरहित असों नये। नीच यातीचा गुरु करूं नये। जिणें शाश्वत मानूं नये। वैभवेंसीं।।३९।।**

गुरुवाचून असू नये पण नीचजातीचा गुरु करू नये. वैभव आणि आयुष्य ही शाश्वत मानू नये. (या ओवीच्या पूर्वार्धाचा अर्थ नीटपणे ध्यानात घेतला पाहिजे. ''नीच यातीचा गुरु करूं नये ।'' या ओवीमागील ऐतिहासिक संदर्भ पाहिला पाहिजे. मुसलमानी आक्रमणात ब्राह्मणावर धर्मांतराची सक्ती केली जात असे. कित्येक प्रलोभनामुळे धर्मान्तर करीत. कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती । कित्येक तुरुक होती । आपल्या इच्छेनें ।। १४-७-३२ ।। असे वर्णन आले आहे. ''आपण तुरुक गुरु केला । शिष्य चांभार मेळविला । नीच यातीनें नासला । समुदाव ।।'' १९-६-१३ ।।

वरील ओव्यांवरुन असे कळून येईल की जे उच्चवर्णीय ब्राह्मण लोक स्वेच्छेने धर्मान्तर करीत ते मुसलमानास गुरुपद देत आणि नंतर अन्य जातीतील लोकांनाही मुसलमानी धर्माची दीक्षा देत. यामुळे परधर्मात गेलेल्या आणि त्या धर्माचा प्रसार करणाऱ्या ब्राह्मणास त्याकाळी 'नीच जातीचा गुरु' असे म्हटले जाई. (ए. भा. १४-७)

एकनाथांच्या काळी तर 'नीच' प्राणी म्हणजे परधर्मीय असा त्या शब्दाचा अर्थ होता. शब्दांचे अर्थ शतकांच्या कालावधीनंतर बदलू शकतात. यास्तव 'नीच यातीचा गुरु करूं नये ।' असे श्रीसमर्थ जेव्हा सांगतात तेव्हा त्याचा अर्थ असा की 'स्वत: जो धर्मान्तर करतो आणि इतरांना तीच दीक्षा देतो असा गुरु करू नये.)

**सत्यमार्ग सांडूं नये। असत्य पंथें जाऊं नये। कदा अभिमान घेऊं नये। असत्याचा।।४०।।**

जीवनामध्ये सत्याचा मार्ग सोडू नये. खोट्या किंवा चुकीच्या पंथाने जाऊ नये. असत्याचा अभिमान कधीही धरू नये.

(''सत्यमेव जयते ।'' हे आपल्या देशाच्या राजमुद्रेवर कोरले आहे. या ब्रीदावर विश्वास ठेवावा. धन किंवा प्रतिष्ठा प्राप्तीसाठी भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब केला तर यशप्राप्ती झाल्यासारखी वाटेल पण तो भास असतो. सत्य हे शाश्वत असते.)

**अपकीर्ति ते सांडावी। सद्कीर्ति वाढवावी। विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची।।४१।।**

अपकीर्तीचा मार्ग सोडून द्यावा. सद्कीर्ती वाढेल असेच वर्तन करावे. विवेकाच्या आधारावर सत्याची वाट धरावी.

(परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी खूप अभ्यास करणे हा एक मार्ग तर कॉपी करणे हा दुसरा मार्ग. पहिला मार्ग खडतर आहे पण सत्याचा आहे. दुसरा मार्ग सुखासीन पण असत्याचा आहे. पारमार्थिक क्षेत्रामध्ये गुरुबाजी

करणाऱ्याचे ढोंग फार काळ टिकू शकत नाही आणि खऱ्या सद्गुरूंची कीर्ति सदैव वाढत राहाते.)

**नेघतां हे उत्तम गुण। तें मनुष्य अवलक्षण। ऐक तयांचे लक्षण। पुढिले समासीं।।४२।।**

येथवर सांगितलेले गुण घेणार नाही तो अवलक्षणी होतो त्याची लक्षणे पुढील समासामध्ये सांगितली आहेत. (या समासाचे विहंगमावलोकन केल्यास असे दिसते की 'द्रव्यदारा हरु नये । बलात्कारे ।' 'परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ।।' 'परद्वार करू नये ।' 'अवनीतीने वर्तों नये । आंगबळें ।' अशा समान आशयाच्या ५ ओव्या आढळतात. नीतिमत्तेवर श्रीसमर्थांचा भर दिसतो. मादकद्रव्ये, धूम्रपान यांचा निषेध येथे केला आहे. आपला आहार, निद्रा, बोलणे-चालणे, द्रव्यार्जन इत्यादि जीवनाच्या सर्वांगाना स्पर्श करणारा उपदेश या समासात आढळतो.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमलक्षणनाम समास द्वितीय।।२।।**

## प्रश्नपत्रिका ४ थी (दासबोध दशक २ समास २ रा 'उत्तमलक्षण' यावर आधारित)

प्र. १ अ) पुढील अर्थ ज्या ओव्यांच्या चरणात सामावला आहे त्या संपूर्ण ओव्या लिहा.

१) सत्याची वाट विवेकाच्या जोरावर पक्की धरून ठेवावी.

२) धूम्रपान आणि मादक पदार्थ सेवन करू नये.

३) परस्त्रीकडे पापी दृष्टीने पाहू नये.

४) विद्या प्राप्त करणे आणि तिची उजळणी करणे केव्हाही सोडून येऊ नये.

५) सतत कष्ट करण्याची पाळी आली तरी त्याचा त्रास मानू नये.

ब) कोणत्या हेतूने समर्थांनी उत्तम लक्षणे या समासात सांगितली आहेत?

प्र. २ एखाद्या सभेमध्ये गेल्यास वक्ता किंवा श्रोता या नात्याने आपण कोणते नियम पाळले पाहिजेत, असे या समासांत सांगितले आहे?

प्र. ३ पुढील चरणांचा अर्थ स्पष्ट करा.

१) प्रीतीवीण रुसों नये। चोरास वोळखी पुसों नये।

२) बोलिला बोल विसरों नये। प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये।

३) वैरियांस दंडूं नये। शरण आलियां।

प्र. ४ पुढील बाबतीत समर्थांचा उपदेश एका वाक्यात लिहा.

१) आपला आहार व निद्रा २) आपली वस्त्रे ३) आपले बोलणे ४) आपले द्रव्यार्जन

प्र. ५ 'या समासामधील समर्थांचा उपदेश, ऐहिक आणि पारमार्थिक दोन्ही स्वरूपाचा आहे' हे विधान स्पष्ट करा. (मर्यादा १० ओळी)

# स्वाध्याय ५ वा : दशक ११ : समास ३ रा : सिकवणनिरूपण

**सारांश :** 'सिकवण निरुपण' या समासात मानवी जीवनामधील सर्वसामान्य घटना, (बालपण अज्ञानात जाणे, तारुण्यात विषयोपभोग आणि वृद्धपणात नाना रोगांशी सामना) सांगून श्रीसमर्थ प्रश्न विचारतात, 'आता भगवंताचा योग । कोणें वेळे ।।' आणि आपणास जागृती आणतात. तथापि येथेसुद्धा केवळ पारमार्थिक स्वरूपाचाच उपदेश नाही.

'ऐक सदेवपणाचे लक्षण । रिकामा जाऊ नेदि येक क्षण ।
प्रपंच व्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ।।
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणी लावी । कांहीं तरी ।।

आळस झटकून टाकावा, इहलोकीचे भाग्यपूर्ण जीवन जगावे, इतरांना सर्व प्रकारे सहाय्य करावे, पण त्याचबरोबर....

'कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरूपण । वायां जाऊं नेदि क्षण । दोहींकडे ।।' हे सुद्धा संसारिकांना समर्थांनी बजावून सांगितले आहे. अशा 'समर्थ' विचारांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

मानवी जीवनास दोन अंगे आहेत. एक अंग प्रपंच व दुसरे अंग परमार्थ. दोन्ही अंगांची समतोल वाढ होण्यामध्ये जीवनाचे सौंदर्य साठवलेले आहे. सुंदर जीवनच यशस्वी जीवन होय. जीवनात सौंदर्य निर्माण होण्यास त्यास सुंदर घाट देणे जरूर असते. जीवनास आपल्याला हवा तसा घाट देण्यासाठी शिस्त लागते. नियम पाळल्यावाचून शिस्त लागत नाही. आळस टाकल्यावाचून शिस्त व नियम पाळता येत नाहीत. म्हणून आळस सोडून नियम पाळावे, नियम पाळून शिस्त शिकावी, आणि शिस्तीने वागून जीवनास मनोहर घाट द्यावा, असा श्रीसमर्थांचा आग्रह आहे. सामान्य माणसाने आपल्या जीवनाला सुंदर वळण कसे द्यावे, हे सांगण्यासाठी श्रीसमर्थांनी त्यांच्या काळातील माणसाच्या दिनक्रमाची एक रूपरेषा सांगितली आहे. आजच्या काळास ती जशीच्या तशी लागू पडणार नाही. पण तिच्यामध्ये काही सर्वकालीन तत्त्वे आहेत, ती अशी – १) जीवन यशस्वी होण्यास प्रपंच व परमार्थ दोन्ही पाहिजेत. २) आळसाने जीवनाची नासाडी होते. आळसासारखा शत्रू नाही. ३) सकाळी लवकर उठावे. ४) सकाळी आत्मचिंतन करावे. ५) सकाळी पाठांतर करावे. ६) गोड वाणीने लोक खूष ठेवावे. ७) आपल्या व्यवसायामध्ये खबरदार असावे. ८) आपले कमावून आपण खावे. समाजाचे फुकट खाऊ नये. ९) ग्रंथ वाचन करून त्यावर मनन करावे. १०) आपल्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान असावे. ११) अडचणीत सापडलेल्या माणसांना मदत करावी. १२) दुसऱ्यांसाठी शरीर थोडेतरी कष्टवावे. १३) भगवंताचे आपण विश्वस्त आहोत या भावनेने प्रपंच करावा. १४) प्रपंचामध्ये पोटापुरता पैसा अवश्य असावा. १५) परमार्थामध्ये आपला आपण शोध घ्यावा. ही पंधरा मण्यांची माळा जो गळ्यात घालून जीवन जगेल त्याचे जीवन धन्य होईल असा श्रीसमर्थांचा अभिप्राय आहे.

।। **श्रीराम**।।

**बहुतां जन्मांचा सेवट। नरदेह सांपडे अवचट। येथें वर्तावें चोखट। नीतिन्यायें।।१।।**

अनेक जन्मांनंतर योगायोगाने जीवाला नरदेह प्राप्त होतो. (जीवात्मा हा भवसागरातील एक प्रवासी आहे.

ही कल्पना यातून स्पष्ट होते.) येथे नीतीन्यायाने व प्रामाणिकपणाने वागावे.

**प्रपंच करावा नेमक[१] । पाहावा परमार्थविवेक। जेणेंकरितां उभयलोक। संतुष्ट होती।।२।।**

प्रमाणशीर असा प्रपंचाचा व्याप ठेवावा आणि परमार्थाचाही अभ्यास करावा. इहलोक आणि परलोक हे दोन्ही त्यामुळे साधतील.

**शत वरुषें वय नेमिलें। त्यांत बाळपण नेणतां गेलें। तारुण्य अवघें वेंचलें[२] । विषयांकडे।।३।।**

सामान्यपणे माणसाचे आयुष्य शंभर वर्षे मानले तर त्यातील बालपणाचा काळ अज्ञानात जातो. तारुण्याचा काळ विषयोपभोगात जातो.

**वृद्धपणीं नाना रोग। भोगणें लागे कर्मभोग। आतां भगवंताचा योग। कोणे वेळे।।४।।**

वृद्धपणी अनेक प्रकारचे रोग शरीराला लागतात. पूर्वजन्मातील कर्माप्रमाणे भोग भोगावे लागतात. (असे सर्व आयुष्य जात असते) त्यामुळे ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्यास अवकाशच उरत नाही.

**राजिक देविक उदेग[३] चिंता। अन्न वस्त्र देहममता। नाना प्रसंगें अवचिता। जन्म गेला।।५।।**

जीवनामध्ये राजकर्त्याकडून पीडा सोसावी लागते, दैवी आपत्ती, उद्वेग, काळज्या, अन्नवस्त्राची चिंता, देहावरील ममतेमुळे होणारे दुःख इत्यादि अनेक प्रसंगाना सामोरे जावे लागते, त्यात आयुष्य कसे संपून जाते ते कळतच नाही.

**लोक मरमरों जाती। वडिलें गेलीं हे प्रचिती। जाणत जाणत निश्चिती। काये मानिलें।।६।।**

लोक एका पाठोपाठ एक सतत मरत असतात. वडील माणसे गेलेली प्रत्यक्ष दिसतात. हे सगळे ठाऊक असल्याने कशाचीच शाश्वती देता येत नाही (जमाना बदलला नवे युग सुरु झाले असे आपण म्हणतो पण वरील तीन ओव्यात वर्णिलेल्या जीवनक्रमात असा कोणता फरक पडला आहे? ही सर्व अशाश्वतता ध्यानात आणून दिल्यावर पुढे श्रीसमर्थ म्हणतात..........

**अग्न गृहासी लागला। आणि सावकास निजेला। तो कैसा म्हणावा भला। आत्महत्यारा।।७।।**

एखाद्या घराला आग लागली असताना जर एखादा मनुष्य त्यात खुशाल झोपून राहिला तर त्याला शहाणा म्हणता येईल का? त्याने असे केल्यामुळे जणू आत्महत्या करून घेतली. म्हणून 'आत्महत्यारा' हेच विशेषण त्याला लागेल.

**पुण्यमार्ग अवघा बुडाला। पापसंग्रह उदंड जाला। येमयातनेचा झोला[४]। कठिण आहे।।८।।**

जीवनात पुण्यमार्ग सोडून दिला तर उदंड पापसंग्रह होईल. त्यामुळे मृत्यूनंतर मिळणाऱ्या यमयातनेचा हिसका सोसवणार नाही.

**तरी आतां ऐसें न करावें। बहुत विवेकें वर्तावें। इहलोक परत्र साधावें। दोहींकडे।।९।।**

म्हणून असे वागू नये. खूप विवेकाने वागावे. इहलोक आणि परलोक (किंवा प्रपंच व परमार्थ) योग्यरीतीने करावा.

**आळसाचें फळ रोकडें। जांभया देऊन निद्रा पडे। सुख म्हणौन आवडे। आळसी लोकां।।१०।।**

आळसाचे फळ तत्काळ दिसते. जांभया येऊन माणूस निद्राधीन होतो. आळशी लोकांना झोप हेच सुख

१) नेमक – नितिनियमाने २) वेंचलें – खर्च केले ३) उदेग – उद्वेग ४) झोला – धक्का

वाटते म्हणून ती आवडते.

**साक्षेप करितां कष्टती। परंतु पुढें सुरवाडती[५] । खाती जेविती सुखी होती। येत्नेंकरूनी।।११।।**

याउलट उद्योग करताना माणसाला सुरुवातीला कष्ट वाटतात पण नंतर सुख मिळते. उद्योगी माणसे चांगले खाऊन पिऊन सुखी होतात.

**आळस उदास नागवणा। आळस प्रेत्नबुडवणा। आळसें करंटपणाच्या खुणा। प्रगट होती।।१२।।**

आळस हा माणसाला नागवणारा, उत्साह घालवणारा, प्रयत्न नाहिसा करणारा असतो. आळसामुळे दुर्भाग्याची लक्षणेच जणू प्रगट होतात (आळशी माणूस भाग्यहीन होतो. त्यास करंटा असा शब्द उपयोजितात. सर्व काही अनुकूल असतानासुद्धा जो काही प्रयत्नच करीत नाही त्याला करंटा म्हणतात. जमीन आहे, विहीर आहे, मोट आहे पण पीक काढण्याचे प्रयत्नच केले नाहीत तर तो करंटा. कोणतीही साधनेच नाहीत तर तो नुसता दुर्दैवी, असा फरक दोन शब्दात आहे.)

**म्हणौन आळस नसावा। तरीच पाविजे वैभवा। अरत्रीं परत्रीं जीवा। समाधान।।१३।।**

म्हणून आळशीपणाने वागू नये तरच वैभव मिळेल आणि प्रपंच व परमार्थ यात समाधान प्राप्त होईल.

**प्रेत्न करावा तो कोण। हेंचि ऐका निरूपण। सावध करून अंत:करण। निमिष्य येक।।१४।।**

माणसाने प्रयत्न करावा म्हणजे नेमके काय करावे हे आता सांगतो, मनाचे अवधान ठेऊन क्षणभर तरी ऐका.

**प्रात:काळीं उठावें। कांहीं पाठांतर करावें। येथानशक्ति आठवावें। सर्वोत्तमासी।।१५।।**

सकाळी लवकर उठावे. काहीतरी पाठान्तर करावे आणि आपल्या (जास्तीत जास्त) शक्तीनुसार ईश्वरस्मरण करावे.

**मग दिशेकडे जावें। जे कोणासिच नव्हे ठावें। शौच्य आच्मन करावें। निर्मळ जळें।।१६।।**

मग शौच्यासाठी (गावापासून) लांब कोठेतरी जावे. नंतर स्वच्छ पाण्याने हातपाय धुवावे व आचमन (थोडेसे जलपान) करावे. (या साध्या गोष्टीसुद्धा शिकवाव्या लागतात का? असे वाचकांना वाटेल पण अजूनही कितीतरी ग्रामीण लोक हे करत नाहीत. पाण्यात जलदेवता असतात त्या रुष्ट होतील या अंधश्रद्धेने शौच्यासाठी पाणी न नेणारे आदिवासी अजून आहेत.)

**मुखमार्जन प्रात:स्नान। संध्या तर्पण देवतार्चन। पुढें वैश्यदेव उपासन। येथासांग।।१७।।**

मग तोंड धुवावे, प्रात:स्नान करावे, त्यानंतर संध्या, पितृतर्पण (पितरांना शांतीसाठी उदकदान) व देवाची पूजा करावी आणि शास्त्रानुसार वैश्वदेव करावा.

**कांहीं फळाहार घ्यावा। मग संसारधंदा करावा। सुशब्दें राजी राखावा। सकळ लोक।।१८।।**

नंतर थोडासा फलाहार घेऊन आपला व्यवसाय करण्यासाठी जावे. तेथे सर्व संबंधितांशी गोड शब्द बोलून त्यांना संतुष्ट करावे.

(याप्रमाणे श्रीसमर्थांनी क्रमवार जी दिनचर्या सांगितली आहे ती बदललेल्या जमान्यामध्ये जशीच्या तशी ठेवता येणार नाही पण तिच्यातील योग्य गोष्टींचा अवलंब करावा.)

५) सुरवाडती – सुखी होती ६) वेढा लावी – फसवी

**ज्या ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबर्दार। दुश्चितपणें तरी पोर। वेढा[६] लावी।।१९।।**

प्रत्येकाचा जो व्यवसाय असेल तो खबरदारीने, सावधपणे आणि कौशल्याने करावा. नाहीतर एखादे लहान पोरसुद्धा आपणास ठकवून जाईल.

**चुके ठके विसरे सांडी। आठवण जालियां चर्फडी। दुश्चीत आळसाची रोकडी। प्रचित पाहा।।२०।।**

(चित्त ठिकाणावर नसलेल्या) व्यग्रचित्त आणि आळशी माणसाला त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. कामात चुका होणे, फसविले जाणे, एखादी वस्तू विसरणे, किंवा लवंडणे म्हणजेच गैरसावधपणाचा व्यवहार होय. तो घडल्यावर मनुष्य आपल्या स्वत:वरच कातावतो.

**याकारणें सावधान। येकाग्र असावें मन। तरी मग जेवितां भोजन। गोड वाटे।।२१।।**

म्हणून माणसाने आपल्या व्यवसायात एकाग्र चित्ताने काम केले पाहिजे. भोजन करतानासुद्धा व्यग्रचित्त नसावे तरच ते गोड लागते.

**पुढें भोजन जालियांवरी। कांहीं वाची चर्चा करी। येकांतीं जाऊन विवरी। नाना ग्रंथ।।२२।।**

भोजन झाल्यानंतर काही वाचावे, चर्चा करावी. एकान्तामध्ये ग्रंथाचा अभ्यास करावा. (चार चौघात बसून अभ्यास उत्तमप्रकारे होऊ शकत नाही.)

**तरीच प्राणी शाहाणा होतो। नाहींतरी मूर्खचि राहातो। लोक खाती आपण पाहातो। दैन्यवाणा।।२३।।**

असे वागले तरच विचारशक्तीची वाढ होऊन मनुष्य शहाणा होतो नाहीतर तो अडाणीच राहातो. लोक वैभवाचा उपभोग घेत असताना त्यांच्याकडे नुसते आशाळभूतपणे पाहात राहाण्याचा प्रसंगच त्याच्यावर येतो.

**ऐक सदेवपणाचें[७] लक्षण। रिकामा जाऊं नेदी येक क्षण। प्रपंचवेवसायाचें ज्ञान। बरें पाहे।।२४।।**

जीवनातील एकही क्षण वाया न दवडणे हेच भाग्याचे लक्षण आहे हे ध्यानात ठेवावे. प्रपंचातील व्यवसायाचे उत्तमोत्तम ज्ञान आपणास असावे. (अमेरिकेमध्ये 'प्रोफेशनल ग्रोथ' हा विचार सर्वत्र मांडला जातो. व्यवसाय करण्याच्या सुलभ पद्धतीचे संशोधन करून त्यांचा अनुभव घेऊन तो पुढच्या पिढीला देण्यामुळे व्यावसायिक वाढ होते. तसा विचारच श्रीसमर्थांनी येथे मांडला आहे.)

**कांहीं मेळवी मग जेवी। गुंतल्या लोकांस उगवी[८]। शरीर कारणीं लावी। कांहीं तरी।।२५।।**

काही तरी कमाविल्याशिवाय जेवण जेवू नये. संकटामध्ये सापडलेल्यांना सहाय्य करून सोडवावे. सत्कार्य हातून घडावे यासाठी प्रयत्न करून शरीर सार्थकी लावावे.

**कांहीं धर्मचर्चा पुराण। हरिकथा निरूपण। वायां जाऊं नेदी क्षण। दोहींकडे।।२६।।**

अध्यात्मिक विचारांवर थोडीतरी चर्चा करावी, पुराण श्रवण करावे, हरिकथा ऐकावी. प्रपंचासाठी आणि परमार्थासाठी सर्व वेळ खर्च करावा (चर्चेमुळे वैचारिक प्रगति होते पण चर्चा प्रमाणात असावी. प्रपंच आणि परमार्थ या दोनही आघाड्या सांभाळाव्या त्यासाठी एकही क्षण आळसात वाया दवडू नये.)

**ऐसा जो सर्वसावध। त्यास कैंचा असेल खेद। विवेकें तुटला समंध। देहबुद्धीचा।।२७।।**

अशाप्रकारे सर्व बाजूनी जो सावध असतो त्याला (पश्चात्तापाने) दु:ख करण्याचा प्रसंग येत नाही. अशा माणसाची देहतादात्म्यता कमी होते. (संसार नेटका करता फिका होत जावा, ही श्रीसमर्थांची महत्त्वाची

६) वेढा लावी – फसवी ७) सदेवपणाचें – भाग्यवंताचे ८) गुंतल्या लोकांस उगवी – संकटात सापडलेल्यांना मदत करावी.

शिकवण आहे. 'फिका होणे' म्हणजे आसक्ती क्षीण होणे.)

**आहे तितुकें देवाचें। ऐसें वर्तणें निश्चयाचें। मूळ तुटे उद्वेगाचें। येणें रीतीं।।२८।।**

आपणास जे सारे दिसत आहे भासत आहे ते सारे भगवंताचे आहे. तोच त्याचा स्वामी आहे अशी मनाशी खूणगाठ बांधून व्यवहारात वागावे. यामुळे दृष्याच्या ठिकाणी असलेली 'मी व माझे' ही भावना लुप्त होते. त्याचा परिणाम असा होतो की आपल्या मनाविरुद्ध घटना घडताच जी संतापाची वा दु:खाची भावना उत्पन्न व्हावयाची ती निर्माणच होत नाही. अलिप्तपणे जीवनाकडे पहाण्याचा दुहेरी परिणाम होतो. दु:ख निर्माण होत नाही आणि मूळची समाधानीवृत्ती लोपत नाही.

**प्रपंचीं पाहिजे सुवर्ण। परमार्थी पंचिकर्ण। महावाक्याचें विवरण। करितां सुटे।।२९।।**

संसारामध्ये धनाची जरुरी असते तर परमार्थामध्ये विश्वाच्या निर्मितीमधील तत्त्वांचे ज्ञान आवश्यक असते. (पंचीकरण या विषयाची अगदी प्राथमिक ओळख आपण येथे करून घेऊ या.

पंचमहाभूते - १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायू, ५ आकाश - अशी शास्त्रामध्ये मानली आहेत हे प्रथम ठाऊक असावे. प्रत्येक महाभूताचा स्वतंत्र गुण व स्वतंत्र कार्य असते, तथापि प्रत्येक महाभूत स्वतंत्र नसते तर त्यामध्ये उरलेल्या चार महाभूतांचा भाग असतो यालाच 'कर्दम' असे नाव श्रीसमर्थ देतात. या पाचांच्या कर्दमाला व त्यातून निर्माण झालेल्या पाचापाचांच्या विविध व्यवहाराला पंचीकरण म्हणतात एवढी कल्पना 'दा. प्रवेश' या स्तरासाठी आवश्यक आहे. द. १७ मधील समास ८ व ९ मध्ये सविस्तर ज्ञान आहे ते पुढे येईल.

'अहं ब्रह्मास्मि' ''तत् त्वम असि'' इत्यादि सूत्रांमध्ये गोविलेल्या सिद्धान्ताना महावाक्ये असे म्हणतात. त्यांचे मनन, चिंतन, विवरण केले असता मनुष्य प्रकृतीच्या बंधनातून मुक्त होतो. ''देहेबुद्धीची घातली बेडी। या नांव बद्ध ।।'' ही बद्धाची व्याख्या श्रीसमर्थांनी केली आहे अशी ही देहेबुद्धीची बेडी निघून जीव मुक्त होतो.)

**कर्म उपासना आणि ज्ञान। येणें राहे समाधान। परमार्थाचें जें साधन। तेंचि ऐकत जावें।।३०।।**

कर्म, भक्तीने केलेली उपासना आणि ज्ञान या त्रयींचा जीवनात तोल सांभाळला तर समाधान लाभते. परमार्थी जीवनासाठी ह्यांचाच साधनाप्रमाणे उपयोग असतो म्हणून नेहमी त्यांचेच श्रवण करावे. (आरे हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें । वाचिलेंचि वाचावें । पुन्हपुन्हां ।। ११-८-९।। अध्यात्मिक क्षेत्रातील जो महत्त्वाचा भाग आहे तो केवळ एकदाच वाचून कळत नाही, कळला तरी आचरणात येत नाही, आचरणात आला तरी पूर्णपणे आकलनात येण्याचा अनुभवच यावा लागतो. असे गूढ कोडे असल्याने नित्य श्रवणाचे महत्त्व या समासाच्या अखेरीला सांगितले आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिकवणनिरूपणनाम समास तृतीय।।३।।**

### प्रश्नपत्रिका ५ वी (दासबोध दशक ११, समास ३ 'सिकवणनिरूपण'वर आधारित)

प्र. १ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) ऐक ----- लक्षण। ----- जाऊ नेदी येक क्षण। ----- ज्ञान। बरें पाहे।।

२) ज्या ज्याचा जो -----। तेथें असावें -----।

३) याकारणें -----। ----- असावें मन। तरी मग ----- भोजन। गोड -----।।

प्र. २ अ) सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे चित्र या समासाच्या पहिल्या ३, ४, ५ आणि ६ व्या ओवीत समर्थांनी कसे रेखाटले आहे? अशा माणसाला ७ व्या ओवीत कोणते विशेषण त्यांनी लावले आहे?

ब) आळस या दुर्गुणाची निंदा समर्थांनी कशी केली आहे?

प्र. ३ अ) पुढील अर्थ ज्या ओव्यांमध्ये अगर ओवीच्या चरणामध्ये आहे, त्या संपूर्ण ओव्या लिहा.

१) जे आहे ते सारे देवाचे, अशी निश्चयाची वागणूक ठेवली असता, मनुष्याचा उद्वेग समूळ नष्ट होतो.

२) भोजन गोड लागावे यासाठी देखील मन एकाग्र असावे लागते.

३) निदान यापुढे तरी विवेकाने वागावे आणि इहपरलोक सिद्धीस न्यावे.

ब) प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीमध्ये आपल्या शिष्यांना सुयश लाभावे अशी समर्थांची दृष्टी होती, हे सिद्ध करणारा हा महत्त्वाचा समास आहे, असे आपणास वाटते काय? सुमारे दहा ओळीत आपले मत मांडा.

प्र. ४ तीनशे वर्षांपूर्वीच्या काळात वावरणाऱ्या समाजापुढे समर्थांनी एक आदर्श दिनक्रम ठेवला. त्यातील कोणता भाग आजही ग्राह्य आहे?

प्र. ५ पुढील प्रश्नांवरून आपली अभ्यासपद्धती समजून घेण्याची आमची इच्छा आहे. तरी कृपया माहिती द्यावी.

१) प्रश्नपत्रिका वाचताच लगेच सोडवावयास घेता की प्रश्न वाचून पुन्हा समास अनेकदा वाचून आपण उत्तरे लिहिता?

२) समासातील विचारांचा अभ्यास व्हावा म्हणून एखादी स्वतंत्र वही ठेवून त्यात काही महत्त्वाच्या ओव्या लिहिता का?

३) ओवी वाचल्यानंतर लगेच तिचा अर्थ वाचता की सर्व समास वाचल्यानंतरच अर्थाचे वाचन करता?

४) आपण लिहून काढलेली प्रश्नोत्तरे दुसऱ्या कोणाला वाचून दाखविता?

५) एकदा लिहिलेली उत्तरपत्रिका स्वत:लाच समाधानकारक वाटली नाही म्हणून पुन्हा लिहिता का?

## स्वाध्याय ६ वा : दशक ४ : समास ३ रा : नामस्मरणभक्ति

**सारांश :** द. ४-३ नामस्मरणाचे महत्त्व सांगणारा हा समास केवळ मुखोद्गत करण्याच्या महत्त्वाचा आहे. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज (१८४५-१९१३) यांनी तर सर्व जीवनभर नामस्मरणाच्या प्रसाराचे व्रतच घेतले होते. दासबोधातील हा समास म्हणजे जणु त्यांचा प्राणच होता. अशा समासाचा अभ्यास करून दैनंदिन जीवनात निदान एका जपमालेइतका तरी जप अभ्यासार्थींनी करावा. आपला दासबोध अभ्यास, भक्तीच्या रसाने रंगलेला असावा केवळ रुक्ष कागदी अभ्यास होऊ नये.

परमात्म्यावाचून अन्य काही नाही, हे जर खरे तर स्थलकालांनी आवरलेले व सारखे बदलते विश्व त्याचेच बनलेले असले पाहिजे. म्हणून बृहदारण्यक उपनिषदामध्ये ब्रह्माची मूर्त व अमूर्त अशी, मर्त्य व अमृत अशी, दोन रूपे सांगितली आहेत. 'द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तंच, मर्त्यं चामृतंच. अ. २ ब्रा. ३ मं. १' रूपरहित अमूर्त परमात्मा रूपसहित मूर्त कसा होतो? त्याचे असे होते की प्रथम अमूर्ताला 'अहम्' अशी स्फूर्ती होते. त्यामध्ये अनेक होण्याचे बीज असते. या स्फूर्तीला आदिसंकल्प असे म्हणतात. हा आदिसंकल्प संपूर्ण ज्ञानमय, शक्तिमय, आनंदमय, अमूर्त आणि नादमय असतो. उपनिषदे त्याला ओंकार किंवा प्रणव म्हणतात. गीता त्याला एकाक्षर ब्रह्म म्हणते. वेदांत त्याला शब्दब्रह्म म्हणतो. ग्रीक तत्त्वचिंतक त्याला लोगॉस म्हणतात, आणि साधुसंत त्याला नाम असे म्हणतात. नाम शक्तिमय असल्याने सबंध मूर्त विश्व त्यांतूनच जन्म पावते. नाम ज्ञानमय असल्याने ते विश्वनियमानुसार चालते. नाम अनंत असल्याने मूर्ताचे अनंत प्रकार असतात. पण आतापर्यंत होऊन गेलेल्या, सध्या असणाऱ्या आणि पुढे होणाऱ्या साऱ्या मूर्तांमध्ये नाम अनुस्यूतपणे व्यापून राहते. म्हणून नामच तेवढे अविनाशी असून आकाशपाताळी नांदते. जगातील वस्तूंमध्ये सामान्य व विशेष यांचा खेळ आढळतो. नाम हे सामान्य तर रूप हे विशेष होय. वस्तूचे नाव किंवा नाम म्हणजे वस्तूची खूण असणारा नुसता शब्द नव्हे. नाम म्हणजे त्या वस्तूच्या अंतरंगात वावरणारी आदिसंकल्पाची म्हणजेच ईश्वराची शक्ती होय. नाम म्हणजे दृश्याला दृश्यपणाने धारण करणारी परमात्मशक्ती. म्हणून नाम हे मूर्त व अमूर्त यांना जोडणारी साखळी बनते. या दृष्टीने दृश्यातून अदृश्यात आणि अदृश्यातून अव्यक्तात जाण्यासाठी नामासारखी सहज स्वत:च्या मालकीची दुसरी साधना नाही. जीवाच्या संकल्पामध्ये ज्ञानाचा विषय होणारी वस्तु आणि त्या वस्तूचे ज्ञान वेगळेपणाने राहतात पण आदिसंकल्पामध्ये वस्तू व तिचे ज्ञान एकरूपपणाने वावरतात. म्हणून नाम आणि नामी यात अभेद असतो. नामस्मरण म्हणजे काय? आपण ज्याचे नाम घेतो तोच खरा आहे, आणि त्याच्या सत्तेने सगळे घडते, ही जाणीव जागी राहणे याला नामस्मरण असे म्हणतात. प्रपंचामध्ये वावरत असताना भगवंताचा सारखा विसर पडतो. तो न पडू देण्यास नामासारखा अन्य उपाय नाही. म्हणून श्रीसमर्थ नामस्मरणावर एवढा भर देतात.

॥ **श्रीराम**॥

**मागां निरोपिलें कीर्तन। जें सकळांस करी पावन। आतां ऐका विष्णो:स्मरण। तिसरी भक्ती॥१॥**

मागील समासामध्ये सर्वांना पावन करणारी कीर्तनभक्ती सांगितली. आता भगवंताचे नामस्मरण या नावाची तिसरी भक्ती ऐकावी. (ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांनी यासंबंधात असे म्हटले आहे की नवविधा भक्तीचा दासबोधात सांगितलेला क्रम हा सृष्टिनियमाला धरून आहे; श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण इत्यादि. मनुष्यप्राणी जन्माला आला की शिकायला सुरुवात करतो ते श्रवणापासूनच. श्रवण करील तेच योग्य वाचेने बोलता येते. मुके लोक बहिरे असले पाहिजेत कारण श्रवण न झाल्यानेच त्यांना बोलता येत नाही. मनुष्य ज्या देशात जन्माला येतो त्या देशाची भाषा तो बोलतो म्हणून श्रवणानंतर कीर्तन (बोलणे) आणि बोलणे झाल्यानंतर कृति म्हणजे नामस्मरण असा स्वाभाविक क्रम लागतो. नामस्मरण झाले की काम झाले. पुढील सर्व भक्ती नामस्मरणात येतात. त्याकरिता वेगळी खटपट करावी लागत नाही. एका माणसाला ९ मैल दूर अंतरावर असलेल्या मित्राला भेटावयास जावयाचे होते पण ३ मैल चालून गेल्यावरच तो भेटला तर पुढे जाण्याची खटपट नको. त्याप्रमाणे पुढील ६ भक्तींची स्थिती आहे. संदर्भ– ब्र. चै. गोंदवलेकरांची प्रवचने :

१७ जानेवारीचे प्रवचन)

**स्मरण देवाचें करावें। अखंड नाम जपत जावें। नामस्मरणें पावावें। समाधान।।२।।**

स्मरण करण्यासाठी देवाचे नाव अखंड जपत जावे. नामस्मरणाने समाधान प्राप्त करून घ्यावे.

**नित्य नेम प्रात:काळीं। माध्यान्हकाळीं सायंकाळीं। नामस्मरण सर्वकाळीं। करीत जावें।।३।।**

रोज नियमाने प्रात:काळी, दुपारी आणि सायंकाळी ईश्वराचे नामस्मरण करावे. सर्व काळी नामस्मरण करावे.

**सुख दु:ख उद्वेग चिंता। अथवा आनंदरूप असतां। नामस्मरणेंविण सर्वथा। राहोंच नये।।४।।**

आपण सुखात असता किंवा दु:खात असताना, उद्वेगाच्या किंवा चिंतेच्या अवस्थेत किंवा मन आनंदात असताना नामस्मरणाची अवस्था सोडूच नये.

**हरुषकाळीं विषमकाळीं। पर्वकाळीं प्रस्तावकाळीं[1]। विश्रांतिकाळीं निद्राकाळीं। नामस्मरण करावें।।५।।**

जीवनात आनंदाचा काळ असो की कठीण म्हणजे संकटाचा काळ असो, मोठा पर्वकाळ असो, पश्चातापाचा, विश्रांतीचा किंवा झोपेचा काळ असो, नामस्मरण करावे.

**कोडें सांकडें संकट। नाना संसारखटपट। आवस्ता लागतां चटपट। नामस्मरण करावें।।६।।**

एखादी समस्या पडलेली असो, अडचण असो, संकट असो, संसारातील अनेक खटपटी चाललेल्या असोत किंवा मनाला कशाची तरी चुटपुट लागलेली असो, त्यावेळी नामस्मरण करावे.

**चालतां बोलतां धंदा करितां। खातां जेवितां सुखी होतां। नाना उपभोग भोगितां। नाम विसरों नये।।७।।**

चालताना, बोलताना, आपला व्यवसाय करताना, जेवताना, खाताना, सुखी असताना, नाना प्रकारचे सुखोपभोग भोगतानासुद्धा परमेश्वराच्या नामाचे विस्मरण होऊ देऊ नये.

**संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। नामस्मरणाची स्थिती। सांडूंच नये।।८।।**

संपत्ती किंवा विपत्ती यातील कोणतीही अवस्था कालमानाप्रमाणे येवो, नामस्मरणाची अवस्था सोडू नये.

**वैभव सामर्थ्य आणी सत्ता। नाना पदार्थ चालतां। उत्कट भाग्यश्री भोगितां। नामस्मरण सांडूं नये।।९।।**

वैभव, सामर्थ्य आणि सत्ता यांच्या प्राप्तीमुळे किंवा नाना प्रकारच्या सुखसोयी आयत्याच घरी चालून आल्या आणि त्यांच्या सहाय्याने उत्कृष्ट ऐश्वर्य भोगण्याचे भाग्य लाभले तरीदेखील ईश्वरस्मरण (नामस्मरण) सोडून देऊ नये.

**आधीं आवदसा मग दसा। अथवा दसेउपरी आवदसा। प्रसंग असो भलतैसा। परंतु नाम सोडूं नये।।१०।।**

जीवनामधील भिन्न प्रकारचे चढउतार उदा. आधी वाईट स्थिती मग उत्तम परिस्थिती किंवा याउलट आधी सुस्थिती मागाहून वाईट अवस्था प्राप्त झाली तरी किंवा भयंकर प्रसंग कोसळला तरी नामस्मरण सोडू नये.

(वरील ३ ऱ्या ओवीपासून १० व्या ओवीपर्यंत केवढा तरी तपशील श्रीसमर्थांनी सांगितला आहे. सर्वसामान्यांसाठी उपदेश करताना जास्त विस्ताराने सांगितल्याविना तो मनांत ठसत नाही हे त्यामागील मर्म आहे. 'अखंड नाम जपत जावें' ओ.क्र.२ या चरणाचा विस्तारच तो आहे.)

**नामें संकटें नासतीं। नामें विघ्नें निवारती। नामस्मरणें पाविजेती। उत्तम पदें।।११।।**

१) प्रस्तावकाळीं – पश्चात्ताप समयी

नामामुळे संकटे नाहिशी होतात, विघ्ने निवारण होतात. मनुष्य थोर पदवी प्राप्त करून घेतो.

**भूत पिशाच्य नाना छंद। ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध। मंत्रचळ[२] नाना खेद। नामनिष्ठें नासती।।१२।।**

भूतपिशाच्यांची पीडा जाते, नाना व्यसनातून सुटका होते. ब्रह्मग्रह, ब्रह्मराक्षस, यांची बाधा होत नाही. मंत्र चुकीचा जपल्याने जो तऱ्हेवाईकपणा येतो, अशी नाना दु:खे नाहिशी होतात.

**नामें विषबाधा हरती। नामें चेडें चेटकें नासती। नामें होयें उत्तम गती। अंतकाळीं।।१३।।**

नामस्मरणामुळे विषबाधा टळते, चेटूक, जादुटोणा यांचे दुष्परिणाम जातात आणि अंत:काळी जीवाला सद्गति लाभते. (वरील तीन ओव्यांमध्ये नामसाधनेची फलश्रुती दिली आहे. जादुटोणा, भूतबाधा, ब्रह्मसमंध लागणे इ. तत्कालीन ज्या लोकश्रद्धा किंवा समज होते त्यांच्या अस्तिनास्तिची चर्चा श्रीसमर्थांनी केली नाही या संबंधात प्रा. न. र. फाटक यांनी असे लिहिले आहे की, ''जनतेवर समर्थांचा अत्यंत विश्वास असल्यामुळे जनतेला जागृत करताना ती न दुखविता तिला जागे करावे यात एक मौज बहुमतावर अवलंबून राहाण्याची आहे.'' भ्रमनिरूपणासारख्या समासात (द.१०-६) मात्र त्यांनी अनेक अंधश्रद्धांचा त्यागच सुचविला आहे.)

**बाळपणीं तारुण्यकाळीं। कठिणकाळीं वृधाप्यकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं। नामस्मरण असावें।।१४।।**

बालपण, तारूण्य, वार्धक्य, कठीण काळ, किंवा अंतकाळीही नामस्मरण चालू असावे.

**नामाचा महिमा जाणे शंकर। जना उपदेसी विश्वेश्वर। वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी।।१५।।**

नामाची थोरवी श्री शंकरांना ठाऊक आहे तो विश्वेश्वर लोकांना त्याचा उपदेश करतो. (काशी क्षेत्रामध्ये मरणोन्मुख माणसांच्या कानात श्रीशंकर रामनाम सांगतात त्यामुळे तो मुक्त होतो) काशीक्षेत्र रामनामामुळे मुक्ति देणारे क्षेत्र मानले जाते.

**उफराट्या नामासाठी। वाल्मिक तरला उठाउठी। भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचें।।१६।।**

वाल्मिकीने उफराटे म्हणजे 'राम' ऐवजी 'मरा' असे नामस्मरण केले पण पाहता पाहता तो उद्धरून गेला. त्याने श्रीरामांच्या भावी चरित्रावर शतकोटी श्लोक रचले. (इतकी त्याची पुण्याई होती).

**हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातापासून सुटला। नारायणनामें पावन झाला। अजामेळ।।१७।।**

हरिनामस्मरणामुळे प्रल्हादाचा उद्धार झाला. त्याच्यावर नानाप्रकारचे आघात (कडेलोट, पोळणे इ.) झाले असतानासुद्धा त्यातून तो वाचला. अजामेळ हा नारायणाचे नामस्मरण करून पावन झाला.

(अजामेळाचे आख्यान 'भागवत' ग्रंथात आहे. तो मूळचा होता सदाचारी; पण विषयवासनेमुळे पापी बनला होता. दासीपासून झालेल्या दहाव्या पुत्राचे नाव त्याने नारायण ठेवले. अंतसमयी तेच नारायणाचे नाव त्याच्या मुखात होते त्यामुळे देवाने दयेने त्याला मुक्ति दिली अशी कथा आहे.)

**नामें पाषाण तरले। असंख्यात भक्त उद्धरले। माहापापी तेचि जाले। परम पवित्र।।१८।।**

नामामुळे (रामकथेमध्ये) पाषाण तरल्याचा उल्लेख आहे. अगणित भक्त त्याप्रमाणे उद्धरून गेले आहेत. जे महापापी होते ते सुद्धा नामस्मरणामुळे पावन होतात.

('नामें पाषाण तरले' या चरणातून दोन अर्थ ध्वनित होतात. दगड तरण्याचा सेतुबंधनाचा रामायणातील प्रसंग; आणि दुसरा अर्थ म्हणजे जे लोक बुद्धिहीन पाषाणासारखे असतात ते सुद्धा तरतात. पुढील चरणार्धात ''असंख्यात भक्त उद्धरले'' याचा संबंध पहिल्या चरणार्धाशी लावणे शक्य होते.)

२) मंत्रचळ - मंत्र चुकल्यामुळे लागणारे वेड

**परमेश्वराची अनंत नामें। स्मरतां तरिजे नित्यनेमें। नामस्मरण करितां, येमें-। बाधिजेना।।१९।।**

परमेश्वराला माणसाने वेगवेगळी असंख्य नावे ठेवली आहेत त्यांचे स्मरण केले असता मनुष्याचा उद्धार होतो. नामस्मरण करणाऱ्यांना यमयातना होत नाहीत.

(अनेक प्रकारचे आंबे ''आंबा'' या नामातच येतात. अशारीतीने या जड जीवामध्ये अनेक रूपांची गर्दी आहे. तशी सूक्ष्म जगामध्ये अनेक नामांची गर्दी आहे. या सर्वांची नावे भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे. असणेपणाच्या या गुणाला नाम म्हणतात. ब्र. चै. गोंदवलेकर महाराजांच्या (१२ फेब्रु.) प्रवचनात हेच स्पष्ट केले आहे. सर्व देवांना केलेला नमस्कार एका देवाला पोहोचतो.)

**सहस्त्रानामामध्यें कोणी येक। म्हणतां होतसे सार्थक। नाम स्मरतां पुण्यश्लोक। होईजे स्वयें।।२०।।**

भगवंताच्या हजारो नामांपैकी एकाची निवड केली तरी चालेल पण त्याचा जप एकाग्रतेने करावा त्यामुळे जन्माचे सार्थक होईल. नामस्मरणाने माणूस स्वतःच पुण्यात्मा होऊन जातो.

**कांहींच न करूनि प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणें संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागीं सांभाळी।।२१।।**

आपण इतर काहीच (अन्य उपासना) न करता रामनामाचा जप जिव्हेने केला तर (चक्रधारी) भगवंत संतुष्ट होऊन भक्ताचा सांभाळ करतो.

**नाम स्मरे निरंतर। तें जाणावें पुण्यशरीर। माहादोषांचे गिरिवर। रामनामें नासती।।२२।।**

जो माणूस अखंडपणे नामस्मरण करतो त्याचे शरीर पुण्यवान समजावे. महापातकांचे डोंगर जरी त्याच्या शिरावर असले तरी तेही रामनामामुळे नाहिसे होतात.

**अगाध महिमा न वचे वदला। नामें बहुत जन उद्धरला। हळहळापासून सुटला। प्रत्यक्ष चंद्रमौळी[३]।।२३।।**

नामस्मरणाचा महिमा इतका अगाध आहे की तो शब्दांमध्ये व्यक्त करता येणे शक्य नाही नामस्मरणाने खूप लोकांचा उद्धार झाला आहे. 'हलाहल' या विषापासून शंकराची मुक्तता रामनामामुळे झाली. (शंकराने सर्व देवांच्या वतीने समुद्रमंथनातून प्रगट झालेले 'हलाहल' नामक जालीम वीष घेतले त्यामुळे त्याच्या सर्वांगाचा दाह होऊ लागला त्यावर उपाय त्याने डोक्यावर चंद्र धारण केला, मस्तकावर गंगा नदीचे शीतल जल घेतले, गळ्यामध्ये थंड असा नाग धारण केला पण कशानेही उपाय झाला नाही. पण अखेरीस रामनामचा जप करता क्षणीच हलाहलापासून शंकरांची मुक्तता झाली. अशी पौराणिक कथा आहे.)

**चहु वर्णां नामाधिकार। नामीं नाहीं लहानथोर। जड मूढ पैलपार। पावती नामें।।२४।।**

चारही वर्णांना नामस्मरणाचा अधिकार आहे. तसेच लहान वा थोर हा भेद नामस्मरणाच्या बाबतीत नाही. मतिमंद, मूर्ख माणसे देखील नामस्मरणामुळे भवसागरातून तरून जातात.

(नाम हे साधन किंवा नामावतार संपूर्ण कलियुगासाठी आहे. सेना न्हावी, गोरा कुंभार, सावता माळी, जनाबाई, सखुबाई, सजन कसाई, चोखामेळा, ही सारी अठरापगड जातीमधून प्रगट झालेली संतमालिका असून ज्ञानेश्वर व तुकाराम यांची ती निर्मिती आहे.)

**म्हणौन नाम अखंड स्मरावें। रूप मनीं आठवावें। तिसरी भक्ती स्वभावें। निरोपिली।।२५।।**

यासाठी निरंतर (सर्वकाळ) नामस्मरण करावे. भगवंताचे रूप आठवण्याचा मनात प्रयत्न करावा. अशा

३) चंद्रमौळी - शंकर

रीतीने भक्तीचा हा तिसरा प्रकार माझ्या अंतरीच्या भावानुसार सांगितला आहे.

(अर्वाचिन काळामध्ये श्री गोंदवलेकर महाराज, साखरखेर्डा येथील श्रीप्रल्हादमहाराज, बेलधडीचे श्री ब्रह्मानंदमहाराज यांनी सर्व जीवनभर केवळ रामनामाचाच प्रसार केला. दासबोधातील उपर्निर्दिष्ट समासाच्या उपदेशासाठीच त्यांनी जीवन व्यतीत केले. तसे पाहिले तर ज्ञानदेवादि संताची जी परंपरा सुरू झाली त्यांच्या उपदेशामध्येही नामस्मरणाचाच प्रसार आहे. त्यांची वचने अभ्यासार्थीनी शोधून काढावी.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनाम समास तृतीय।।३।।**

### प्रश्नपत्रिका ६ वी (दासबोध दशक ४ समास ३ 'नामस्मरणभक्ति' वर आधारित)

प्र. १ संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. (लेखनमर्यादा प्रत्येकी ५ ओळी)

अ) नामें पाषाण तरले। ब) हळाहळापासून सुटला। प्रत्यक्ष चंद्रमौळी।।

प्र. २ 'अ' स्तंभातील शब्दसमुहापुढे 'ब' स्तंभातील योग्य नाव लिहून जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| नामाचा महिमा लोकांना सांगणारे | वाल्मिकी |
| उफराटे नाम घेणारे | अजामेळ |
| नामाने पावन झालेले | विश्वेश्वर |
| नाना आघातातून मुक्त | प्रल्हाद |

प्र. ३ सामान्य माणसाला एखादा मुद्दा पटवून देण्यासाठी खूपच तपशील सांगण्याची समर्थांची पद्धती या समासात आपणास कोठे दिसते? उदाहरणासहित स्पष्ट करा.

प्र. ४ नामस्मरणाने प्राप्त होणाऱ्या फलस्वरूप पाच गोष्टींचा उल्लेख करा.

प्र. ५ अ) गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) --- नामामध्यें --- येक। म्हणतां होतसे ---। नाम स्मरतां ---। होईजे स्वयें।।

२) ----- स्मरे निरंतर। तें जाणावें -----। महादोषाचे -----। ----- नासती।।

३) ----- संकटें -----। ----- विघ्नें -----। ----- नामस्मरणें -----। ---।।

ब) सर्व जीवनभर केवळ रामनामस्मरणाचा प्रसार करणाऱ्या आधुनिक काळातील एका संताचे नाव सांगा. त्यांच्या उपदेशाचा कोणता ग्रंथ आपण वाचला आहे?

# स्वाध्याय ७ वा : दशक १२ : समास ९ वा : येत्नसिकवण

**सारांश :** 'यत्नवाद' हा समर्थ-विचारांचा जणू आत्माच आहे. एका करंट्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या निमित्ताने लिहिला गेलेला हा समास आपल्या जीवनात खरोखर क्रांतीच करून टाकील. यातील तेजस्वी शिकवणीचा प्रसार समाजामध्ये केला जाणे आवश्यक आहे पण त्या आधी आपण स्वत: त्यानुसार जगण्याचा यत्न करूया.

संतांची शिकवण सूक्ष्म रीतीने तपासली तर प्रत्येक संत प्रयत्नवादी असतो असे आढळते. हे जरी खरे

असले तरी श्रीसमर्थांचा प्रयत्नवाद काही औरच आहे. या कर्मभूमीत मानवी जीवनात प्रयत्न हाच देव मानावा, असे त्यांचे स्पष्ट सांगणे दिसते. एक अत्यंत दुर्दैवी माणूस होता, सर्व तऱ्हेच्या करंट लक्षणांनी तो संपन्न होता. त्याने जीवाला कंटाळून श्रीसमर्थांना प्रश्न केला की, ''माझी ही विपन्न अवस्था मला नकोशी झाली आहे, मी जगावे की मरावे? आणि जगावे असे म्हणत असाल तर कसे जीवन घालवावे?'' त्यांच्या प्रश्नास उत्तर देण्यासाठी श्रीसमर्थांनी हा समास सांगितला आहे, त्यांच्या सांगण्याचा रोख असा की, आळस झाडून टाकून माणूस योग्य दिशेने जर खूप प्रयत्न करील तर त्यास दैव अनुकूल झाल्यावाचून राहणार नाही, हाच त्यांचा संदेश आहे. माणसाने निराश न होता जगण्याचा निश्चय करावा पण जगावे कसे हे समजण्यासाठी त्यांनी जीवनपद्धतीची एक रूपरेषा सुद्धा सांगून ठेवली. माणसाने प्रथम उद्विग्नता टाकावी, प्रसन्न मनाने आत्मसुधारणेच्या मागे लागावे, आपण जसे बोलतो तसे वागण्यास शिकावे, निरपेक्षता ठेवावी, लोकांना गोड शब्दांनी आपले करून घ्यावे, हृदयात भगवंताचे ध्यान धरावे. मुखाने नामस्मरण करावे. असे जो करील, त्याच्या अंगी तेज उत्पन्न होण्यास विलंब लागणार नाही. तो वरच्या दर्जाचा महंत बनतो; मग त्याच्या भाग्याला कमी पडणे शक्य नाही.

**।। श्रीराम ।।**

**दुर्बळ नाचारी[१] वोडगस्त। आळसी खादाड रिणगस्त। मूर्खपणें अवघें वेस्त। कांहींच नाहीं।।१।।**

जो दुर्बल आहे, ज्याला कोणाचा आधार नाही, जो आळशी आहे, खादाड आणि कर्जबाजारी आहे, मूर्खपणामुळे ज्याचे सगळे जीवन अस्ताव्यस्त झाले आहे,

**खाया नाहीं जेवाया नाहीं। लेया नाहीं नेसाया नाहीं। अंथराया नाहीं पांघराया नाहीं। कोंपट नाहीं अभागी।।२।।**

ज्याला खाण्याला, जेवणाला मिळत नाही, कपडे नाहीत, पांघरुण, अंथरुण काही नाही, राहायला साधी झोपडीही नाही असा जो दुर्दैवी आहे,

**सोयरे नाहीं धायेरे नाहीं। इष्ट नाहीं मित्र नाहीं। पाहतां कोठें वोळखी नाहीं। आश्रयेविण परदेसी।।३।।**

ज्याला कोणी सोयरेधायरे, इष्टमित्र नाहीत, कोठे कोणाची ओळख नाही, असा जो स्वदेशामध्येच आश्रयाविना परदेशी असल्याप्रमाणे जगत आहे,

**तेणें कैसें करावें। काये जीवेंसीं धरावें। वाचावें किं मरावें। कोण्याप्रकारें।।४।।**

त्या माणसाने काय करावे? कोणती आशा धरून जगावे? त्याने कोणत्या प्रकारे जगावे किंवा मरावे?

**ऐसे कोणीयेकें पुसिलें। कोणीयेकें उत्तर दिधलें। श्रोतीं सावध ऐकिलें। पाहिजे आतां।।५।।**

असे कोणी एका माणसाने विचारले त्यास कोणी एकाने (श्रीसमर्थांनी) उत्तरे दिली आहेत ती श्रोत्यांनी सावधपणे ऐकावी.

**लहानथोर काम कांहीं। केल्यावेगळें होत नाहीं। करंट्या सावध पाहीं। सदेव[२] होसी।।६।।**

उत्तर देताना श्री समर्थ सांगतात – कोणतेही काम, मग ते लहानसे असो किंवा मोठे असो ते प्रत्यक्ष कृती केल्याशिवाय आपोआप पूर्ण होत नाही; अरे करंट्या, सावधपणाने याचा विचार तू केलास तर चांगला भाग्यवान होशील.

१) नाचारी – निराश्रित २) सदेव – भाग्यवान

**अंतरीं नाहीं सावधानता। येत्न ठाकेना पुरता। सुखसंतोषाची वार्ता। तेथें कैंची।।७।।**

मनामध्ये विचारपूर्वक प्रयत्नाची दिशा ठरविली नसेल आणि प्रयत्न जर पुरेसा केला नाही तर (यश मिळणार नाही मग) सुख संतोषाचा अनुभवच येणे शक्य नाही. (अचूक यत्न कोणता याबद्दलचे विवेचन स्वाध्याय ३ ओवी ६ मध्ये पहावे.)

**म्हणोन आळस सोडावा। येत्न साक्षेपें जोडावा। दुश्चितपणाचा मोडावा। थारा बळें।।८।।**

म्हणून प्रथम आळसाचा त्याग करावा आणि चिकाटीने यत्न करावा. प्रयत्न करताना दु:श्चितपणा या दुर्गुणाला मनामध्ये थाराच देऊ नये. (प्रयत्न करताना एकाग्र मनाने केला पाहिजे. डोक्यामध्ये अन्य विचार घोळत असताना चित्ताला व्यग्रता येते आणि त्यामुळे हातून नीट काम होत नाही. दु:श्चितपणा या दुर्गुणाबद्दल विवेचन स्वा. ५ ओवी १९ मध्ये पहावे.)

**प्रात:काळीं उठत जावें। प्रात:स्मरामि करावें। नित्य नेमें स्मरावें। पाठांतर।।९।।**

(यानंतर दिनक्रमाची दिशा स्वा. ५ द. ११-३ मध्ये पुन्हा एकदा पहावी.) प्रात:काळी उठावे, प्रात:स्मरण करावे. ईश्वरस्मरणानंतर आपण जे पूर्वी पाठ केले असेल ते नित्यनेमाने आठवावे.

**मागील उजळणी पुढें पाठ। नेम धरावा निकट। बाष्कळपणाची वटवट। करूंच नये।।१०।।**

मागील पाठान्तराची उजळणी करून आणखी काही नवे पाठान्तर करावे हा नेहमीचा शिरस्ता ठेवावा. वायफळ बडबड मुळीच करू नये.

**दिशेकडे दुरी जावें। सुचिस्मंत होऊन यावें। येतां कांहीं तरी आणावें। रितें खोटें।।११।।**

प्रातर्विधीसाठी गावापासून दूर जावे. येताना (स्नान करून) निर्मळ होऊन यावे. येताना काही तरी घेऊन यावे. रिकाम्या हाती येऊ नये. (या ओवी चरणाचा अर्थ पहावयाचा असेल तर साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या काळातील रहाणी ध्यानात घ्यावी लागेल. तेव्हा दूर दूर अंतरावर लहान खेडेगावातून लोक राहात असत. प्रातर्विधीसाठी गावापासून ते दूर जात असत. जातानाच (तांब्या) लोटा घेऊन आणि पंचाही खांद्यावर टाकून जात. परत येताना नजीकच्या विहीरीवर अगर ओढ्यावर स्नान करणे, कपडे धुणेही केले जात असे. शक्य झाल्यास येताना दात घासण्यासाठी बाभळीच्या झाडाच्या काड्या आणून ठेवीत असत तर कधी रस्त्यावर पडलेले शेण किंवा सरपणाचा काट्याकुटक्या सहजपणेच आणल्या जात. हे सगळे ध्यानात घेतले तर रिक्त येऊ नये (रिते खोटें) याचा अर्थ कळेल. एखादा नवा विचार डोक्यातून आणावा असासुद्धा अर्थ कोणी केला तर तो चूक म्हणता येणार नाही.)

**धूतवस्त्रें घालावीं पिळून। करावें चरणक्षाळण। देवदर्शन देवार्चन। येथासांग।।१२।।**

धुतलेली वस्त्रे घट्ट पिळून वाळत घालावी. पाय स्वच्छ पाण्याने धुवावे, नंतर देवाची पूजा, देवदर्शन यथासांग करावे. त्यामध्ये धांदल नको.

**कांहीं फळाहार घ्यावा। पुढें वेवसाये करावा। लोक आपला परावा। म्हणत जावा।।१३।।**

मग थोडासा फलाहार घ्यावा आणि आपला व्यवसाय असेल तो करावा. (अन्वय : ''परावा लोक आपला म्हणावा'') परक्या लोकांनासुद्धा आपले लोकच समजून व्यवहार करावा. (कारण ''पृथ्वीमध्ये जितुकी शरीरें । तितुकी भगवंताची घरें ।।' हा विचार प्रत्यक्ष आचारामध्ये आणण्याची ती संधीच आहे.)

**सुंदर अक्षर ल्याहावें। पष्ट नेमस्त वाचावें। विवरविवरों जाणावें। अर्थांतर।।१४।।**

लिहिताना अक्षर सुंदर काढावे. वाचन करताना स्पष्ट आणि व्यवस्थितपणे वाचावे. चिंतन मनन करून अर्थाच्या विविध छटा समजून घ्याव्या.

**नेमस्त नेटकें पुसावें। विशद करून सांगावें। प्रत्ययेविण बोलावें। तेंचि पाप।।१५।।**

काही विचारावयाचे असल्यास सुस्पष्ट व नेमक्या शब्दात विचारावे. काही सांगावयाचे असल्यास ते सोप्या शब्दात दुसऱ्यास समजेल असे सांगावे. (श्रोत्याची जाण मनात असावी) आणि जर प्रत्यक्ष अनुभव किंवा प्रत्यय घेतला नसेल तर सांगण्याचा प्रयत्न करणे हे पाप आहे.

**सावधानता असावी। नीतिमर्यादा राखावी। जनास माने ऐसी करावी। क्रियासिद्धि।।१६।।**

आपल्या आचारात सावधपणा असावा. नीतीची मर्यादा सांभाळावी. कोणतेही काम करताना ते लोकांना पसंत पडेल अशा पद्धतीने करावे. (आपल्या क्रियासिद्धीने कोणाचे मन दुखविले जात नाही ना, याची दखल घ्यावी.)

**आलियाचें समाधान। हरिकथा निरूपण। सर्वदा प्रसंग पाहोन। वर्तत जावें।।१७।।**

आपल्याकडे जो कोणी येईल त्याचे समाधान करावे. हरिकथा करावी, अध्यात्मनिरूपण करावे पण नेहमी प्रसंगमान ध्यानात घेतलेले असावे. प्रसंग पाहून वागावे.

**ताळ धाटी मुद्रा शुद्ध। अर्थ प्रमये अन्वये शुद्ध। गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध। अन्वयाचे।।१८।।**

ताल, म्हणण्याची पद्धत, धाटी, हावभाव (मुद्रा) हे शुद्ध असावे. अन्वयार्थ, गद्य, पद्य, सुसंबद्ध दृष्टांत यांचा उपयोग हरिकथेत करावा.

**गाणें वाजविणें नाचणें। हस्तन्यास[३] दाखवणें। सभारंजकें वचनें। आडकथा छंदबंद।।१९।।**

गाणे, बजावणे, नाचणे, हातांच्या हालचालीने अभिनय करणे, श्रोत्यांचे मनोरंजन करतील अशी वचने, उपकथा, छंदबंध यांचा उपयोग भगवंताच्या गोष्टी सांगताना करावा.

**बहुतांचें समाधान राखावें। बहुतांस मानेल तें बोलावें। विलग पडों नेदावें। कथेमधें।।२०।।**

पुष्कळांना पटेल असे बोलावे व त्यांचे समाधान करावे. कथेमध्ये असंबद्धपणा येऊ देऊ नये.

**लोकांस उदंड वाजी[४] आणूं नये। लोकांचे उकलावें हृदये। तरी मग स्वभावें होये। नामघोष।।२१।।**

लोकांना जिकीरीस आणू नये. (काही वेळा कंटाळवाणे बोलणारा वक्ता सभेचा अंत पाहातो. लोकांना रंजीस आणतो) लोकांची मने प्रफुल्लित होतील असे गोड भाषेत बोलावे. मग आपोआपच सर्वजण भगवंताच्या नामाचा घोष आनंदाने करतात.

**भक्ति ज्ञान वैराग्य योग। नाना साधनाचे प्रयोग। जेणें तुटे भवरोग। मननमात्रें।।२२।।**

भक्ती, ज्ञान, वैराग्य, योग, याबद्दल आणि नाना उपासना (किंवा साधना) यांचे अनुभव सांगावे. ज्यांचे चिंतन केल्यास माणसाला भवरोगातून मुक्त होण्याचा मार्ग दिसतो, त्याबद्दल बोलावे. (बहुसंख्य श्रोत्यांना हाच विषय जिव्हाळ्याचा वाटतो. त्यांच्या मनाला निरूपणातील शब्दांचा स्पर्श झाला पाहिजे.)

**जैसें बोलणें बोलावें। तैसेंचि चालणें चालावें। मग महंतलीला स्वभावें। आंगीं बाणे।।२३।।**

३) हस्तन्यास – हावभाव ४) वाजी – जिकीरीस

बोलल्याप्रमाणे आपले वर्तन असेल तरच महंताला वैभवाचे स्थान साहजिकपणे प्राप्त होते. (एखादा वक्ता जेव्हा भाषण करतो तेव्हा तो कसे प्रतिपादन करतो इकडे लोकांचे लक्ष असते. त्याच्या खाजगी जीवनाकडे कोणाचे लक्ष जात नाही पण एखादा प्रवचनकार जेव्हा निरूपण करू लागतो तेव्हा प्रथम श्रोत्यांचे लक्ष त्याच्या वर्तनाकडे असते हा महत्त्वाचा फरक श्रीसमर्थांनी येथे स्पष्ट दाखवून दिला आहे.)

**युक्तिवीण साजिरा योग। तो दुराशेचा रोग। संगतीच्या लोकांचा भोग। उभा ठेला।।२४।।**

अध्यात्मिक क्षेत्रातील नेता होण्याचा योग जरी चांगला असला, तरी विशिष्ट कौशल्य अंगी नसेल तर तो त्या महंताच्या दुराशेचा रोगच होय. (अशी दुराशा महंताने धरू नये.) महंताची असली दुराशा म्हणजे त्याच्या संगतीला आलेल्या लोकांचा दु:खद भोगच आहे. (त्यांचे ते दुर्दैवच आहे.)

**ऐसे न करावें सर्वथा। जनास पावऊं नये वेथा। हृदईं चिंतावें समर्था। रघुनाथजीसी।।२५।।**

असे कधीही करू नये. लोकांना उपद्रव होईल असे वागू नये. नेहमी हृदयामध्ये त्या समर्थ रामरायाचे चिंतन करीत असावे. (मनामध्ये भक्ती असेल तर उगाचच आपली थोरवी दाखवून गुरुस्थान पटकाविण्याची वाईट इच्छाच माणसाच्या मनात उद्भवणार नाही.)

**उदासवृत्तीस मानवे जन। विशेष कथानिरूपण। रामकथा ब्रह्मांड भेदून। पैलाड न्यावी।।२६।।**

महंताची वैराग्यशीलता आणि अनासक्त वृत्तीच लोकांना मनापासून आवडते. अशा महंताने श्रीरामांची पवित्र कथा ब्रह्मांडाचा भेद करून पलीकडे नेण्याची पराकाष्ठा करावी. (तल्लीनतेने एखादा धगधगीत वैराग्याचा पुरुष जेव्हा श्रोत्यांपुढे ही कथा मांडतो तेव्हा त्यांची अंत:करणे ती कथा काबीज करते हा श्रीसमर्थांचा अनुभव होता. याबाबतीत त्यांचे सावेश प्रतिपादन कसे आहे ते पहावे. 'रामकथा सर्वत्र पसरावी' असे ते म्हणत नाहीत तर ब्रह्मांडाचा भेद करण्याचे सामर्थ्य त्या कथेत आहे व नि:स्पृह कथाकारामध्ये आहे असे त्यांना थोडक्या शब्दात मांडावयाचे आहे.)

**सांग महंती संगीत गाणें। तेथें वैभवास काये उणें। नभामाजी तारांगणें। तैसें लोक।।२७।।**

सर्वांगाने परिपूर्ण महंत आणि त्याला जर संगीत गाण्याची जोड असेल तर त्याच्या वैभवाला काहीच उणे राहात नाही. आकाशातील नक्षत्रसमुहात जसे असंख्य तारे असतात तसे लोक त्याच्याभोवती गर्दी करतील. (आकाशामध्ये नक्षत्रमाला जागोजागी तारकापुंजानी सुशोभित दिसतात तसे जागोजागी महंत व लोक दिसावे ही श्रीसमर्थांची उत्कट इच्छा होती.)

**आकलबंद नाहीं जेथें। अवघेंचि विश्कळित तेथें। येकें आकलेविण तें। काये आहे।।२८।।**

जेथे बुद्धिवान पुरुष नसेल तेथे मात्र सारेच विस्कळित असते, म्हणून अगोदर हुषारी हवी मग सारे आपोआप जुळते.

**घालून अकलेचा पवाड[५] । व्हावें ब्रह्मांडाहून जाड[६] । तेथें कैंचें आणिले द्राड। करंटपण।।२९।।**

हुशारीने व्याप वाढवावा आणि ब्रह्मांड जसे विशाल आहे त्यापेक्षा विशाल व्हावे. बुद्धीचा असा विस्तार किंवा विकास केल्यावर द्राड करंटेपण किंवा भाग्यहीनता शिल्लकच कशी राहील? (सतत परिश्रमाने बुद्धीला खतपाणी करून तिची अमर्याद वाढ होऊ शकते यावर श्रीसमर्थांचा केवढा विश्वास आहे तो येथे प्रत्ययाला येतो.)

५) पवाड घालून – व्याप वाढवून ६) जाड – मोठे

**येथें आशंका फिटली। बुद्धि येत्नीं प्रवेशली। कांहीयेक आशा वाढली। अंत:कर्णी।।३०।।**

अशाप्रकारे (उपदेशाने) श्रोत्याच्या मनातील शंकेचे निरसन झाले. प्रयत्न करण्याचे महत्त्व बुद्धीमध्ये शिरले, त्यामुळे अंत:करणामध्ये थोडी आशा वाटू लागली. (भाग्याचे दिवस आपल्यालासुद्धा दिसतील अशी आशा मूळ प्रश्नकर्त्याच्या मनात निर्माण झाली.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे येत्नसिकवणनाम समास नवम।।९।।**

### प्रश्नपत्रिका ७ वी (दासबोध दशक १२, समास ९ 'येत्नसिकवण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ज्या ओव्या वरील समासांत आहेत त्या लिहा.

१) प्रत्येक माणसाने हे लक्षात ठेवावे की कोणतेही काम, मग ते लहान असो वा मोठे असो, केल्याशिवाय होत नाही.

२) भक्ति, ज्ञान, वैराग्य, योगाने व नाना साधनांनी भवरोग तुटून जातो.

३) बुद्धिमंद माणसापाशी सर्व अव्यवस्था आढळते. जगात हुशारीवाचून इतर कशालाही महत्त्व नाही.

प्र. २ प्रयत्नशील माणसांनी आपली जीवनपद्धती कशी ठेवावी असे समर्थांनी सांगितले आहे ते सात-आठ ओळीत लिहा.

प्र. ३ गाळलेल्या जागी शब्द लिहून ओवी पूर्ण लिहा.

१) अंतरीं नाहीं -----। येत्न ----- पुरता। ----- वार्ता। तेथें कैंची।।

२) जैसें ----- बोलावें। तैसेची -----। मग ----- स्वभावें। अंगीं बाणें।।

३) येथें ----- फिटली। बुद्धि येत्नीं -----। ----- वाढली। -----।।

प्र. ४ श्रीसमर्थांनी या समासांत कोणता महत्त्वाचा संदेश दिला आहे ते थोडक्यात लिहा.

प्र. ५ महंताच्या अंगी आवश्यक असणारी श्रीसमर्थांनी वर्णन केलेल्यापैकी ५ (पाच) लक्षणे सांगा.

# स्वाध्याय ८ वा : दशक १२ : समास १० वा : उत्तमपुरुषनिरूपण

सारांश : उत्तमपुरुषलक्षण द. १२-१० हा समास मोठा प्रेरक आहे. आपल्या धर्मातील आध्यात्मिक शिकवणीला अत्यंतिक निवृत्तिवादामुळे आलेली मरगळ श्रीसमर्थांनी घालविली. समाजामध्ये जाणती माणसे नेहमीच संख्येने कमी असतात पण त्यामुळेच त्यांच्यावर जबाबदारीही अधिक असते. त्यांनी जाणत्या माणसांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जो स्वत: तृप्त झाला त्याला जगाची काळजी असतेच असे नाही. पण संतवृत्तीची माणसे असे कधीच करीत नाहीत.

'आपण जेवोनि जेववी लोका । करी संतर्पण तुका ।' असे तुकाराम महाराज म्हणतात. या समासात श्रीसमर्थांनी तेच सांगितले आहे. या समासातील 'तरतेन बुडों नेदावे । बुडतयांसीं ।। हे अर्थपूर्ण उद्गार मननीय आहेत.

जगामध्ये अक्षरश: अनंत प्राणी आहेत. प्राणीपणाच्या दृष्टीने माणसासकट सगळे एकाच भूमिकेवर जगतात हे खरे, परंतु अध्यात्माच्या दृष्टीने विचार करता माणूस आणि माणूसेतर प्राणी असे दोन वर्ग करावे लागतात.

सर्व प्राण्यांत केवळ माणूसच आत्मज्ञानाचा अधिकारी आहे, पण या अधिकाराच्या दृष्टीने विचार करता माणसांत ज्ञानी व अज्ञानी असे दोन वर्ग पुन: करावे लागतात. आत्मज्ञानी माणूस हा श्रीसमर्थांचा उत्तम पुरुष होय. फारच थोडी माणसे आत्मज्ञानाच्या आपल्या अधिकाराचा उपयोग करतात, त्यामुळे मानवसमाजात एकंदर अज्ञानी माणसांचा भरणा अति मोठ्या प्रमाणावर आढळतो; परंतु याच कारणामुळे ज्ञानी पुरुषांवर फार मोठी सामाजिक जबाबदारी पडते. स्वत: ब्रह्मज्ञानी होऊन कृतकृत्य झाल्यावर ज्ञानी पुरुषाला या जगात स्वत:चे काही करायचे उरत नाही, म्हणूनच आपल्याभोवती पसरलेल्या अज्ञानी जनसमुदायाला त्याने आत्मज्ञान-सन्मुख करण्याची खटपट करावी असा ज्ञानी माणसाच्या बाबतीमध्ये श्रीसमर्थांचा आग्रह आहे. लोकांना आत्मज्ञानाकडे वळवण्यासाठी ज्ञानी पुरुषांच्या अंगी कोणते गुण असावेत, तसेच आपले कार्य यशस्वी होण्यास त्याने कोणते उपाय योजावे यांचे थोडक्यात पण मोठे अर्थगर्भ वर्णन या समासात पाहून घ्यावे. त्या वर्णनात मराठी भाषेचे सखोल अर्थवाहकपण सुद्धा स्पष्टपणे अनुभवास येते. श्रीसमर्थांचा हा उत्तम पुरुष महानुभाव असतो, खरा मोठा असतो. आत्मस्वरूपाच्या अत्यंत विशाल अनुभवामुळे तो स्वत: अति विशाल बनतो. देहबुद्धी जाळून टाकल्याने तो संपूर्ण स्वार्थरहित असतो. म्हणूनच स्वत:चे उरलेले आयुष्य तो दुसऱ्यासाठी खर्च करू शकतो. व्यवहारात वागताना हा ज्ञानी पुरुष मोठा प्रयत्नशील असतो. आपला वेळ तो कधीही वाया जाऊ देत नाही. त्याची वृत्ती अत्यंत शांत व क्षमाशील असते. तो जसे बोलतो तसे आचरण करतो. पण त्याचे बोलणे अत्यंत मृदु व मधुर असते. तसेच त्याचे वागणे अत्यंत नम्र असते. अशा ज्ञानी पुरुषाचा लोकसंग्रह यशस्वी होतो. आपल्या प्रबोधनशक्तीच्या जोरावर तो बहुतांचे मनोगत हाती घेतो आणि त्यांना धीर देऊन समाधान देतो. तो बरोबरच्या लोकांना हळूहळू तयार करतो, भगवंताच्या मार्गात चालवतो आणि अखेर आत्मज्ञानापर्यंत पोचवतो. ज्या समाजात अशा पुरुषांची परंपरा चालू राहते तो समाज धन्य होय.

|| **श्रीराम**||

**आपण येथेष्ट जेवणें। उरलें तें अन्न वाटणें। परंतु वाया दवडणें। हा धर्म नव्हे।।१।।**

आपण इष्ट असेल तितके (यथेष्ट; यथेच्छ नव्हे) जेवावे; आणि त्यानंतर उरलेले अन्न इतरांना वाटावे. उरलेले अन्न नासून खराब करून वाया घालवावे हा धर्म नाही.

**तैसें ज्ञानें तृप्त व्हावें। तेंचि ज्ञान जनास सांगावें। तरतेन[१] बुडों नेदावें। बुडतयासी।।२।।**

त्याप्रमाणेच आपण ज्ञानाने तृप्त झाल्यावर ते ज्ञान इतरांना सांगावे. ज्याला तरता येत आहे त्याने इतर बुडणाऱ्यांना वाचवावे. (येथे ज्ञान या शब्दाचा अर्थ आत्मज्ञान असा घेतला पाहिजे. आत्मज्ञानी असलेला जो पुरुष इतरांना आपल्या मार्गावर आणतो तोच श्रीसमर्थांचा उत्तमपुरुष होय.)

**उत्तम गुण स्वयें घ्यावे। ते बहुतांस सांगावे। वर्तल्याविण बोलावे। ते शब्द मिथ्या।।३।।**

आपण आधी स्वत: उत्तम गुण आत्मसात करावेत, मग ते इतरांना शिकवावे. स्वत: त्या गुणांचे आचरण न करताच इतरांना सांगितले तर ते शब्द वायफळ आहेत. सांगणारा खोटे बोलत असतो.

**स्नान संध्या देवार्चन। येकाग्र करावें जपध्यान। हरिकथा निरूपण। केलें पाहिजे।।४।।**

ज्ञानी माणसाने स्नान, संध्या, देवार्चन करावे. एकाग्र चित्ताने जपध्यान करावे. हरिकथा आणि निरूपणही करावे.

१) तरतेन - पोहोणाऱ्याने

**शरीर परोपकारीं लावावें। बहुतांच्या कार्यास यावें। उणें पडों नेदावें। कोणियेकाचें।।५।।**

शरीर परोपकारासाठी झिजवावे. पुष्कळ लोकांची कामे करून द्यावी. कोणाचेही कोठे उणे पडू देऊ नये. (''सर्व सुखी असावें । ऐसी वासना ।'' असेल तरच हे सहजपणे घडते.)

**आडलें जाकसलें[२] जाणावें। यथानशक्ति कामास यावें। मृदवचनें बोलत जावें। कोणीयेकासी।।६।।**

जे कोणी अडलेले, गुंतलेले असतील त्यांना जाणून घ्यावे आणि आपल्या कुवतीनुसार त्यांना सहाय्य करावे. कोणाशीही गोड भाषेत बोलावे. (कर्कश वचने टाळावी).

**दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें। परसंतोषें सुखी व्हावें। प्राणीमात्रांस मेळवून घ्यावें। बऱ्या शब्दें।।७।।**

दुसऱ्याचे दुःख पाहून दुःखी व्हावे आणि दुसऱ्यांचा आनंद पाहून आपणहि आनंदित व्हावे. (काही वेळा माणसांशी संबंध बिघडतातही त्यावेळी) गोड शब्द बोलून लोकांशी पुन्हा सख्य जुळवून घ्यावे.

**बहुतांचे अन्याये क्ष्मावे। बहुतांचे कार्यभाग करावे। आपल्यापरीस[३] व्हावे। पारखे[४] जन।।८।।**

पुष्कळांच्या अन्यायाबद्दल क्षमा करावी. पुष्कळांचे कार्यभाग करावे. (कार्यास मदत करावी.) मनमिळावू वृत्तीने वागून परके लोक आपल्या बाजूस वळवावे.

**दुसऱ्याचें अंतर जाणावें। तदनुसारचि वर्तावें। लोकांस परीक्षित जावें। नानाप्रकारें।।९।।**

दुसऱ्याच्या चित्तात काय आहे हे जाणून घेऊन त्या धोरणाने वागावे. अनेक प्रकारांनी लोकांचे अंतरंग परीक्षावे.

**नेमकचि बोलावें। तत्काळचि प्रतिवचन द्यावें। कदापी रागास न यावें। क्ष्मारूपें।।१०।।**

जरूर तितकेच बोलावे. लोकांच्या उत्तराला तत्काळ प्रत्युत्तर द्यावे पण क्षमावृत्तीचे बळावर रागावू नये. क्रोध आटोक्यात असला पाहिजे. (समयसूचकता या गुणाचा येथे संदर्भ आहे. आचार्य अत्रे यांचे एका ठिकाणी भाषण होते. सुरुवात करताना ते म्हणाले ''सभ्य गृहस्थहो'', इतक्यात श्रोत्यांपैकी एकजण कुत्सितपणे ओरडला ''ओऽ'' त्यावेळी लवमात्रही रागास न येता आचार्य अत्रे उद्गारले ''आपल्याला नव्हे सभ्यगृहस्थांना उद्देशून मी म्हणालो होतो.'' सर्वत्र हशा पिकला आणि कुत्सित श्रोता खजिल झाला.)

**आलस्य अवघाच दवडावा। येत्न उदंडचि करावा। शब्दमत्सर[५] न करावा। कोणी येकाचा।।११।।**

आळसाला पूर्णपणे विराम द्यावा. उदंड प्रयत्न करावा. शब्दमत्सरी होऊ नये. (कोणाच्या तोंडातून आपणाबद्दल गैर उच्चार झाला तर ते शब्द अखंडपणे चित्तात बाळगून त्याचा द्वेष करू नये.)

**उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा। शब्द निवडून बोलावा। सावधपणें करीत जावा। संसार आपला।।१२।।**

दुसऱ्यास उत्तम अशी वस्तू द्यावी. (बहुधा निवड करून हलकी वस्तू इतरांना दिली जाते.) शब्दांची योग्य निवड करून उच्चार करावा. (तुझे हे कृत्य चुकीचे आहे असे न म्हणता, ''तुझे बरोबरच आहे पण त्यापेक्षा असे तू केलेस तर अधिक बरे होईल का?'' अशी भाषा असावी.) आपला संसार सावधपणे करावा. (अविचारामुळे सगळ्या गोष्टीचा विचका होतो. व्यक्तिगत संसार आणि सामाजिक संसार या दोहोतही सावधानता हवी. 'म्हणौन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान ।।' १२-१-१४)

**मरणाचें स्मरण असावें। हरिभक्तीस सादर व्हावें। मरोन कीर्तीस उरवावें। येणें प्रकारें।।१३।।**

२) जाकसलें - गांजलेले ३) आपल्यापरीस - आपल्या बाजूचे ४) पारखे - परके ५) शब्द मत्सर करणे - दुसऱ्याचा एखादा शब्द धरून वितंडवाद करणे.

आपणास मरणाची आठवण असावी. ईश्वरभक्तीला सादर व्हावे. अशा प्रकारे जगावे की, मरून सुद्धा स्वत:ची किर्ती उरवावी.

**नेमकपणें वर्तों लागला। तो बहुतांस कळों आला। सर्व आर्जवी तयाला। काये उणें।।१४।।**

आपले ध्येय समजून जो प्रमाणबद्ध, योजनाबद्ध वर्तन करू लागतो तो बहुत लोकांना ठाऊक होतो. (तो कसा आहे हे लोकांना कळल्यावर त्याच्याबद्दल आदरभाव निर्माण होतो) त्यातून त्याची आर्जवी वृत्ती असेल तर त्याला जगात कशाचीही ददात पडणार नाही. (एखादी गोष्ट अधिकारी व्यक्तिसुद्धा नम्र किंवा आर्जवीवृत्तीने सांगते तेव्हा ती तत्काळ मान्य होते. 'सर्व आर्जवी' याचा अर्थ काही ठिकाणी सर्व लोकच त्याच्याशी आर्जवीवृत्तीने वागतात, असा केला आहे.)

**ऐसा उत्तम गुणी विशेष। तयास म्हणावें पुरुष। जयाच्या भजनें जगदीश। तृप्त होये।।१५।।**

अशा उत्तम गुणांनी युक्त असा जो असतो त्यालाच उत्तमपुरुष म्हणावे व त्याने केलेल्या भजनाने जगदीश संतुष्ट होतो. (आत्मज्ञान, परोपकारी वृत्ती, गोड संभाषण-कला, आणि मनापासूनचे वैराग्य या गुणांचे संमेलन ज्याच्या ठिकाणी असते तो उत्तमपुरुष.)

**उदंड धि:कारून बोलती। तरी चळों नेदावी शांति। दुर्जनास मिळोन जाती। धन्य ते साधु।।१६।।**

लोकांनी आपला अवमान होईल अशी कितीही भाषा वापरली तरी आपली मन:शांति ढळू देऊ नये. दुर्जनांशीसुद्धा सख्यत्वाने वागतात तेच खरे साधू. (द.१९-४ मधील ओव्या २५ व २६. ''मिथ्या शरीर निंदलें । तरी याचें काये गेलें ।'' म्हणून ''धीकारल्या धीकारेना । तोचि माहांपुरुष ।।'')

**उत्तम गुणीं शृंघारला। ज्ञानवैराग्यें शोभला। तोचि येक जाणावा भला। भूमंडळी।।१७।।**

जो पुरुष उत्तमगुणांनी शृंगारलेला असतो तो ज्ञान आणि वैराग्य यांच्यामुळे शोभून दिसतो. भूमंडळामध्ये तोच एक खरोखर चांगला महापुरुष असतो. (गुण हे अलंकाराप्रमाणे आहेत पण अलंकारसुद्धा शोभले पाहिजेत. ज्ञान आणि वैराग्य यांच्यामुळेच गुणालंकार शोभतात.)

**स्वयें आपण कष्टावें। बहुतांचें सोसित जावें। झिजोन कीर्तीस उरवावें। नाना प्रकारें।।१८।।**

आपण स्वत: कष्ट करावे. पुष्कळांचे पुष्कळ सोसावे. नाना प्रकारे लोकांसाठी झिजावे आणि मागे सद्कीर्ती राखावी.

**कीर्ती पाहों जातां सुख नाहीं। सुख पाहतां कीर्ती नाहीं। विचारेंविण कोठेंचि नाहीं। समाधान।।१९।।**

सद्कीर्ती राहावी अशी इच्छा असेल तर सुखाची इच्छा करू नये. आळसाचे सुख मिळावे इकडेच ध्यान दिले तर कीर्ती मागे उरणार नाही. खरे समाधान विचारांखेरीज कदापि मिळणार नाही.

**परांतरास न लावावा ढका[६] । कदापि पडों नेदावा चुका। क्षमासीळ तयाच्या तुका[७] । हानी नाहीं।।२०।।**

दुसऱ्याच्या अंत:करणास धक्का देऊ नये, गैरकृत्य कधीच करू नये. क्षमाशील असेल त्याच्या थोरवीला कधीच कमीपणा येणार नाही. (दुसऱ्याला आपणापासून मन:स्ताप होता कामा नये यासाठी जपले पाहिजे. त्यासाठीच विचार केला पाहिजे. विचारपूर्वक कृत्य केले तर वर्तनात चूक होऊन इतरांना मन:स्ताप होणार नाही.)

**आपलें अथवा परावें। कार्य अवघेंच करावें। प्रसंगीं कामास चुकवावें। हें विहित नव्हे।।२१।।**

काम, मग ते आपले असो वा दुसऱ्याचे असो ते परिपूर्ण करावे. वेळप्रसंगी काम करण्यात टाळाटाळ

६) ढका - धक्का ७) तुका - महत्त्वाला

करणे हे श्रेयस्कर नाही. (काम करण्याची मनापासून आवड असावी.)

**बरें बोलतां सुख वाटतें। हें तों प्रत्यक्ष कळतें। आत्मवत परावें तें। मानीत जावें।।२२।।**

गोड बोलण्यामुळे मनाला आनंद होतो याचा प्रत्यक्ष अनुभव येतो ना? म्हणून दुसऱ्याला आपल्याप्रमाणेच मानून वागावे.

**कठिण शब्दें वाईट वाटतें। हें तों प्रत्ययास येतें। तरी मग वाईट बोलावें तें। काये निमित्य।।२३।।**

कोणी कठोर शब्द बोलल्यास वाईट वाटते हाही नेहमीच येणारा रोकडा अनुभव आहे तर मग दुसऱ्याशी कोणत्यातरी निमित्ताने का बरे वाईट बोलावे?

**आपणास चिमोटा घेतला। तेणें कासाविस जाला। आपणावरून दुसऱ्याला। राखत जावें।।२४।।**

आपल्याला कोणी चिमटा घेतला तर जीव कासावीस होतो या आपल्या अनुभवावरून दुसऱ्याला राखीत जावे. (इतरांशी वर्तन करावे.)

**जे दुसऱ्यास दुःख करी। ते अपवित्र वैखरी। आपणास घात करी। कोणीयेके प्रसंगीं।।२५।।**

ज्या भाषेमुळे दुसऱ्याला वाईट वाटते ती भाषा अपवित्रच होय. एखाद्या प्रसंगी (बुमरँगप्रमाणे उलटून) ती भाषा आपला देखील घात करते.

**पेरिलें तें उगवतें। बोलण्यासारिखें उत्तर येतें। तरी मग कर्कश बोलावें तें। काये निमित्य।।२६।।**

जे पेरावे तेच उगवते, बोलल्याप्रमाणे उत्तराचे प्रतिसाद येतात असे आहे तर मग कडवट भाषा का वापरावी?

(वरील २२ ते २६ या ओव्या इतक्या मार्मिक शब्दात गोड बोलण्याची महती सांगत आहेत की त्या सर्वांना ठाऊक व्हाव्या यासाठी विशेषतः संक्रांतीच्या भेट-कार्डावर त्या लिहून पाठवाव्या.)

**आपल्या पुरुषार्थवैभवें। बहुतांस सुखी करावें। परंतु कष्टी करावें। हें राक्षेसी क्रिया।।२७।।**

आपण स्वपराक्रमाने सत्ता, सामर्थ्य मिळवावे आणि त्याने इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करावा. परंतु त्याचा दुरुपयोग करून इतरांना कष्टी करणे ही राक्षसी क्रिया आहे.

(या ओवीत पहिल्या २ चरणात श्रीरामांचे चरित्र आहे तर पुढील दोनमध्ये रावणाचे चरित्र आहे.)

**दंभ दर्प अभिमान। क्रोध आणी कठिण वचन। हें अज्ञानाचें लक्षण। भगवद्गीतेंत बोलिलें।।२८।।**

दंभ, गर्व, अभिमान, क्रोध आणि कठोर वाणी हे अज्ञानाचे लक्षण असल्याचे भगवद्गीतेत (अ.१६-४) सांगितले आहे.

**जो उत्तम गुणें शोभला। तोचि पुरुष माहांभला। कित्येक लोक तयाला। शोधीत फिरती।।२९।।**

या समासात वर्णिलेल्या उत्तम गुणांनीयुक्त असलेला तोच उत्तम पुरुष होय. त्याच्याकडे आकर्षित झालेले लोक त्याला शोधीत फिरतात.

**क्रियेविण शब्दज्ञान। तेंचि स्वानाचें वमन। भले तेथें अवलोकन। कदापि न करिती।।३०।।**

प्रत्यक्ष क्रिया आचरणात न आणणारे जे केवळ शब्दज्ञान असते ते कुत्र्याच्या ओकाप्रमाणे किळसवाणे असते. त्यामुळे भली माणसे तिकडे पहात सुद्धा नाहीत.

**मनापासून भक्ति करणें। उत्तम गुण अगत्य धरणें। तया महांपुरुषाकारणें। धुंडीत येती।।३१।।**

जो अंतःकरणापासून ईश्वराची भक्ती करतो आणि उत्तम गुणांनीयुक्त असतो तो महापुरुष असतो. त्याचा

शोध घेण्यासाठी लोक हिंडतात. (श्री समर्थांची नेमकी हीच अवस्था होती. समर्थप्रताप ग्रंथामध्ये गिरीधर म्हणतात ''श्री गुरु समर्थ येकांती बैसती । लोक दर्शनार्थ येती । सकळ प्रांतीचा स्वामी परामर्श घेती । चिंता करती विश्वाची ।।'')

**ऐसा जो महानुभाव। तेणें करावा समुदाव। भक्तियोगें देवाधिदेव। आपुला करावा।।३२।।**

वर सांगितलेल्या गुणांचा अंगीकार केलेला जो महापुरुष किंवा महंत असतो त्याने लोकसंग्रह करावा. त्यांना भक्तिमार्गास लावून परमेश्वराला संतुष्ट करावे. देव आपलासा करावा.

**आपण आवचितें मरोन जावें। मग भजन कोणें करावें। याकारणें भजनास लावावें। बहुत लोक।।३३।।**

आपण केव्हातरी आकस्मिक मरून गेलो तर मग देवाचे भजन कोण करणार, (असा विचार करून) या कारणाने पुष्कळ लोकांना भजनमार्गाला लावावे.

**आमची प्रतिज्ञा ऐसी। कांहीं न मागावें शिष्यासी। आपणामागें जगदीशासी। भजत जावें।।३४।।**

आमची अशी प्रतिज्ञा आहे की शिष्यवर्गाकडे कशाचीही याचना करावयाची नाही. आमच्या पश्चात त्यांनी परमेश्वराचे भजन करावे इतकीच मागणी आहे.

(श्रीसमर्थांनी २० दशकी दासबोध पूर्ण करून झाल्यावर त्यांनी एक शेवटची ओवी सांगून ती द.१२-१० मध्ये घालण्यास सांगितली तीच ही ३४ वी ओवी होय. आपणा सर्वांना श्रीसमर्थांनी केलेली ती आज्ञाच होय. संदर्भ : श्रीसमर्थावतार, ले. स. भ. शंकरराव देव, पृष्ठ ४७४)

**याकारणें समुदाव। जाला पाहिजे मोहोछाव। हातोपातीं देवाधिदेव। वोळेसा करावा।।३५।।**

हे घडण्यासाठी लोकांचा समुदाय केला पाहिजे आणि मोठा उत्सव झाला पाहिजे. परमेश्वर कृपा करील असे हस्तेपरस्ते केले पाहिजे.

**आता समुदायाकारणें। पाहिजेती दोनी लक्षणें। श्रोतीं येथें सावधपणें। मन घालावें।।३६।।**

लोकसंग्रह तयार करण्यासाठी दोन लक्षणे महंताच्या अंगी असली पाहिजेत. त्यांच्याकडे आता अवधान द्यावे.

**जेणें बहुतांस घडे भक्ति। ते हे रोकडी प्रबोधशक्ति[८]। बहुतांचे मनोगत हातीं-। घेतलें पाहिजें।।३७।।**

लोकांमध्ये भक्ती निर्माण होण्यासाठी रोकडी प्रबोधनाची शक्ती असली पाहिजे आणि पुष्कळ लोकांचे जे मनोगत असेल ते हाती घेतले पाहिजे. (ते मनोगत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.)

**मागां बोलिले उत्तम गुण। तयास मानिती प्रमाण। प्रबोधशक्तीचें लक्षण। पुढें चालें।।३८।।**

यापूर्वी जे उत्तम गुण सांगितले आहेत ते ज्याच्या ठिकाणी असतील त्याला लोक (आपला नेता) मानू लागतात. मग त्याच्या प्रबोधनाला यश येते. (त्यामुळे त्याचे कार्य वाढू लागते.)

**बोलण्यासारिखें चालणें। स्वयें करून बोलणें। तयाचीं वचनें प्रमाणें। मानिती जनीं।।३९।।**

बोलल्याप्रमाणे ज्याची कृती असते आणि जो स्वत: करून नंतर लोकांना करावयास सांगतो त्याचा उपदेश लोक प्रमाण मानतात.

**जें जें जनास मानेना। तें तें जनहि मानीना। आपण येकला जन नाना। सृष्टिमधें।।४०।।**

८) प्रबोध शक्ति - नीट समजावण्याचे सामर्थ्य

जे लोकांना आवडत नाही ते करण्यास लोक तयार होणार नाहीत. सृष्टीत आपण एकटे आणि लोक तर पुष्कळ आहेत. (लोकशाही जमान्यासाठी हा विचार अत्यंत मोलाचा आहे. बहुसंख्य मते आपल्या बाजूला असली तरच आपले म्हणणे मांडण्याची सोय होते.)

**म्हणोन सांगाती[९] असावे। मानत मानत सिकवावे। हळुहळु सेवटा न्यावे। विवेकानें।।४१।।**

म्हणून प्रथम सहकारी तयार केले पाहिजेत. त्याना सांभाळत हळूहळू शिकवावे आणि विवेकाने त्यांना आपल्या उपदेशाच्या शेवटच्या पायरीपर्यंत न्यावे. (महंताने एकदम धांदल करून अनुयायांना मागे येण्यास लावू नये.

मुलाच्या मनोगतें बोलावें । मुलाच्या मनोगतें चालावें ।
तैसे जनास सिकवावें । हळुंहळुं ।। याच विचाराची छाया येथे दिसते.)

**परंतु हे विवेकाचीं कामें। विवेकीं करील नेमें। इतर ते बापुडें भ्रमें। भांडोंच लागले।।४२।।**

ही विवेकाची कामे आहेत. जो विचारवंत पुढारी असेल तोच नियमाने (चिकाटीने) ही कामे करील. इतर बिचारे भ्रमाने परस्परात भांडत बसतील. (आणि कार्य पुढे रेटणारच नाही.)

**बहुतांसीं भांडतां येकला। शैन्यावांचून पुरवला। याकारणें बहुतांला। राजी राखावें।।४३।।**

सैन्याचे पाठबळ असल्याविना एकटा सेनापती कितीसा टिकाव धरू शकेल? त्यासाठी पुष्कळ लोकांना (अनुयायी मंडळींना) संतुष्ट ठेवावे (म्हणजेच ते पाठराखण करतील.) (लोकसंग्रहाची कितीतरी बहुमोल सूत्रे या समासामध्ये दिली गेली आहेत. आपली दासबोध अभ्यास मंडळे चालवितानासुद्धा त्या सूत्रांकडून मार्गदर्शन होऊ शकेल.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास दशम।।१०।।**

## प्रश्नपत्रिका ८ वी (दासबोध दशक १२, समास १० 'उत्तमपुरुषनिरूपण'वर आधारित)

प्र. १ अ) या समासामध्ये श्रीसमर्थांनी एक प्रतिज्ञा केली आहे, ती ओवी लिहा.
ब) कीर्तिरूपाने उरण्यासाठी काय करावे, या संबंधात असलेल्या दोन ओव्या लिहा.

प्र. २ आपले बोलणे गोड का असावे, या संबंधात या समासात समर्थांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत?

प्र. ३ पुढील ओवी-चरणांचे थोडक्यात स्पष्टीकरण करा.
अ) तरतेन बुडों नेदावें। बुडतयासि।
ब) सुख पाहतां कीर्ती नाहीं।

प्र. ४ लोकप्रिय नेत्याच्या अंगी कोणता मुख्य गुण असला पाहिजे असे समर्थ म्हणतात?

प्र. ५ पुढील अर्थ ज्या ओव्यांमध्ये आहे त्या संपूर्ण ओव्या लिहा.
१) लोकांची नाना प्रकारे परीक्षा करीत असावे.
२) अन्न वाया दवडणे हा अधर्म आहे.
३) दुसऱ्यांना दु:खी करणे ही राक्षसी क्रिया.

९) सांगाती - सोबती

# स्वाध्याय ९ वा : दशक १८ : समास ६ वा : उत्तमपुरुषलक्षण

**सारांश :** द. १८-६ उत्तमपुरुषनिरूपणाचा हा दुसरा समास वाचण्यापूर्वी थोडासा इतिहासाचा संदर्भ ध्यानात घेणे आवश्यक आहे; तरच यातील ओव्यांचे मर्म आपल्या ध्यानी येईल. आपल्या देशाचे युगपुरुष छत्रपति शिवाजीमहाराज (१६३०-१६८०) यांच्या जीवनाच्या संबंधात या समासात उल्लेख आहे. अफजलखानाचे भेटीला जाण्यापूर्वी शिवाजीमहाराज समर्थांच्या दर्शनास आले त्यावेळीच्या संदर्भात समासाच्या पूर्वार्धातील ओव्या दिसतात. ३ ऱ्या ओवीपासून ८ वी पर्यंत खानाचे जणू शब्दचित्रच आपण वाचत आहोत असे वाटते आणि त्याच्या वधानंतर

'बरें, ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भोवानी ।

परंतु विचार पाहोनी । कार्ये करणें ।।' ही ओवी आणि त्यापुढील सर्व ओव्या असाव्यात. १३ व्या ओवीपासून २१ व्या ओवीपर्यंत जणू शिवरायांच्या सद्गुणांचे आणि कामगिरीचे वर्णन आहे.

'माहायेत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें ।

अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ।।' हे त्यांचे मूर्तिमंत वर्णन आहे. अभ्यासार्थींना येथे एक सूचना करावीशी वाटते की, 'निश्चयाचा महामेरु ।।' हे जे प्रसिद्ध पत्र श्रीसमर्थांनी शिवरायांना पाठविले ते शेजारी ठेऊन या समासाचा अभ्यास करावा. त्यातील शिवरायांच्या गुणांची महती आणि या समासातील उत्तमपुरुषाचे वर्णन किती मिळते जुळते आहे ते पहावे. या समासामध्ये शिवाजी महाराजांच्या नावाचा स्पष्ट उल्लेख कोठे नाही. पण आजवर दासबोधावर ज्यांनी प्रकाश टाकला त्या स. भ. नानासाहेब देव (१८७१-१९५८), ल. रा. पांगारकर (१८७२-१९४१), प्रा. बेलसरे (१९०९-१९९८) यांनी या समासाबद्दल लिहिताना शिवाजी महाराजांचा उल्लेख केला आहे. समाजाला अखंड सावधानतेची सूचना देणारा हा समास नित्य अभ्यासात असावा.

'धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।

जाले आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचें ।।' ही दिलासा देणारी ओवी समर्थांनी येथे लिहून ठेविली आहे. श्रीसमर्थ शिवरायांना जणू ईश्वराचा अवतारच मानत होते असा अर्थ या ओवीतून निघतो.

या दशकाच्या चौथ्या समासामध्येच श्रीसमर्थांनी आपल्याला असे स्पष्ट सांगितले आहे की, 'जे जे देहे धरूनी आले, ते ते कांहीं करून गेले' अर्थ - ज्यांनी ज्यांनी या जगात देह धारण केला, त्या प्रत्येकाने जगात काहीतरी कर्म केले. कर्म करणे म्हणजे बदल करणे. या दृष्टीने प्रत्येक माणूस जगात काहीतरी बदल करतो. बदल चांगला किंवा वाईट असतो. ज्या माणसांच्या अंगी विशेष कर्तृत्वशक्ती वास करते, ती जगामध्ये अधिक बदल घडवून आणतात. पण हा सगळा व्यवहार स्वार्थाच्या पार्श्वभूमीवर केला जातो. याच्या उलट जगात काही माणसे अशी जन्मास येतात की, त्यांच्या अंगी मोठे कर्तृत्व असते, पण त्यांचा सारा कर्मसंभार नि:स्वार्थीपणाच्या पवित्र पार्श्वभूमीवर उभारलेला असतो. श्रीसमर्थांचे म्हणणे असे की, असली माणसे ईश्वरी कृपेला पात्र झालेली असतात. ईश्वरी शक्ती त्यांच्या मागे रक्षणार्थ सदैव सिद्ध असते. त्यांच्या हातून घडणारे कार्य ईश्वरी कार्य असते. प्रत्येक समाजामध्ये, प्रत्येक शतकामध्ये मानवी जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रात असली माणसे निर्माण होत असतात. श्रीसमर्थांच्या काळी भारतीय हिंदू समाजात शिवाजीराजे असे पुरुष होऊन गेले. त्यांचे शब्दचित्र या समासामध्ये आढळते. शिवाजी महाराज काही आत्मज्ञानी अथवा ब्रह्मज्ञानी संत नव्हते;

परंतु ‘सर्वभूतहिते रत:’ किंवा ‘बहुजन हिताय बहुजन सुखायच’ हे त्यांचे ब्रीद होते. अशा माणसांच्या हातून मोठी, भव्य व अद्‌भुत कामगिरी पार पडते. त्यांच्या जीवनात पदोपदी नाट्यप्रसंग उद्‌भवतात व त्यांच्यातून ईश्वरी कृपेने ते सहीसलामत पार पडतात. त्यांचा प्रभाव समाजाच्या सर्व अंगावर पडतो. त्यामुळे समाजाच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल होतो. नवीन मूल्ये, नवीन ध्येये, नवे कर्तृत्व, साहस उदयास येतात. समाज गतिमान होतो. श्रीसमर्थ यास धर्मस्थापना असे नाव देतात. अशा प्रकारची धर्मस्थापना करणारा पुरुष सतत परोपकार करतो, पुष्कळ लोकांना सांभाळतो, पुष्कळ लोकांना आधार देतो. असे पुरुष पूर्वी झाले, आता आहेत व पुढे होणार आहेत.

प्रास्ताविक : सारांशाने सांगायचे झाल्यास श्रीसमर्थांच्या काळी श्रीशिवाजी राजे हे एक ईश्वरी कृपेला पात्र झालेले सत्पुरुष होऊन गेले त्यांचे शब्दचित्र या समासामध्ये आढळते; पण प्रारंभीच्या ३ ते ६ या ओव्या वाचताना तर एखाद्या खलपुरुषाचे वर्णन येथे आढळते; हे येथे का आले आहे? त्याचा संदर्भ लागावा म्हणून या समासाची पार्श्वभूमी ठाऊक करून घेण्याची आवश्यकता आहे.

शके १६०३ (इ.स. १६८१) च्या मार्गशीर्षामध्ये श्रीसमर्थांनी दासबोध ग्रंथाच्या रचनेवर शेवटचा हात फिरविताना जुळवाजुळव करून दोनशे समासांचा ग्रंथराज दासबोध निर्माण केला त्यावेळी पूर्वी लिहिलेल्या काही ओवीबद्ध पत्रांचा समावेश ग्रंथात केला.

समग्र समासाचे अर्थाच्या दृष्टीने विश्लेषण केल्यास आपणास असे आढळून येते की १ ते १२ ओव्या शिवाजीमहाराज खानाच्या भेटीला जाण्यापूर्वीच्या पत्रातील असाव्यात. त्यामध्ये ३ ते ६ ओव्यात जणू अफझलखानाचे वर्णनच आहे आणि पुढील ओव्या काहीशा मार्गदर्शक सूचना देणाऱ्या दिसतात.

पुढील १३ ते २० ओव्या शिवरायांनी खानावर विजय मिळविल्यानंतर त्याना पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रातील असाव्यात. सावधपणे महान यत्न करणे आणि प्रसंगी धारिष्ट धरून अद्‌भुत शौर्य प्रगट करणे हे शिवरायांचे गुणवर्णन केले आहे पण हे ‘‘आपणास ईश्वरी देणे आहे’’ असे उद्‌गार १२ ते १८ ओव्यांमध्ये एकसारखे काढून ‘अहंकाराचा वारा लागू देऊ नका’ असा गर्भित इषारा दिला आहे. सद्‌गुरु शिष्याची काळजी कशा प्रकारे घेतात त्याचेहि दिग्दर्शन त्यातून होते.

एकंदरीत १ ते १२ आणि १३ ते २० अशा ओव्यांची दोन स्वतंत्र पत्रे एकत्रित करून हा समास निर्माण झाला आहे असे दिसते.

।। **श्रीराम**।।

**नाना वस्त्रें नाना भूषणें। येणें शरीर श्रृंघारणें। विवेकें विचारें राजकारणें। अंतर श्रृंघारिजे।।१।।**

अनेक प्रकारचे अलंकार आणि वस्त्रे यांनी शरीर सुशोभित केले जाते पण विवेक, विचार आणि राजकारण यांनी अंत:करण सुशोभित करावे.

**शरीर सुंदर सतेज। वस्त्रें भूषणें केलें सज्ज। अंतरीं नसतां चातुर्यबीज। कदापी शोभा न पवे।।२।।**

एखाद्याचे शरीर सुंदर आणि तजेलदार आहे पण अंतरामध्ये जर चतुरपणाची बीजे नसतील तर ते कधीच शोभिवंत दिसणार नाही.

**तुंड हेंकाड कठोरवचनी। अखंड तोले[१] साभिमानी। न्याय नीति अंत:कर्णीं। घेणार नाहीं।।३।।**

१) तोले - डौलाने वागतो २) अपस्मार - पिशाच्यासारखा दुष्ट ३) तट - पक्ष

तोंडाळ, हेकट (माझे तेच खरे मानणारा) आणि कठोर भाषा वापरणारा, अभिमानाच्या तोऱ्यामध्ये डुलत असतो. तो न्याय, नीतीचा विचारसुद्धा मनात आणत नाही.

**तऱ्हे सीघ्रकोपी सदा। कदापि न धरी मर्यादा। राजकारण संवादा। मिळोंचि नेणे।।४।।**

तो तऱ्हेवाईक वृत्तीचा असून कोणाची मुलाहिजा ठेवीत नाही. तो चटकन रागावणारा असतो. राजकारणात समेट करण्याचा (किंवा सुसंवाद करण्याचा) विचार करीत नाही.

**ऐसें लौंद बेइमानी। कदापि सत्य नाहीं वचनीं। पापी अपस्मार[२] जनीं। राक्षेस जाणावे।।५।।**

अशा प्रकारच्या लबाड, विश्वासघातकी माणसाच्या बोलण्यात खरेपणा कधीच नसतो. अशी लहरी आणि पापी माणसे राक्षसच समजावी. (फेफरे येणाऱ्या माणसास झटके येतात तशाच अशा माणसाच्या लहरी असतात.)

**समयासारिखा समयो येना। नेम सहसा चालेना। नेम धरितां, राजकारणा। अंतर पडे ।।६।।**

(राजकारणामध्ये) सर्व प्रसंग सारखेच येत नाहीत म्हणून वर्तणुकीचा एकच नियम तेथे उपयुक्त ठरत नाही. नियमाचा आग्रह धरून बसल्यास राजकारण साधत नाही.

**अति सर्वत्र वर्जावें। प्रसंग पाहोन चालावें। हटनिग्रही न पडावें। विवेकी पुरुषें।।७।।**

(म्हणून राजकारणात) अति नेमस्तपणा सोडून द्यावा. प्रसंग पाहून वर्तन करावे. विचारवंत पुरुषाने हट्टीपणाने उगाचच नेमस्तपणाचा आग्रह धरून बसू नये.

**बहुतचि करितां हट। तेथें येऊन पडिला तट[३] । कोणी येकाचा सेवट। जाला पाहिजे।।८।।**

फार हट्ट धरून बसल्यास आपसातच फूट होते आणि पक्ष उत्पन्न होतात. अशा वेळी कोणत्यातरी एका पक्षाचा शेवट होतो.

(वरील तीन ओव्यांमधील आशय असा दिसतो की शत्रुपक्ष जेव्हा नीतीन्यायाचा विचारसुद्धा करीत नाही तेव्हा आपण त्या नियमांचे एकतर्फी पालन करण्याने राजकारणाचा घात होतो. श्रीकृष्णाने हीच नीती कर्णवधप्रसंगी पांडवांना सांगितली.)

**बरें ईश्वर आहे साभिमानी। विशेष तुळजा भोवानी। परंतु विचार पाहोनी। कार्ये करणें।।९।।**

ईश्वराला आपला अभिमान आहे हे बरे आहे. त्यातल्या त्यात (कुलदेवता) तुळजाभवानीची आपणावर विशेष कृपा आहे तथापि विचारपूर्वक तजवीज करून कार्य करावे.

(वरील ओवीचा लक्षार्थ नीट समजून घेतला पाहिजे. ईश्वराची कृपा जरी प्रत्ययाला आली तरी भोंगळपणाने कशाही प्रकारे कोणत्याही प्रसंगात वागून चालणार नाही अशी सूचना श्री समर्थ येथे करीत आहेत. लढाईत यश मिळण्यासाठी रणक्षेत्राचा अभ्यास, शत्रुपक्षाची लष्कराची स्थिती, संख्याबळ, इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केला पाहिजे. हे सर्व केल्यासच तुळजाभवानीच्या कृपेने यश प्राप्त होईल, इतका आशय या ओवीत आहे. ऐहिक सत्ता आणि पारलौकिक सत्ता यामध्ये वैचारिक गल्लत होता कामा नये.)

**अखंडचि सावधाना। बहुत काये करावी सूचना। परंतु कांहीं येक अनुमाना। आणिलें पाहिजे।।१०।।**

आपण नेहमी सावध आहातच. आपणास सूचना करण्याचे कारण नाही. परंतु काही गोष्टी अनुमानात (किंवा तर्कात) आणून वागले पाहिजे.

२) अपस्मार - पिशाच्यासारखा दुष्ट ३) तट - पक्ष

**समर्थांपासीं बहुत जन। राहिला पाहिजे साभिमान। निश्चळ करूनियां मन। लोक असती।।११।।**

सामर्थ्यसंपन्न पुरुषापाशी अनेक माणसे असतात त्यांचा अभिमान धरला पाहिजे. तो पाहून ती माणसे निश्चल निष्ठेने वागतात. (नेत्याचा जर अनुयायांवरच अविश्वास असेल तर तेही चंचल मनाचे बनतात.)

**म्लेंच[४] दुर्जन उदंड। बहुतां दिसाचें माजलें बंड। याकारणें अखंड। सावधान असावें।।१२।।**

दुर्जन (दुष्ट प्रवृत्तीच्या) म्लेंच्छांचे (यवनांचे) फार दिवसांचे बंड माजलेले आहे. त्यामुळे अखंड सावध राहिले पाहिजे. (गाफीलपणा झाला की घात झालाच. या ओवीतील 'बंड' हा शब्द फारच अर्थवाही आहे. म्लेंच्छांनी जरी राजसत्ता प्राप्त केली असली तरी ते खरे राजे नाहीत. बंडखोराला सत्ता मिळाली तरी मूळ सत्तेच्या दृष्टीने तो राजा नव्हे तर बंडखोरच आहे. यवनी सत्ता हे बंडच आहे अशी सूचना त्या शब्दाने ओवीत दिलेली आहे.)

**सकळकर्ता तो ईश्वरु। तेणें केला आंगिकारु। तया पुरुषाचा विचारु। विरुळा जाणे।।१३।।**

सर्व गोष्टींचा खरा कर्ता ईश्वर आहे. त्या ईश्वरानेच ज्याच्यावर कृपा केली आहे, त्या पुरुषाचा दृष्टीकोन (विचार) एखाद्यालाच कळतो.

(अफझुलखानाच्या स्वारीप्रसंगी शिवरायांनी जो विचार केला आणि विविध कामगिऱ्या निरनिराळ्या लोकांवर सोपविल्या त्याबद्दलची अंतस्थ योजना निकटवर्तीयांना देखील कळली नव्हती. कामगिरी फत्ते झाल्यावरच त्यांना तो उलगडा झाला.)

**न्याय नीति विवेक विचार। नाना प्रसंगप्रकार। परिक्षिणें परांतर। देणें ईश्वराचें।।१४।।**

न्याय, नीती, विवेक (पर्यायातून निवड केलेला विचार) अनेक प्रसंगांना (यशस्वी) तोंड देणे, इतरांच्या मनातील विचार नेमके समजणे या गोष्टी ज्याला साध्य होतात त्याला ईश्वरी कृपाच प्राप्त झालेली असते.

**माहायेत्न सावधपणें। समईं धारिष्ट धरणें। अद्भुतचि कार्य करणें। देणें ईश्वराचें।।१५।।**

अत्यंत खबरदारी बाळगून महान यत्न करणे, कठीण प्रसंगी धीर धरून साहसाने अद्भुत पराक्रम करणे हे ईश्वरी देणे आहे.

**येश कीर्ती प्रताप महिमा। उत्तम गुणासी नाहीं सीमा। नाहीं दुसरी उपमा। देणें ईश्वराचें।।१६।।**

यश, कीर्ती, प्रताप यांचा महिमा ज्याला प्राप्त झाला आहे, ज्याच्या उत्तमोत्तम गुणांना अन्यत्र तुलना नाही त्याला ईश्वरी कृपाच प्राप्त झाली आहे असे समजावे.

**देव ब्राह्मण आचार विचार। कितेक जनासी आधार। सदा घडे परोपकार। देणें ईश्वराचें।।१७।।**

जो देव, ब्राह्मणाविषयी आचार विचार सांभाळतो, जो कितीतरी लोकांचा आधार असतो, ज्याच्या हातून सतत परोपकार घडत असतो त्याच्यावर ईश्वरी कृपा असते.

**येहलोक परलोक पाहाणें। अखंड सावधपणें राहाणें। बहुत जनाचें साहाणें। देणें ईश्वराचें।।१८।।**

जो इहलोक आणि त्याचबरोबर परलोकाबद्दलही विचार करतो, जो अखंड सावधपणे राहातो, जो अनेक लोकांचे (दु:ख) सोसतो हे ईश्वराचे देणेच आहे.

**देवाचा कैपक्ष घेणें। ब्राह्मणाची चिंता वाहाणें। बहु जनासी पाळणें। देणें ईश्वराचें।।१९।।**

४) म्लेंच - म्लेंच्छ

देवाचा कैवार घेणे, ब्राह्मणांची चिंता करणे, सर्व लोकांचे संरक्षण करणे हे ईश्वरी देणे आहे.

**धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार। जाले आहेत, पुढें होणार। देणें ईश्वराचें।।२०।।**

धर्मस्थापना (धर्मावरील संकट नाहिसे करून पुनर्स्थापना) करणारे पुरुष (हे ईश्वराचे जणु अवतारच असतात,) पूर्वी झाले होते, आज (तुमच्या रूपात) आहेत व पुढेही होतील ही ईश्वरी कृपाच आहे.

(शिवाजी महाराजांना श्रीसमर्थ ईश्वरी अवतारच मानीत असत असे या ओवीतील शब्दप्रयोगावरून दिसते.)

**उत्तम गुणाचा ग्राहिक। तर्क तीक्षण विवेक। धर्मवासना पुण्यश्लोक। देणे ईश्वराचें।।२१।।**

जो उत्तमगुणाची कदर करतो, ज्याचा तर्क आणि विवेक तीक्ष्ण आहे, ज्याची वासना धर्माकडे आहे आणि ज्याने पुण्यकर्मे केली आहेत तो पुरुष म्हणजे समाजाला ईश्वरी देणगीच आहे.

**सकळ गुणांमधें सार। तजविजा विवेक विचार। जेणें पाविजे पैलपार। अरत्रपरत्रींचा।।२२।।**

ज्या विवेक विचाराने प्रपंच आणि परमार्थ यामध्ये यशप्राप्ती होते, ज्यामुळे पैलपार जाता येते अशा युक्त्या प्रयुक्त्या करणे हे सर्व गुणांचे सार आहे.

(या शेवटच्या ओवीवरून केवळ ऐहिक यशप्राप्ती हे जीवनाचे ध्येय नसून परमार्थाचे अवधान असणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे हे सूचित केले आहे. श्रीसमर्थांचा उपदेश केवळ एकांगी कोठेही नाही.)

सूचना - दासबोध अभ्यासमंडळामध्ये या समासाचा अभ्यास करताना श्रीशिवरायांना समर्थांनी लिहिलेले प्रसिद्ध पत्र (निश्चयाचा महामेरु।) आणि ह्या समासातील ओव्यांतील शिवरायांच्या सद्गुणदर्शक ओव्या यांची तुलना केली जावी. तसेच प्रतापगडची झुंज समजून घेण्यासाठी श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे 'राजा शिवछत्रपति' यासारखे पुस्तक संदर्भार्थ घेतले जावे. यामुळे अभ्यासाला जिवंतपणा येतो आणि प्रबोधन सखोल होऊन दासबोधाबद्दल अधिकच गोडी वाटते याचा अनुभव घ्यावा.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास षष्ठम्।।६।।**

## प्रश्नपत्रिका ९ वी (दासबोध दशक १८, समास ६ 'उत्तमपुरुषलक्षण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या या समासात आहेत त्या लिहा.

१) ज्या योगाने इहपरलोकांचा पैलपार गाठता येतो असा विवेक आणि योजना हे सर्व गुणांचे सार आहे.

२) धर्मस्थापना करणारे पुरुष हे ईश्वराचे अवतार असतात. ते पूर्वी होते, आज आहेत, पुढे होतील.

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते या समासातील ओवीच्या आधारे सांगा.

१) केवळ वस्त्रालंकारामुळेच माणसाचे शरीर शोभून दिसते.

२) वेळ व प्रसंग नेहमी सारखे नसतात म्हणून एकच नियम सतत चालत नाही.

३) तुळजाभवानीची कृपा ज्याच्यावर असेल त्याने विचारपूर्वक कार्य करण्याची आवश्यकता नाही.

प्र. ३ राक्षसी वृत्तीच्या माणसाची प्रमुख लक्षणे सांगा.

प्र. ४ या समासामध्ये एखाद्या उत्तम पुरुषाचे शब्दचित्र आहे असे तुम्हाला वाटते काय? तो पुरुष कोण असावा?

प्र. ५ ओव्या पूर्ण करा.

१) ----- चि सावधाना। ----- काये ----- सूचना।

२) अति ----- वर्जावें। ----- पाहोन -----। ----- न पडावें। ----- पुरुषें।।

३) सकळकर्ता -----। तेणें ----- आंगिकारू। ----- पुरुषाचा -----। ----- जाणें।।

## स्वाध्याय १० वा : दशक १९ : समास १० वा : विवेकलक्षणनिरूपण

सारांश : द. १९-१० विवेकलक्षण. अध्यात्मिक विचारातून मानवता सजीव होते आणि आचरणात येते. आज हिंसेचे, भ्रष्टाचाराचे, अनीतिचे अनेक प्रकार वाढत आहेत. त्यांचे बीजच नष्ट करावयाचे असेल तर अध्यात्मिक विचारांची पेरणी जनमानसात करावयास हवी. विचार केवळ पोथीत देऊन चालणार नाहीत. हजारोहजारांच्या संख्येत या कार्यासाठी माणसे हवी आहेत. समर्थांच्याकाळी त्यांनी अशी माणसे निर्माण केली होती. त्यांचे मठ आणि आसेतुहिमाचल पसरलेला शिष्यसंप्रदाय याची साक्ष देईल. 'शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन ।। १९-१०-१४ ही महत्त्वाची ओवी याच समासात आहे.

'आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।

आपण धरावें धरवावें । भजनमार्गीसीं ।। १९-१०-१७।। हा श्री समर्थांचा आग्रह आपण समजावून घेतला पाहिजे. संसार नेटका करावयास सांगणाऱ्या समर्थांनी आणखी एक मननीय विचार याच समासात मांडला आहे. तो असा की, 'संसार नेटका करण्याचा यत्न विवेकाने केला असता संसारामधील आसक्तीच क्षीण होत जाते.' अशी आसक्ती नष्ट झालेली माणसे दासबोधाचा उत्कृष्ट प्रसार करू शकतात. आज त्याची नितांत आवश्यकता आहे.

लोकांना जागृत करून त्यांना सन्मार्गाला लावण्यासाठी श्रीसमर्थांचा महंत लोकसमुदाय निर्माण करतो. लोकांमध्ये माणसांच्या तऱ्हा अनेक असल्याने समूहाचे नेतृत्व करणाऱ्या महंताला सरसकट वागून चालत नाही. कार्य चांगले घडून येण्यासाठी त्याला अनेक युक्त्याप्रयुक्त्या वापराव्या लागतात. त्या वापरून कार्य करणे म्हणजे महंताचे राजकारण होय. महंताच्या राजकारणाचा म्हणजे त्याच्या कार्यपद्धतीचा सारांश या समासात सांगितला आहे. श्रीसमर्थ बजावतात की, महंत स्वत: वैराग्यवान असावा. त्याने आपली उदासवृत्ती कधी सोडू नये. उपाधीत राहावे लागले तरी त्याने आपले अलिप्तपण गमावू नये. महंताने लोकांना श्रवण, मनन शिकवावे व विवेकवान बनवावे. आपल्याला जे जे येते ते ते लोकांना शिकवावे. लोकांना ते चटकन् आले नाही, तरी त्यांना परोपरीने शिकवावे. अशा रीतीने बहुजन समाज शहाणा करावा. कोणतीही गोष्ट स्वत: आपण करावी आणि मग ती लोकांकडून करवून घ्यावी. नवीन नवीन लोकांना शिकवीत असावे. उपाधीला कंटाळू नये. देहाला सुख देऊ नये. पण मीपणाने उपाधीत अडकू नये. जोपर्यंत व्याप सांभाळणे जमेल तोपर्यंत सांभाळावा. नाहीतर तो सोडून चालते व्हावे. कीर्ती व सुख एके ठिकाणी राहू शकत नाहीत. हा संसार अशाश्वत असल्याने मुळातच नासका आहे. त्यातल्यात्यात तो विवेकाने केला, तर त्याची आसक्ती क्षीण होत जाते.

।। श्रीराम।।

**जेथें अखंड नाना चाळणा। जेथें अखंड नाना धारणा। जेथें अखंड राजकारणा-। मनासी आणिती।।१।।**

ज्या ठिकाणी महंत असतो तेथे अनेक विषयांवर सतत विचारविनिमय चालू असतो. तेथे नानाप्रकारच्या

समस्यांवर आणि राजकीय प्रश्नांवर चर्चा चालते. (अध्यात्म, उपासना, राजकारण हे तीन विषय चर्चिले जातात.)

**सृष्टीमधें उत्तम गुण। तितुकें चालें निरूपण। निरूपणाविण क्षण। रिकामा नाहीं।।२।।**

जगात जे सद्‌गुण आहेत त्यांच्याबद्दल तेथे निरूपण चालते. निरूपणावाचून तेथे एक क्षणही रिकामा जात नाही. (भगवंताचे ठिकाणी सर्व सद्‌गुण असतात त्याला षड्‌गुणैश्वर म्हणतात. त्याच्या गुणांचे म्हणजे भगवंताचेच निरूपण तेथे होते.)

**चर्चा आशंका प्रत्योत्तरें। कोण खोटें कोण खरें। नाना वग्त्रुत्वें शास्त्राधारें। नाना चर्चा।।३।।**

अनेक शंकाच्या उत्तराबद्दल साधार चर्चा तेथे होते. कोण खरे कोण लबाड याबद्दल शास्त्राच्या आधारे नानाप्रकारे चर्चा होतात. (सार, असार, सत्य असत्य याबद्दल निश्चिती तेथे होते.)

**भक्तिमार्ग विशद कळे। उपासनामार्ग आकळे। ज्ञानविचार निवळे। अंतर्यामीं।।४।।**

तेथे भक्तिमार्गाचे स्वरूप स्पष्टपणे कळते, उपासनामार्गाचे आकलन होते. माणसाच्या अंतर्यामी ज्ञानविचार स्पष्ट होऊन स्थिर होतो. ('विभक्त नव्हे तो भक्त' ही भक्तीची व्याख्या दासबोधात केली आहे. अहंभाव पूर्णपणे नाहिसा करण्यासाठी उपासना किंवा साधना हवी. या उपासनेतून परमेश्वराचे सत्यस्वरूप कळणे हे ज्ञान होय. या सर्व संबंधात महंताचे निरूपण चालू असते.)

**वैराग्याची बहु आवडी। उदास वृत्तीची गोडी। उदंड उपाधी तरी, सोडी-। लागोंच नेदी।।५।।**

महंताला वास्तविक वैराग्याची आवड, आणि उदासवृत्तीची गोडी असते पण त्याच्या मागे कामे फार. तथापि या कामाच्या उपाधीत तो स्वत: सापडत नाही (कमलपत्राप्रमाणे त्याची वृत्ती असते)

**प्रबंदाचीं पाठांतरें। उत्तरासी संगीत[१] उत्तरें। नेमके बोलतां अंतरें। निववी सकळांचीं।।६।।**

त्याला साहित्य (प्रबंध) तोंडपाठ असतात त्यामुळे प्रश्नांची उत्तरे तो समाधानकारक देऊ शकतो. त्याच्या सुयोग्य व नेमक्या उत्तरांमुळे सर्वांच्या अंत:करणाची तृप्ती होते.

**आवडी लागली बहु जना। तेथें कोणाचें कांहीं चालेना। दळवट[२] पडिला अनुमाना। येईल कैसा।।७।।**

त्याच्याबद्दल भोवतालच्या लोकांमध्ये प्रेमादराची भावना असते म्हणून तेथे विचक्षणी लोकांचे काही चालत नाही. त्याच्या परिसरात जरी गर्दी असली तरी त्याच्या अंतरंगाबद्दल त्यातील कोणालाच कल्पना येत नाही.

**उपासना करूनियां पुढें। पुरवलें पाहिजे चहुंकडे। भूमंडळीं जिकडे तिकडे। जाणती तया।।८।।**

ईश्वराची उपासना करून तिचा प्रसार करण्यासाठी तो सर्वत्र जातो. त्यामुळे जगामध्ये तो सर्वांना ठाऊक होतो. (उपासना ही ढालीप्रमाणे त्याचे रक्षण करते. तिच्या आश्रयाने सर्वत्र संचार करण्याचा आदेश या ओवीत आढळतो.)

**जाणती परी आडळेना। काये करितो तें कळेना। नाना देसीचे लोक नाना। येऊन जाती।।९।।**

लोकांना महंत ठाऊक असतो पण तो सहज प्राप्त होत नाही तो नेमके काय करतो हे कळत नाही. अनेक देशाचे नाना प्रकारचे लोक त्याला भेटावयास येऊन जातात.

(स्वाध्याय ८ ओवी ३१ चे स्पष्टीकरण पहावे. ही ओवी म्हणजे श्रीसमर्थांचे जणू आत्मचरित्रच आहे.)

१) संगीत - समर्पक २) दळवट पडला - समुदायाची गर्दी झाली

**तितुक्यांचीं अंतरें धरावीं। विवेकें विचारें भरावीं। कडोविकडीची[३] विवरावीं। अंत:कर्णे।।१०।।**

भेटीसाठी आलेल्या सर्वांची मने तो सांभाळतो आणि त्यांच्या अंत:करणात विवेकाची पेरणी करतो. ज्यांच्या मनामध्ये वैचारिक गोंधळ माजून जे एकान्तिक वृत्तीचे झालेले असतात त्यांना महंत निश्चयात्मक उपदेश खुबीने करतो.

**किती लोक तें कळेना। किती समुदाव आकळेना। सकळ लोक श्रवणमनना। मध्यें घाली।।११।।**

त्याला मानणारे किती लोक आहेत ते इतरांना कळत नाही. त्याच्या लोकसंग्रहाची मोजदाद करता येत नाही पण त्या सर्वांना तो श्रवण मननाच्या मार्गाला लावतो.

**फड समजाविसी करणें। गद्यपद्य सांगणें। परांतरासी राखणें। सर्वकाळ।।१२।।**

आपल्या अनुयायांची समजूत घालणे, त्यांना गद्य पद्य (समजावून) सांगणे. दुसऱ्याचे मन सर्वकाळ राजी राखणे हे तो सांभाळतो.

**ऐसा ज्याचा दंडक। अखंड पाहाणें विवेक। सावधापुढें अविवेक। येईल कैंचा।।१३।।**

असा त्याचा शिरस्ता (नित्यनेम असल्याने) तो सर्वकाळ विवेकाने वागतो. अशाप्रकारे सावधपणा बाळगणाऱ्याकडून अविवेकाचे वर्तन होतच नाही.

**जितुकें कांहीं आपणासी ठावें। तितुकें हळुहळु सिकवावें। शाहाणें करूनि सोडावे। बहुत जन।।१४।।**

जे काही ज्ञान आपल्याकडे असेल ते सारे लोकांना हळूहळू देत असावे. पुष्कळ लोकांना शहाणे करावे. (हे महंताचे कार्यच असते.)

**परोपरीं सिकवणें। आडणुका सांगत जाणें। निवळ[४] करुनी सोडणें। निस्पृहासी।।१५।।**

विशेषत: जो वृत्तीने नि:स्पृह आहे अशा अनुयायाला परोपरीने शिकवावे, त्याच्या मनातील संशय किंवा शंका निपटून काढून टाकाव्या.

**होईल तें आपण करावें। न होतां जनाकरवीं करवावें। भगवद्भजन राहावें। हा धर्म नव्हे।।१६।।**

जास्तीत जास्त समाजकार्य किंवा देवकार्य आपण स्वत: करावे व जे हातून होणार नाही ते लोकांकरवी करवावे. पण भगवंताचे भजन मागे राहून जावे हे योग्य नव्हे.

(ईश्वरभक्तीची प्रेरणा देणे हेच काम प्रमुख असल्याचे तो महंत जाणतो.)

**आपण करावें करवावें। आपण विवरावें विवरवावें। आपण धरावें धरवावें। भजनमार्गासी।।१७।।**

आपण स्वत: करावे आणि इतरांकडूनही करवावे. आपण विवरण करावे आणि इतरांनाही विवरण करण्यास सांगावे, आपण भजनमार्ग धरावाच पण इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करावे. (श्रीसमर्थांची समाजाच्या हिताची जाण आणि लोकसंग्रहाची वृत्ती अशा ओव्यातून प्रगट होते.)

**जुन्या लोकांचा कंटाळा आला। तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला। जितुकें होईल तितुक्याला। आळस करूं नये।।१८।।**

काही वेळा परिचित लोकांकडून कार्य होत नाही तेव्हा त्यांचा कंटाळा येतो. अशावेळी नवीन ठिकाणी जावे व तेथे महंती करावी. होईल ते कार्य करण्यास आळस करू नये.

**देह्याचा अभ्यास बुडाला। म्हणिजे महंत बुडाला। लागवेगें नूतन लोकांला। शाहाणें करावें।।१९।।**

३) कडोविकडीची – दुःखी कष्टी झालेली, आडमार्गास गेलेली ४) निवळ – निःसंदेह

देहाचा अभ्यास बुडाला की महंत बुडाला असे समजावे. म्हणून शक्य तितक्या लगबगीने नवीन लोकांना शहाणे करावे. महंताने आपल्या देहाला सेवेमध्ये सारखा राबविला पाहिजे. तो आळसावला की सबंध लोकसमूह आळसावतो, त्याने उपासना ढीली पडते व कार्याचा नाश होतो.

**उपाधींत सांपडो नये। उपाधीस कंटाळों नये। निसुगपण[५] कामा नये। कोणीयेकविषीं।।२०।।**

महंताने उपाधीत सापडू नये तथापि त्याने उपाधीला (किंवा कार्याच्या व्यापाला) कंटाळून जाता कामा नये. कोणत्याही कामाबद्दल आळस किंवा सुस्ती येता कामा नये.

**काम नासणार नासतें। आपण वेडें उगेंच पाहातें। आळसी हृदयसुन्य तें। कार्यें करूं जाणे।।२१।।**

सुस्तीमुळे कामाचा व्हायचा तो सर्वनाश होतो. वेडेपणाने हा तिकडे उगाचच नुसते पाहात राहातो. आळशी आणि हृदयशून्य (भावनारहित) असणाऱ्याकडून काहीच (सत्कार्य) घडत नाही.

**धकाधकीचा मामला। कैसा घडे अशक्ताला। नाना बुद्धि शक्ताला। म्हणोनी सिकवाव्या।।२२।।**

महंताचे कार्य हे सोपे नसते तो धकाधकीचा मामला असतो. जो देहाने, मनाने, वृत्तीने दुबळा असतो त्याच्याकडून महंती होणे शक्य नाही यासाठी महंताने दुबळ्यांना त्या कामासाठी हाती न धरता बलवान लोकांनाच नानाप्रकारच्या युक्त्या, विचार किंवा कुशलतेच्या गोष्टी शिकवाव्या. (महंतापाशी व्यक्तीची पारख करण्याची कला असली पाहिजे.)

**व्याप होईल तों राहावें। व्याप राहातां उठोन जावें। आनंदरूप फिरावें। कोठें तऱ्हीं।।२३।।**

कामाचा व्याप सुसह्य होईल, तेथपर्यंतच लोकांमध्ये महंताने राहावे. आणि तो सांभाळणे अशक्य होताच दूर निघून जावे. कोठेतरी आनंदी अवस्थेत परिभ्रमण करावे. (चिडचीड करणाऱ्याच्या हातून महंतीचे कार्य मुळीसुद्धा होऊ शकत नाही.)

**उपाधीपासुनी सुटला। तो निस्पृहपणें बळावला। जिकडे अनकूल तिकडे चालिला। सावकास।।२४।।**

जो उपाधीपासून स्वेच्छेने सुटून जातो त्याची निस्पृहता मजबूत राहाते. जेथे कार्याला अनुकूल परिस्थिती असेल तेथे स्थिर मनाने तो जाऊ शकतो. (महंताने व्याप वाढवीत असतानासुद्धा परिभ्रमण करून सर्व ठिकाणची परिस्थिती पाहून ठेवावी. एके जागी प्रस्थान ठेवताच दुसऱ्या ठिकाणी कार्याची मुहुर्तमेढ रोवावी. हे मोठे मार्मिक मार्गदर्शन येथे केले आहे.)

**कीर्ति पाहातां सुख नाहीं। सुख पाहातां कीर्ति नाहीं। केल्याविण कांहींच नाहीं। कोठें तऱ्हीं।।२५।।**

कीर्ती हवी असेल तर सुखासीनतेची अपेक्षा करू नये. सुखासीनता हवी असेल तर कीर्ती लाभणार नाही. (हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे. स्वाध्याय ८ द. १२-१०-१९ ही ओवी अशीच आहे.) कोणतेही कार्य (प्रयत्नपूर्वक चिकाटीने) केल्याशिवाय होऊच शकत नाही. मनुष्य कोठेही जावो, हाच प्रत्यय येतो.

**येरवीं काय राहातें। होणार तितुकें होऊन जातें। प्राणीमात्र अशक्त तें। पुढें आहे।।२६।।**

आपण केले नाही म्हणून कार्य व्हावयाचे ते थांबणार नसते. दुर्बळ प्राणी मात्र कामे न करण्याची निमित्ते सांगत मागे राहातो. (मग त्याचे महत्त्व शिल्लक राहात नाही त्याच्या पदरी दुबळेपणा येतो.)

**आधींच तकवा[६] सोडिला। मधेंचि धीवसा[७] सांडिला। तरी संसार हा सेवटाला। कैसा पावे।।२७।।**

५) निसुगपण - कामचुकारपणा

संसार करीत असताना तो परिपूर्ण होण्यापूर्वीच जर उत्साह अगोदरच सोडून दिला, मध्यंतरीच जर धीर सोडला, तर हा संसार शेवटपर्यंत कसा निभावून नेता येईल? (संसारात संकटे ही यावयाचीच हे गृहित धरले पाहिजे. मनाच्या नेभळेपणाने संकटाला तोंड देता येणार नाही. तकवा या शब्दाचा अर्थ काही ठिकाणी उत्साह किंवा जोर असा दिला आहे. ''लवचिकपणा'' असाही त्याचा अर्थ आहे. ओल्या मातीचा गोळा जसा दाबावा तसा आकार घेतो; असे माणसाचे मन संकटप्रसंगी लवचिक असेल तर दैवी आपत्ती कोसळल्यावरही मनुष्य तग धरू शकतो. ''ठेविले अनंते तैसेचि राहावें । चित्तीं असू द्यावें समाधान ।।'' याप्रमाणे मनातील समाधानाला धक्का न लागू देता आघात सहन करणे आणि धैर्य धरून पुढे वाटचाल करणे आवश्यक ठरते.)

**संसार मुळींच नासका। विवेकें करावा नेटका। नेटका करितां, फिका[८] –। होत जातो।।२८।।**

संसारामध्ये उत्पत्ती, स्थिती आणि लय ही गती असल्याने तो मुळामध्येच अशाश्वत आहे. विवेकाच्या आधाराने संसार नीटनेटका, व्यवस्थित करावयाचा प्रयत्न करावा. तो नीटनेटका करताना त्यातील आसक्तीच कमी होत जाते. (निदान आसक्ती कमी होत जावी ही अपेक्षा आहे.)

**ऐसा याचा जिनसाना[९] । पाहातां कळों येतें मना। परंतु धीर सांडावाना। कोणी येकें।।२९।।**

ज्या मालमसाल्याच्या आधाराने संसाराची इमारत उभी केली जाते त्याची नीट पहाणी केली तर तो अशाश्वत आहे हे मनाला समजून येते. तथापि हे जरी खरे असले तरीही कोणी धीर सोडून देऊ नये.

**धीर सांडितां काये होतें। अवघें सोसावें लागतें। नाना बुद्धि नाना मतें। शाहाणा जाणें।।३०।।**

(कारण) धीर सोडल्याने काहीच साधत नाही. जे दुःख सोसावयाचे ते सोसावेच लागते. (मग धीटपणे संकटाला सामोरे का जाऊ नये, हे या सांगण्याचा भावार्थ आहे.) शहाणा मनुष्य अशा नाना प्रकारचे विचार बुद्धीत आणतो, अशा प्रकारची अनेक लोकांची मते जाणतो. (त्यामुळे तो संकटातही विचलित होत नाही. अशा प्रकारचा मोठाच सांत्वन करणारा विचार या समासाच्या अखेरीला मांडला आहे. आजवर लक्षावधी लोकांना त्यातून जीवनावश्यक धैर्यही मिळाले आहे. आकाशींची जणू कुऱ्हाडच मस्तकावर कोसळलेल्या अवस्थेत एका विधवा भगिनीने या ओव्यांच्या आधारावर मनाचा तोल तर सांभाळलाच पण आपल्या एकुलत्या एक मुलाचे संगोपन, संवर्धन, शिक्षण मोठ्या हिंमतीने केले. गरीबीवर मात करून मुलाला परदेशातील उच्च पदवी प्राप्त करून दिली.)

श्रीसमर्थांच्या या विवेकलक्षण निरूपणाचा अर्थ जीवनामध्ये प्रत्यक्ष उतरविणारी अशी किती तरी उदाहरणे आहेत. दीनदुबळ्या जीवांवर आलेल्या संकटप्रसंगी दुसरे सर्वसामान्य जीव कोणते सांत्वन देऊ शकणार? पण अशावेळी श्रीज्ञानदेव, तुकाराम, समर्थादि संतांच्या वाङमयातून त्या होरपळलेल्या जीवांना जीवनासाठी आधार मिळतो. दासबोधातील वरील २७ ते ३० ओव्यांचे सामर्थ्य संकटग्रस्त जीवांना प्रत्ययाला येते. जीवनासाठी नवप्रेरणा देणाऱ्या या ओव्यांचा अर्थ नीट समजून घ्यावा. ''फिका होणे'' म्हणजे आसक्ती कमी होणे. ''जिनसाना'' = घटक वस्तू किंवा मालमसाला, तकवा = उत्साह, जोर, चिवटपणा इत्यादि अर्थांच्या छटा समजून घेऊन निरनिराळ्या प्रकारे लक्ष्यार्थ समजून घेतला पाहिजे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकलक्षणनिरूपणनाम समास दशम्।।१०।।**

६) तकवा – चिवटपणा ७) धीवसा – धैर्य ८) फिका होणे – गोडी किंवा आसक्ति कमी होणे ९) जिनसाना – स्वरूप

**प्रश्नपत्रिका १० वी (दासबोध दशक १९ समास १० वा 'विवेकलक्षणनिरूपण' वर आधारित)**

प्र. १ या समासामध्ये समर्थ रामदासांचे व्यक्तिचित्रच जणू साकारले आहे, अशा तीन ओव्या शोधून लिहा.

प्र. २ दशक १२ समास १० मध्ये आणि या समासामध्ये एका ओवीची पहिली ओळ बहुतांशी समान आहे, ती ओवी कोणती?

प्र. ३ समर्थांच्या मठामध्ये काय चालत असे याचे वर्णन याच समासात आढळते, त्याबद्दल पाच ओळीत उत्तर द्या.

प्र. ४ थोडक्यात उत्तरे द्या.

अ) शक्यतो शक्तिवंताला अनेक प्रकारचे विचार सांगणे इष्ट का?

ब) महंताने कार्याचा व्याप वाढविताना कोणती खबरदारी घ्यावी?

प्र. ५ अ) निष्क्रियता सोडून भक्तिमार्गाचा प्रसार करावा, हे सांगणाऱ्या दोन ओव्या लिहा.

ब) दासबोधाचा प्रसार व्हावा असे आपणास का वाटते?

## स्वाध्याय ११ वा : दशक १४ : समास ६ वा : चातुर्यलक्षण

**सारांश :** द. १४-६ चातुर्य-लक्षण. समर्थांच्या उपदेशातील प्रेरकता येथे प्रत्ययाला येते. अवगुणांचा त्याग करून माणसाला सद्गुण प्राप्त करून घेण्याचा अभ्यास प्रयत्नसाध्य आहे असे निक्षून ते सांगतात. या समासामध्ये अत्यंत पुरुषार्थाचे विचार त्यांनी मांडले आहेत. मिळमिळीतपणाचा अंशही येथे नाही. 'व्याप तितका संताप' हा वाक्प्रचार खोडून काढून 'जितुका व्याप तितुके वैभव' हा विचार हा मराठी संन्यासी जेव्हा सांगू लागतो तेव्हा मन थक्क होऊन जाते! अनेक लोकांना अनुकूल करून घेण्याचे मर्मही याच समासात सांगितले आहे. लोकशाही जमान्यामध्ये सद्विचारांची माणसे बहुसंख्य असण्याची आवश्यकता असते म्हणून या समासामधील विचारांना अधिकच मोल आहे.

हे दृश्य विश्व भास आहे, मिथ्या आहे, तात्पुरते आहे, असा कोणी कितीही आक्रोश केला तरी माणसाला अखेर या जगातच, येथील मानव-समाजातच आपले जीवन घालवावे लागते. शिवाय जीवनाचा जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी माणसाने प्रयत्न केला तर तो करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी आहे. म्हणून प्रत्येक माणसाने स्वप्रयत्नाने निरनिराळ्या गुणांचा विकास करावा आणि आपले व्यक्तिमत्व प्रभावशाली करावे, असे श्रीसमर्थ पुन:पुन: सांगत आहेत. प्रत्येक माणूस जगात थोडातरी बदल करू शकतो. तो बदल करण्यास त्याने स्वत:पासून आरंभ करावा. स्वत:मध्ये बदल घडवून आणल्यावर त्याने इतर माणसांमध्ये तसाच बदल घडवून आणण्याचे व्रत स्वीकारावे. अशा रीतीने ज्या प्रकारच्या परिस्थितीत आपण जगात पाऊल टाकले तिच्यामध्ये थोडी का होईना पण सुधारणा करून जग सोडावे. स्वत:मध्ये आणि जगामध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा करता येणे शक्य आहे, त्याचे वर्णन या समासात आढळते. श्रीसमर्थांच्या सांगण्याचा भावार्थ असा : (एक) माणसाला शहाणपण शिकता येते. (दोन) अंगी नसलेल्या उत्तम गुणांचा मनापासून अभ्यास करावा. (तीन) ऐश्वर्य मिळवून भोगावे. (चार) शरीराने व मनाने झिजावे. (पाच) व्याप वाढवून वैभव भोगावे.(सहा) बहुतांचे

अंतरी भरावे. (सात) शहाणे करावे जन आणि पतित करावे पावन. (आठ) जगामध्ये भगवद्भजन वाढवावे.

।। श्रीराम।।

**रूप लावण्य अभ्यासिता न ये। सहजगुणास[१] न चले उपाये। कांहीं तरी धरावी सोये। अगांतुक[२] गुणाची।।१।।**

माणसाला त्याचे (चेहरा, रंग, उंची इत्यादींमुळे) लाभलेले रूप स्वप्रयत्नांनी पालटता येत नाही. ते जन्मजात असल्याने त्यावर काही इलाज चालत नाही म्हणून त्याने प्रयत्नसाध्य अशा गुणांच्या किंवा अगांतुक गुणांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावा. (येथे श्रीसमर्थ गुणांचे वर्गीकरण दोन भागात करतात. जे उपजत प्राप्त झाले ते सहजगुण आणि प्रयत्नाने प्राप्त होतात ते अगांतुक गुण.)

**काळें माणूस गोरें होयेना। वनाळास[३] येत्न चालेना। मुक्यास वाचा फुटेना। हा सहजगुण ।।२।।**

काळे माणूस (प्रयत्नामुळे) गोरे होऊ शकत नाही. तोंडावर निसर्गत: असलेले व्रण प्रयत्नाने जात नाहीत, मुका मनुष्य बोलू शकत नाही हे त्याचे सहजगुण (किंवा जन्मजात गुण) आहेत.

**आंधळे डोळस होयेना। बधिर तें ऐकेना। पांगुळ पाये घेईना। हा सहजगुण ।।३।।**

आंधळे माणूस डोळस होत नाही, बहिऱ्यास ऐकू येत नाही, पांगळ्यास चालता येत नाही हे उपजत गुण आहेत.

**कुरुपतेचीं लक्षणें। किती म्हणोनि सांगणें। रूप लावण्य याकारणें। पालटेना ।।४।।**

कुरूपतेची अनेक लक्षणे आहेत; किती म्हणून ती सांगावी? म्हणून रूप आणि सौंदर्य प्रयत्नांनी बदलता येत नाही. (असे पहिल्या ओवीतहि सांगितले.)

**अवगुण सोडितां जाती। उत्तम गुण अभ्यासितां येती। कुविद्या सांडून, सिकती। शाहाणे विद्या ।।५।।**

(परंतु अवगुणांचे मात्र असे नाही) अवगुण सोडावयाचे ठरविले तर ते सोडता येतात आणि उत्तम गुण प्रयत्नांनी आत्मसात करता येतात, शहाणा मनुष्य अवगुणांचा त्याग करून उत्तम गुणांचा स्वीकार करतो. (प्रयत्न केला असता मनुष्य स्वत:मध्ये आमूलाग्र बदल अशा प्रकारे करू शकतो. हरतऱ्हेच्या कला, क्रीडा यामध्ये तो प्राविण्य मिळवू शकतो. परोपकार, दयाळूवृत्ती यासारख्या सद्वृत्ती तो वाढवू शकतो हा सिद्धांत सुस्पष्टपणे या समासात मांडण्यात आला असल्याने हा समास विद्यार्थ्यांना शाळकरी वयातच पाठान्तराला देण्याइतका महत्त्वाचा आहे.)

**मूर्खपण सांडितां जातें। शाहाणपण सिकता येतें। कारबार करितां उमजतें। सकळ कांहीं ।।६।।**

मूर्खपण सोडावयाचे म्हटले तर सोडता येते व शहाणपण शिकता येते. त्या दृष्टीनेच प्रयत्न केले तर हे सर्व समजते.

**मान्यता आवडे जीवीं। तरी कां उपेक्षा करावी। चातुर्येंविण उंच पदवी। कदापी नाहीं ।।७।।**

आपल्याला जर लोकांमध्ये मान्यता हवी अशी आवड असेल तर सद्गुण मिळविण्याच्या प्रयत्नांची उपेक्षा आपण का बरे करावी? चातुर्य किंवा शहाणपण अंगी असल्याविना श्रेष्ठपणा कधीच मिळत नाही.

**ऐसी प्रचित येते मना। तरी कां स्वहित कराना। सन्मार्गें चालतां, जनां। सज्जना माने ।।८।।**

या गोष्टीची जीवनात प्रचिती येते तर मग स्वत:चे हित करण्याच्या प्रयत्नात टाळाटाळ का करावी? जो

१) सहजगुण - जन्मतः आलेले गुण २) अगांतुक - नवीन ३) वनाळ - देवीचे वण असलेला चेहरा

सन्मार्गाने जातो तोच सज्जनांना आवडतो.

**देहे नेटकें श्रुंघारिलें। परी चातुर्येंविण नासलें। गुणेंविण साजिरें केलें। बाष्कळ जैसें ।।९।।**

स्वत:चे शरीर कितीही (वस्त्रालंकाराने) सजविले तरी शहाणपणाविना ते वाया जाते. एखाद्या वेड्याला उगाचच गुणावाचून सजविल्यासारखे हे होते.

**अंतर्कळा श्रुंघारावी। नानापरी उमजवावी। संपदा मेळऊन भोगावी। सावकास ।।१०।।**

माणसाने आपले अंतरंग सद्गुणांनी श्रृंगारावे. नाना प्रकारचे ज्ञान त्यात साठवावे. (त्याच्या सहाय्याने) संपत्ती किंवा वैभव प्रथम प्राप्त करावे आणि सावकाश त्याचा उपभोग घ्यावा. (सन्मार्गाने संपत्ती प्राप्त करून तिचा उपयोग करण्याचा उपदेश विद्यार्थ्यांना प्रेरकच आहे.)

**प्रेत्न करीना सिकेना। शरीर तेंहि कष्टवीना। उत्तम गुण घेईंना। सदाकोपी ।।११।।**

जो मनुष्य स्वत: प्रयत्न करीत नाही, शिकत नाही, कष्ट करीत नाही, आणि उत्तम गुणांचा स्वीकार करीत नाही तो सदा कोपिष्ट आणि चिडचिड करणारा असतो.

**आपण दुसऱ्यास करावें। तें उसिणें सवेंचि घ्यावें। जना कष्टवितां कष्टावें। लागेल बहु ।।१२।।**

आपण दुसऱ्याला जे केले असेल त्या उसन्याची परतफेड तशीच करावी लागते. लोकाला आपण त्रास दिला तर आपणालासुद्धा त्यांचा त्रास सहन करावा लागतो म्हणून आपण कष्टी होतो.

**न्यायें वर्तेल तो शाहाणा। अन्याइ तो दैन्यवाणा। नाना चातुर्याच्या खुणा। चतुर जाणे ।।१३।।**

जो न्यायाने वागतो तो शहाणा समजावा व अन्यायाने वागतो तो दैन्यवाणा होय. नाना प्रकारे चातुर्याने कसे वागावे याची लक्षणे शहाण्या लोकांनाच ठाऊक असतात.

**जें बहुतांस मानलें। तें बहुतीं मान्य केलें। येर तें वेर्थचि गेले। जगनिंद्य ।।१४।।**

जे पुष्कळांच्या पसंतीस पडते तिचा स्वीकार त्यांच्याकडून होतो. पुष्कळांना जे नापसंत असते ते जगाने निंद्य ठरविले असल्याने व्यर्थ जाते.

**लोक आपणासि वोळावे[४]। किंवा आवघेच कोंसळावे। आपणास समाधान फावे। ऐसें करावें।।१५।।**

अनेक लोक आपणास अनुकूल व्हावेत की प्रतिकूल, हे ज्याचे त्याने ठरवावे आणि आपणास ज्यामुळे समाधान लाभेल अशीच वर्तणूक ठेवावी. (वरील ३ ओव्यांमध्ये समाजामध्ये वागताना लोकप्रियता कशी मिळवावी याची जणू सूत्रेच दिली आहेत. विशेषत: लोकशाही जमान्यातील कार्यकर्त्यांना ती चांगलीच मार्गदर्शक आहेत.)

**समाधानें समाधान वाढे। मित्रिनें[५] मित्रि जोडे। मोडितां क्षणमात्रें मोडे। बरेपण ।।१६।।**

आपण दुसऱ्यास समाधान मिळू दिले असता आपणासही ते लाभते. इतरांशी मैत्रीचे गोड संबंध ठेवले असता त्याची परत पावती तशीच मिळते. (चांगले संबंध जुळविण्यास बराच काळ लागतो) पण मैत्रीचे संबंध क्षणामध्ये बिघडणे शक्य असते.

**अहो कांहो, अरे कारें। जनीं ऐकिजेतें किं रे। कळत असतांच कां रे। निकामीपण ।।१७।।**

'अहो' म्हटले असता 'काहो' असे उत्तर येते आणि 'अरे' म्हटल्यास लगेच 'कारे' असे उत्तर येते. हे आपण नित्य ऐकत असताना आपण नादानपणाने का बरे वागावे?

**चातुर्यें श्रृंघारे अंतर। वस्त्रें श्रृंघारे शरीर। दोहिंमधें कोण थोर। बरें पाहा ।।१८।।**

अंतरंग चातुर्याने श्रृंगारले जाते आणि शरीर चांगल्या वस्त्राने शोभिवंत दिसते. या दोहोमध्ये कोणते थोर (किंवा श्रेयस्कर) आहे? याचा आपणच विचार करावा.

**बाह्याकार श्रृंघारिलें। तेणें लोकांच्या हातासि काये आलें। चातुर्यें बहुतांसि रक्षिलें। नाना प्रकारें ।।१९।।**

आपले शरीर बाह्यात्कारे वस्त्रे अलंकार यांनी सजविले तर त्यामुळे लोकांना कोणता लाभ होणार? (अर्थात कोणताही नाहीच. पण उलट आपल्या छानछोकीपणाचा तिरस्कारच होईल काही जण मत्सरही करतील) पण आपल्या शहाणपणाने लोकांचे संकटापासून रक्षण आपणास करता येईल.

**बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावें। समस्तीं बरें म्हणावें। ऐसी वासना ।।२०।।**

आपण चांगले खावे, प्यावे, चांगले वस्त्र नेसावे, पांघरावे, लोकांनी आपणास बरे म्हणावे अशीच वासना सर्वसामान्य माणसाला असते.

**तनें मनें झिजावें। तेणें भलें म्हणोन घ्यावें। उगेंचि कल्पितां, सिणावें। लागेल पुढें ।।२१।।**

पण जो तनमनपूर्वक लोकांसाठी झिजतो त्यालाच लोक 'भला माणूस' म्हणतात. जो उगाच (भलेपण मिळविण्याबद्दलच्या) नुसत्या कल्पनाच करीत बसतो त्याला (भलेपणाचा लाभ न होता उलट) कष्टीच व्हावे लागते. (कोणत्या क्रियेने काय घडते याचे सोप्या शब्दात हे विवेचन वरील दोन ओव्यात केले आहे. आपल्या वासना कोणत्या असतात व त्या फलद्रूप का होत नाहीत हे आपणास कळले पाहिजे.)

**लोकीं कार्यभाग आडे। तो कार्यभाग जेथें घडे। लोक सहजचि वोढे। कामासाठीं ।।२२।।**

लोकांचे एखादे काम अडून राहिले असता ते ज्या माणसामुळे (अडचणी बाजूला होऊन) पूर्ण होऊ शकते त्याच्याकडेच लोक कामासाठी आकर्षित होतात.

**म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें। तेणें आपण सुखी व्हावें। दुसऱ्यास कष्टवितां, कष्टावें। लागेल स्वयें ।।२३।।**

म्हणून दुसऱ्यांना आपण सुखी करावे त्यामुळे आपणासही सुख मिळते, आणि दुसऱ्यास आपण त्रास किंवा पीडा केली तर आपणासही कष्टी व्हावे लागते. (सुख प्राप्तीचा खरा मार्ग या ओवीमध्ये श्रीसमर्थांनी अगदी सोप्या भाषेत सांगितला आहे. सर्व संतांचा हाच अभिप्राय आहे. पुणे येथील साधु वासवानी यांच्या पुतळ्याच्या खाली सुखी होण्याचा हाच सुलभ उपदेश रेखून ठेवला आहे.)

**हें तों प्रगटचि आहे। पाहिल्याविण कामा नये। समजणें हा उपाये। प्राणीमात्रांसी ।।२४।।**

या गोष्टी साहजिक व उघडच आहेत पण त्यांचे नीट परीक्षण केल्याशिवाय पटत नाहीत. त्यासाठी त्या समजून घेणे हाच शहापणाचा मार्ग आहे.

**समजले आणि वर्तले। तेचि भाग्यपुरुष जाले। यावेगळे उरले। ते करंटे पुरुष ।।२५।।**

जे एखादी गोष्ट नुसतीच समजून घेत नाहीत तर त्यानुसार प्रत्यक्ष आचरणात आणतात तेच लोक भाग्यवान होतात; बाकीचे लोक करंटे असतात. (ज्याला काही उमजत नाही तो करंटा नव्हे तो दुर्दैवी म्हटले पाहिजे. पण ज्याला समजते पण हातून प्रत्यक्ष सत्कृत्य होत नाही तोच करंटा होय.)

**जितुका व्याप तितुकें वैभव। वैभवासारिखा हावभाव। समजलें पाहिजे, उपाव-। प्रगटचि आहे ।।२६।।**

माणूस जेवढा व्याप वाढवील तितके त्याचे वैभव वाढते व त्या वैभवासारखा उद्योग हे समजले पाहिजे.

त्याचा उपाय स्पष्ट आहे. (वैभवासाठी उद्योग हवा आणि व्यवहाराचा व्याप जितका वाढेल तितके वैभवही वाढते. सर्व उद्योगपतींचा हाच अनुभव आहे. ''व्याप तितका संताप'' ही म्हण श्रीसमर्थांनी मोडीत काढली आहे असे या ओवीत आढळून येते. हा उपदेश पुरुषार्थाचा आहे. ही शिकवण बालमनावर रूजविली पाहिजे.)

**आळसें कार्येभाग नासतो। साक्षेप होत होत होतो। दिसते गोष्टी कळेना तो। शाहाणा कैसा ।।२७।।**

आळसामुळे कोणताही कार्यभाग बिघडतो पण मनुष्य प्रयत्न करीत राहिला तर क्रमाक्रमाने कार्य यशस्वी होते ही साधी गोष्ट आहे. पण ती ज्याला कळत नाही त्याला शहाणा म्हणता येत नाही.

**मित्रि करितां होतें कृत्य। वैर करितां होतो मृत्य। बोलिलें हें सत्य किं असत्य। वोळखावें ।।२८।।**

मैत्री केली असता कार्य सिद्धीला जाते तर वैर केल्यास आपणावर मरण ओढवते. हे मी सांगतो ते खरे की खोटे, हे आपणच ओळखावे.

**आपणास शाहाणें करूं नेणे। आपलें हित आपण नेणे। जनीं मैत्रि राखों नेणे। वैर करी ।।२९।।**

**ऐसें प्रकारीचे जन। त्यास म्हणावें अज्ञान। तयापासीं समाधान। कोण पावे ।।३०।।**

जे लोक आपणास स्वत:ला शहाणे करू शकत नाहीत, ज्यांना स्वत:चे हित साधणे कळत नाही, लोकांशी स्नेह न राखता जे वैर करतात अशा प्रकारच्या लोकांना अज्ञानी म्हणावे. त्यांच्यापाशी गेल्याने कोणासच समाधान मिळू शकत नाही.

**आपण येकायेकी येकला। सृष्टींत भांडत चालिला। बहुतांमध्यें येकल्याला। येश कैंचें ।।३१।।**

आपण एकटाच राहून एकाएकी लोकांमध्ये भांडण करू लागला तर पुष्कळ लोकांमध्ये त्याला एकल्याला यश कसे मिळू शकेल?

**बहुतांचे मुखीं उरावें। बहुतांचे अंतरीं भरावें। उत्तम गुणीं विवरावें। प्राणीमात्रांसी ।।३२।।**

(यास्तव यशप्राप्तीसाठी) पुष्कळांच्या तोंडी आपले नाव असावे, पुष्कळांच्या अंत:करणामध्ये प्रेमाने भरून राहावे, आपल्या सद्गुणांनी अनेक लोकांना (विवेकाचे) विवरण करावे. (उत्तम मार्ग दाखवावा)

**शाहाणे करावें जन। पतित करावे पावन। सृष्टिमधें भगवद्भजन। वाढवावें ।।३३।।**

लोकांना शहाणे करावे, जे पतित असतील त्यांना पवित्र करावे आणि जगामध्ये भगवंताचे भजन वाढवावे. (स्वकल्याणाचा हा मार्ग जनहिताची साथ करतो. श्रीसमर्थांची भक्ती ही अशा प्रकारे लोकाभिमुख असल्याचे या ओवीतून स्पष्ट होते. भक्ती हा परमार्थाचा एक भाग असला तरी भावात्मक एकात्मता साधण्याची किमयाही त्यामध्ये आहे. म्हणून भक्ताने स्वत:पुरता परमार्थ न करता इतरांना सहभागी करून स्वत:चा उद्धार करावा ही एक मार्गदर्शक सूचना या समासातून मिळते आहे.)

**''क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवीं। द. ११-५-१६ हेच प.दा.अ.'' चे ब्रीद-वाक्य आहे.)**

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास षष्ठ ।।६।।**

## प्रश्नपत्रिका ११ वी (दासबोध दशक १४ समास ६ वा 'चातुर्यलक्षण' वर आधारित)

प्र. १ पुढील चरणार्थ ज्यांमध्ये आहे त्या ओव्या पूर्ण लिहा.

१) अन्यायी तो दैन्यवाणा। २) तेणें आपण सुखी व्हावें। ३) पतित करावें पावन।

४) वोळावे - वश व्हावेत ५) मित्रिनें - मैत्रीने

प्र. २ खालील विधानांचे स्पष्टीकरण या समासातील ओव्यांच्या आधारे थोडक्यात करा.

१) उत्तम गुण अभ्यासितां येती। २) तनें मनें झिजावें। तेणें भले म्हणोन घ्यावें।

प्र. ३ १) भाग्यवान आणि करंटा पुरुष यांचा उल्लेख एका ओवीतच कोठे व कसा आला आहे?

२) लोकसंग्रह का वाढवावा? तो कसा वाढविता येतो?

प्र. ४ पुढील विधानें चूक कीं बरोबर ते या समासातील ओव्यांच्या आधारे सांगा.

१) कामाचा व्याप वाढविला तर वैभव वाढते.

२) बाह्यरूप चांगले असेल तर अंतरंग वाईट असले तरी चालेल.

प्र. ५ १) अभ्यासार्थींना दासबोधाचा प्रसार करण्यासाठी काही 'शिदोरी' उपक्रमातून मिळाली का?

२) अभ्यासार्थींची संख्या वाढविण्याचा यत्न आपण कशा प्रकारे करता? त्यात अडचणी कोणत्या येतात?

३) सज्जनगडावरील अभ्यासार्थींच्या संमेलनामध्ये कोणत्या समस्यांची चर्चा व्हावी, असें आपणास वाटते?

॥ श्रीराम ॥

# स्वाध्याय १२- द. २०-१० : विमळब्रह्मनिरूपण

सारांश : द. २०-१० दासबोधातील अखेरीचा समास म्हणजे जणू काही दासबोध मंदिराचा कळसच आहे. 'दासबोधातील तत्त्वज्ञानाचा सारांश यात ओतला आहे' असे प्रा. बेलसरे यांनी या समासाचा सारांश देताना म्हटले आहे. याच समासातील २६ ते ३७ या ओव्या प्रत्येक अभ्यासार्थीने पाठ करून ठेवाव्या. प्रतिदिनी दासबोध - वाचनानंतर या ओव्या म्हटल्या जातात.

या विलक्षण ग्रंथामधील हा अखेरचा समास आहे. या समासात श्रीसमर्थांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा सारांश ओतला आहे. त्यामधील प्रधान मुद्दे असे : (मुद्दा पहिला) एकटे एक परब्रह्म सर्व ठिकाणी सर्व वस्तूंना सर्व काली व्यापून राहते. (मुद्दा दुसरा) सर्व कल्पनांच्या पलीकडे असलेले परब्रह्म स्थूल नाही, सूक्ष्म नाही, दृश्य नाही, अदृश्य नाही, व्याप्य नाही, व्यापक नाही, ते सर्वस्वी गुणरहित व विकाररहित आहे. (मुद्दा तिसरा) पण ते साधूसंतांचे परम विश्रांति-स्थान आहे. केवळ शुद्धज्ञानदृष्टीने संत त्याचा अनुभव घेतात. म्हणून त्यांना ब्रह्मज्ञानी असे म्हणतात. (मुद्दा चौथा) ही ज्ञानदृष्टी संपादन करण्यास श्रवण व मनन हाच विवेकाचा मार्ग आहे. सतत श्रवणमनन केल्याने ज्ञान होऊन अज्ञान नाश पावते आणि अखेर मनाचे उन्मन होऊन ज्ञानाचे विज्ञान बनते. (मुद्दा पाचवा) अंतर्यामी निश्चळ परब्रह्म बिंबले की समजावे साधन फळास आले, संसार सफळ झाला, मायेचा हिशेब झाला, जन्ममृत्यु शून्याकार झाले आणि अभंग समाधान प्राप्त झाले. (मुद्दा सहावा) वास्तविक ग्रंथ येथे संपला. पण श्रीसमर्थ हेतुपूर्वक अखेर सांगतात की, दासबोध म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचीच वचने आहेत. आत्माराम ग्रंथाचा कर्ता आहे. जो मनापासून अभ्यास करील त्यास दासबोध ब्रह्मज्ञानी बनवून टाकील.

॥ श्रीराम॥

**धरूं जातां धरितां न ये। टाकूं जातां टाकितां न ये। जेथें तेथें आहेच आहे। परब्रह्म तें।।१।।**

(परब्रह्माचे स्वरूप वर्णन करून सांगण्यापलिकडील आहे.) जे धरावें म्हटले तर धरता येत नाही, टाकण्याचा प्रयत्न केला तर टाकताही येत नाही असे हे परब्रह्म जिकडे तिकडे आहे. ते नाही असे कदापि होत नाही.

**जिकडे तिकडे जेथें तेथें। विन्मुख होतां सन्मुख होतें। सन्मुखपण चुकेना तें। कांहीं केल्यां ।।२।।**

सर्वत्र भरून राहिलेल्या परब्रह्माकडून तोंड दुसरीकडे वळविले तर ते तिकडेही समोर येते. त्याचे सन्मुखपण (तोंडासमोर येणे) काहीही केले तरी चुकविता येत नाही.

**बैसलें माणुस उठोन गेलें। तेथें आकाशचि राहिलें। आकाश चहुंकडे पाहिलें। तरी सन्मुखचि आहे ।।३।।**

एखादे बसलेले माणूस उठून गेले तर तेथे आकाश राहतेच. कोठेही पाहिले तरी आकाश सन्मुखच रहाते.

**जिकडे जिकडे प्राणी पळोन जातें। तिकडे आकाशचि भोवतें। बळें आकाशाबाहेर तें। कैसें जावें ।।४।।**

एखादा प्राणी पळून जाऊ लागला तरी आकाश त्याच्या सभोवती राहतेच. मोठ्या प्रयासानेदेखील त्याला आकाशाबाहेर जाता येऊ शकत नाही.

**जिकडे जिकडे प्राणी पाहे। तिकडे तें सन्मुखचि आहे। समस्तांचे मस्तकीं राहे। माध्यानीं मार्तंड जैसा ।।५।।**

प्राणी इकडे तिकडे पहातो पण आकाश त्याला सन्मुखच रहाते, माध्याह्नीचा सूर्य जसा सर्वांच्या मस्तकावरच दिसतो त्याप्रमाणे आकाश सर्वांच्या डोक्यावर असते.

**परी तो आहे येकदेसी[1]। दृष्टांत न घडे वस्तुसी। कांहीं येक चमत्कारासी। देउनी पाहिलें ।।६।।**

पण सूर्याचा हा दृष्टान्त तितकासा समर्पक होत नाही. कारण सूर्य एकदेशी आहे. (कोठेतरी तो डोक्यावर नाही असे स्थळ असणारच) पण ब्रह्माच्या बाबतीत असा प्रकार नाही ते सर्वदेशी आहे. (या ओवीत वस्तू हा शब्द आला आहे. त्याचा अध्यात्मातील अर्थ मात्र परब्रह्म हाच आहे, हे ध्यानात ठेवावे.) सूर्याचे बिंब दुपारी आपल्या माथ्यावर येते तेव्हा ते परिसरातील सर्वांच्याच माथ्यावर असल्यासारखे दिसते हा चमत्कार आहे. म्हणून त्याचा दृष्टान्त समजुतीसाठी देऊन पाहिला इतकेच! पण तो दृष्टान्त तोटका पडतो.

**नाना तीर्थें नाना देसीं। कष्टत जावें पाहाव्यासी। तैसें नलगे परब्रह्मासी। बैसले ठाई ।।७।।**

अनेक देशांमध्ये अनेक पवित्र स्थळे आहेत ती पहावयाची असल्यास त्या देशात जावे लागते पण परब्रह्माच्या दर्शनासाठी तसे करावे लागत नाही. आपण असलेल्या ठिकाणीच त्याचे दर्शन घडते. (अर्थात ज्ञानचक्षूंनाच त्याचे दर्शन घडते.)

**प्राणी बैसोनीच राहातां। अथवा बहुत पळोन जातां। परब्रह्म तें तत्वतां। समागमें ।।८।।**

प्राणी जरी बसून राहिला किंवा खूप दूर पळाला तरी परब्रह्म अगदी त्याच्या बरोबरच राहाते.

**पक्षी अंतराळीं गेला। भोंवतें आकाशचि तयाला। तैसें ब्रह्म प्राणीयांला। व्यापून आहे ।।९।।**

पक्षी अंतराळात उडून गेला असता तो कितीही दूर गेला तरी त्याला आकाश सभोवती असते. त्याप्रमाणे ब्रह्म हे प्राणिमात्रास व्यापून राहिले आहे.

**परब्रह्म पोकळ घनदाट। ब्रह्म सेवटाचा सेवट। ज्यासी त्यासी ब्रह्म नीट। सर्वकाळ ।।१०।।**

परब्रह्म रिकामे आहे पण ते दाट भरलेलेही आहे. (परब्रह्माच्या ठायी अन्य वस्तूच नाही या अर्थाने ते

१) येकदेसी – एकांगी, मर्यादित

(पोकळ किंवा) रिकामे आहे. म्हणूनच ते ब्रह्मतत्त्वानेच दाट भरलेले सुद्धा आहे.) सर्वांचा शेवट ब्रह्मामध्येच होतो. ते सर्वकाळ सर्वांना अगदी सरळ असते.

**दृश्या सबाहे[२] अंतरीं। ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं। आरे त्या विमळाची सरी। कोणास द्यावी ।।११।।**

सर्व दृश्य पदार्थांच्या आत व बाहेर ब्रह्मच असते व ब्रह्मांडाच्या उदरात ब्रह्मच दाटलेले आहे. त्या निर्मळ ब्रह्माची सर कोणासच येत नाही.

**वैकुंठकैळासस्वर्गलोकीं। इंद्रलोकीं चौदा लोकीं। पन्नगादिकपाताळलोकीं। तेथेंहि आहे ।।१२।।**

वैकुंठ (विष्णूंचे निवासस्थान), कैलास (शंकरांचे निवासस्थान), स्वर्गलोक (देवांचे निवासस्थान), इहलोक, परलोक, इंद्रलोक (इंद्राचे निवासस्थान), अन्य चौदा लोक (भूलोक, भुवलोक, स्वर्लोक, महलोक, जनलोक, तपलोक आणि सत्यलोक असे पृथ्वीच्या वरचे व एकेकाचेही वर असलेले सात स्वर्ग आणि अतल, वितल, सुतल, रसातळ, तलातल, महातल व पाताळ असे पृथ्वीखाली व एकमेकांखाली असलेली सात पाताळे मिळून चौदा लोक, असल्याचे शास्त्रात सांगितले आहे. केवळ माहितीसाठी ही नावे दिलीत. ७ स्वर्ग, ७ पाताळ असे १४ लोक इतकेच ध्यानात ठेवावे.) महासर्पांचे पाताळ लोक या सर्वांना ब्रह्म व्यापून आहे.

**कासीपासून रामेश्वर। आवघें दाटलें अपार। परता परता[३] पारावार। त्यास नाहीं ।।१३।।**

काशीपासून रामेश्वरपर्यंत सर्व ठिकाणी अपार ब्रह्म भरले आहे. त्याने व्यापली नाही अशी जागाच नाही.

**परब्रह्म तें येकलें। येकदांचि सकळांसी व्यापिलें। सकळांस स्पर्शोन राहिलें। सकळां ठाईं ।।१४।।**

परब्रह्म हे एकलेच आहे पण त्याने एकदाच सर्वांना व्यापून टाकले आहे. सर्वांना स्पर्श करून ते सर्वांच्या ठिकाणी भरून राहिले आहे. (परब्रह्माच्या व्यापाचे हे तपशीलवार वर्णन त्याची बुद्धीला अनाकलनीय व्याप्ती दर्शविण्यासाठी करण्यात आले आहे. तपशीलामुळे गडद ठसा मनावर उमटण्यास मदत होते. या पुढील ओव्यात ब्रह्माचे आणखीही स्वरूप सांगतात.)

**परब्रह्म पाऊसें भिजेना। अथवा चिखलानें भरेना। पुरामधें परी वाहेना। पुरासमागमें ।।१५।।**

परब्रह्म पावसाने भिजत नाही किंवा चिखलाने ते भरत नाही ते पुरामध्येही राहाते पण पुरासमवेत वाहून मात्र जात नाही.

**येकसरें[४] सन्मुख विमुख। वाम सव्य दोहिंकडे येक। आर्धऊर्ध[५] प्राणी सकळीक। व्यापून आहे।।१६।।**

एकाच वेळी ते मागे पुढे तर असतेच पण उजव्या आणि डाव्या बाजूलाही ते असते. प्राण्यांच्या खाली, वर व सर्व बाजूंनी व्यापून राहाते.

**आकाशाचा डोहो भरला। कदापी नाहीं उचंबळला। असंभाव्य पसरला। जिकडे तिकडे ।।१७।।**

आकाशामध्ये जणू परब्रह्माचा डोह भरला आहे व त्यातील पाणी डोहातील पाण्याप्रमाणे उचंबळत नाही. त्याचा अफाट विस्तार, असंभाव्यपणे सर्वत्र पसरला आहे.

**येकजिनसी गगन उदास। जेथें नाहीं दृश्यभास। भासेंविण निराभास। परब्रह्म जाणावें।।१८।।**

आकाशामध्ये दृश्याचा भास होतो. पण ब्रह्म हे दृश्याचा थोडासाही भास नसलेल्या आकाशाप्रमाणे असते.

---

२) सबाहे अंतरीं – अंतर्बाह्य ३) परता परता – पलीकडे ४) येकसरे – एकाच वेळी ५) आर्ध उर्ध – वरखाली

(परब्रह्माच्या स्वरूपाची थोडीशी तरी कल्पना यावी म्हणून आकाशाशी त्याचे साम्य वरीलप्रमाणे वर्णन करतात.)

**संतसाधुमाहानुभावां। देवदानवमानवां। ब्रह्म सकळांसी विसांवा। विश्रांतिठाव ।।१९।।**

साधू, संत, महात्मे, देव, दानव आणि मानव या सर्वांनाच परब्रह्म हेच खरे विश्रांतिस्थान आहे.

**कोणेकडे सेवटा जावें। कोणेकडे काये पाहावें। असंभाव्य तें नेमावें। काये म्हणोनी ।।२०।।**

कोणत्या बाजूकडे त्याचा आरंभ आहे आणि कोठे शेवट आहे आणि कोठे व कशा प्रकारे ते पहावे हेच कळत नाही. जे मुळातच अमर्याद, कल्पनातीत आहे त्याच्या मर्यादेची कल्पनाच करता येत नाही.

**स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे। कांहीं येकासारिखें नव्हे। ज्ञानदृष्टीविण नव्हे। समाधान ।।२१।।**

परब्रह्म हे स्थूल नाही तसेच सूक्ष्मही नाही. कोणत्याही वस्तूची त्याच्याशी तुलनाच करता येत नाही. ज्ञानदृष्टीनेच त्याचे आकलन होऊ शकते. मात्र तसे झाल्यास खरेखुरे समाधान प्राप्त होते.

**पिंडब्रह्मांडनिरास[६]। मग तें ब्रह्म निराभास। येथून तेथवरी अवकास। भकासरूप ।।२२।।**

पिंड आणि ब्रह्मांड यांचा निरास झाला की परब्रह्म भासरहित होते पण येथून सर्वत्र मुक्त अवकाश प्रत्ययाला येते. (विवेक प्रलयाच्या सहाय्याने पिंड आणि सारे दृश्य विश्व यांना बाधित करणे शक्य झाल्यास केवळ ब्रह्मच सत्यस्वरूप असल्याचा अनुभव साधकाला येतो.)

**ब्रह्म व्यापक हे तो खरें। दृश्य आहे तों हें उत्तरें। व्यापेविण कोण्या प्रकारें । व्यापक म्हणावें ।।२३।।**

ब्रह्म व्यापक आहे परंतु जोवर व्याप्य पदार्थ दृश्य आहे तोवरच या म्हणण्याला काही अर्थ आहे. व्यापून टाकण्याला जर दृश्य पदार्थच नसतील तर परब्रह्माला व्यापक हे विशेषण तरी कसे देता येईल? (वरच्या ओवीतच सांगितल्याप्रमाणे) दृश्याचा निरास झाला तर ब्रह्माला व्यापक कसे म्हणता येईल? व्यापण्यासाठी दुसरा पदार्थ तरी अस्तित्वात हवा. त्याच्या अभावी व्यापक ही संज्ञा अर्थशून्य होते.)

**ब्रह्मासी शब्दचि लागेना। कल्पना कल्पूं शकेना। कल्पनेतीत निरंजना। विवेकें वोळखावें।।२४।।**

ब्रह्माचे वर्णन शब्दात करता येणे संभवत नाही. त्याची कल्पना मानवी मन करू शकत नाही. अशा या परब्रह्माचे स्वरूप कल्पनेपलीकडील आहे. मायाविरहित अशा त्या केवळ स्वरूपाला विवेकाने ओळखावे. (विवेकाचे सामर्थ्य या ओवीत व्यक्त झाले आहे. विवेक शक्तीवर श्रीसमर्थांचा अपार विश्वास आहे.)

**शुद्ध सार श्रवण। शुद्ध प्रत्ययाचें मनन। विज्ञानीं पावतां, उन्मन। सहजचि होतें ।।२५।।**

हरतऱ्हेच्या साधना आहेत पण त्यात सर्वांत अध्यात्मश्रवण ही साधना सारभूत आहे. मनन करून त्या श्रवणाचा अनुभव घ्यावा. त्यावेळी (ज्ञानाचे रहस्य जाणणारा तो मीच ही भावनाही नाहिशी झाल्याने) ज्ञानाचे विज्ञानात रूपांतर होते आणि अशा वेळी (स्वानुभवाच्या आनंदामध्ये) मनाची उन्मनी अवस्था प्राप्त होते. ती अगदी सहजतेने प्राप्त होते.

*** जालें साधनाचें फळ। संसार जाला सफळ। निर्गुण ब्रह्म तें निश्चळ। अंतरीं बिंबलें ।।२६।।**

अशावेळी साधकांच्या साधनेची सिद्धी होते. साधनेला फळ मिळते आणि संसार सफल होतो. निर्गुण परब्रह्म अंतर्यामी स्थिर स्वरूपात विलसते.

६) पिंडब्रह्मांडनिरास – सर्व प्रकृतीचा निरास केल्यानंतर

**हिसेब जाला मायेचा। जाला निवाडा तत्वांचा। साध्य[७] होतां, साधनाचा। ठाव नाहीं ।।२७।।**

मायेमधील जी तत्त्वे आहेत त्याचे स्वरूप समजल्याने त्यांच्या संबंधातील सारा हिशेब संपतो. परब्रह्माचे (सत्यस्वरूपाचे) आकलन किंवा केवल स्वरूपाचे ज्ञान होताच साधनेला अवकाश रहात नाही. (वरच्या मजल्यावर चढण्यासाठी शिडीची योजना केली जाते पण वर पोहोचल्यावर शिडीचे महत्त्व विराम पावते. या दृष्टान्ताने काही अंशाने स्पष्टीकरण होऊ शकते.)

**स्वप्नीं जें जें देखिलें। तें तें जागृतीस उडालें। सहजचि अनुर्वाच्य जालें। बोलतां नये ।।२८।।**

स्वप्नामध्ये जे पाहिले ते भासमान जग जागृतीच्या अवस्थेत विरून जाते ते अगदी सहजपणे अनाकलनीय होते. त्याप्रमाणे आत्मानुभवाच्या अवस्थेत दृश्य विश्वाचे विस्मरण जीवाला होते. (अनिर्वचनीय परब्रह्माच्या अनुभवाच्या अवस्थेची प्राप्ती म्हणजे मानवी संसाराची सफलता, असे श्रीसमर्थांचे प्रतिपादन आहे. त्याचे विवरण या पूर्वीच्या आणि नंतरच्या ओव्यांमध्ये आले आहे.)

**ऐसें हें विवेकें जाणावें। प्रत्ययें खुणेसी बाणावें। जन्ममृत्याच्या नांवें। सुन्याकार।।२९।।**

असे हे सर्व विवेकशक्तीने जाणावे. आत्मानुभवाच्या खुणेवरून स्वत: त्या प्रत्ययाचा अनुभव घ्यावा. मग जन्म व मृत्यूचा हिशेब शून्य होतो आणि साधक सायुज्यमुक्तीप्रत जातो.

(दासबोध हा श्रीसमर्थांच्या अनुभूतीचा ग्रंथ आहे व आपण अनुभूती घेण्याचा ग्रंथ आहे. श्रीसमर्थांची ही अलौकिक देणगी आहे. पण तिचे नाममात्र सुद्धा श्रेय ते घेत नाहीत. पुढील ओवीतच ते म्हणतात.)

**भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें। समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध ।।३०।।**

श्रीरामरायाने भक्तांच्या अभिमानापोटी, त्यांच्यावर कृपा केली. या ग्रंथातील वचने त्या दाशरथी रामाच्या कृपेचीच आहेत. हा दासबोध ग्रंथ म्हणजे त्याच वचनांचा संग्रह होय. (यातील प्रत्येक ओवी प्रासादिक आहे.)

**वीस दशक दासबोध। श्रवणद्वारें घेतां शोध। मननकर्त्यास विशद। परमार्थ होतो ।।३१।।**

या ग्रंथाचे वीस दशक आहेत ते श्रवण करून जो त्यावर चिंतन करील त्या मननकर्त्या साधकाला परमार्थ स्पष्टपणे आकलनात येईल.

**वीस दशक दोनीसें समास। साधकें पाहावें सावकास। विवरतां विशेषाविशेष। कळों लागे ।।३२।।**

वीस दशक आणि दोनशे समास साधकाने स्वस्थपणे पहावे. त्याचे मनाने विवरण केल्यास दरवेळी अधिकाधिक कळू लागेल. विशेष काय अविशेष काय हे समजू लागेल.

**ग्रंथाचें करावें स्तवन। स्तवनाचें काये प्रयोजन। येथें प्रत्ययास कारण। प्रत्ययो पाहावा ।।३३।।**

ग्रंथाचे स्तवन करण्याची प्रथा असते पण या ग्रंथाचे स्तवन करण्याचे प्रयोजनच नाही. या ग्रंथाच्या अनुभवाचा प्रत्यय पहाणे हा उद्देश आहे. प्रधान हेतू तो आहे. (या ओवीचा गर्भितार्थ अधिक खुलाशाने असा मांडता येईल की ग्रंथाची प्रचिती येत नसेल तर त्याचे स्तवन करूनही काही उपयोग नाही आणि प्रचिती येत असेल तर स्तवन करण्याचे प्रयोजनच नाही. इतकी परखड भूमिका श्रीसमर्थांनी घेतली आहे.)

**देहे तंव पांचा भूतांचा। कर्ता आत्मा तेथीचा। आणी कवित्वप्रकार मनुशाचा। काशावरुनी ।।३४।।**

देह हा पंचभूतांचा बनलेला असतो. त्यातील कर्तृत्त्वशक्ती आत्म्याची आहे त्यामुळे (ग्रंथाच्या) कवित्वाचे

७) साध्य होतां – साक्षात्कारानंतर

श्रेय तरी माणसाचे कसे असू शकेल? (अर्थात् ते आत्म्याकडेच जाते की जो ईश्वरस्वरूपच आहे.)

**सकळ करणें जगदीशाचें। आणी कवित्वचि काय मानुशाचें। ऐशा अप्रमाण बोलण्याचें। काये घ्यावें ।।३५।।**

सर्व कर्तृत्व जर जगदीश्वराचे तर कवित्वच तेवढे माणसाचे असू शकेल काय? अशा अप्रमाण (निराधार) बोलण्याचे काय प्रयोजन आहे?

**सकळ देह्याचा झाडा केला। तत्त्वसमुदाव उडाला। तेथें कोण्या पदार्थाला। आपुलें म्हणावें।।३६।।**

जर संपूर्ण देहाचा, विश्लेषण करण्यासाठी शोध घेतला तर त्याच्या घटक तत्त्वांचा समुदाय निघून जातो. त्यातील कोणत्याही तत्त्वावर आपली सत्ता नसते. (त्यामुळेही ग्रंथ निर्मितीचे श्रेय त्याला देता येत नाही.)

**ऐसी हें विचाराचीं कामें। उगेंच भ्रमों नये भ्रमें। जगदेश्वरें अनुक्रमें। सकळ केलें ।।३७।।**

असा हा त्यामागील विचार आहे. ही विचाराची कामे अशी असल्याने माणसाने भ्रमात पडून (वैचारिक) भटकंती करू नये. जगदीश्वराने यथानुक्रमे, पद्धतशीरपणे सगळी रचना केली आहे. (दासबोध हा गुरूशिष्यांचा संवाद आहे. कदाचित कोणा शिष्याने श्रीसमर्थांना म्हटले असेलही की ''स्वामी, आपण किती सुरेख ही ग्रंथरचना केली आहे!'' त्याला उत्तर देण्याच्या निमित्ताने ३४ ते ३७ या ओव्या लिहिल्या गेल्या असाव्यात. पण त्या ओव्यामुळेसुद्धा श्रीसमर्थांचे निर्मळ अंत:करण आपणापुढे उघडे झाले आहे. 'विमलब्रह्म निरूपण' समासाची व ग्रंथाची इतिश्रीसुद्धा मनोहर झाली आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समास दशम।।१०।।**

## प्रश्नपत्रिका १२ वी (दासबोध दशक २० समास १० 'विमलब्रह्मनिरुपण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या या समासातील ओव्या लिहा.

१) जे दृश्याच्या आत, बाहेर तसेच ब्रह्मांडाच्या पोटातही भरलेले आहे, त्या शुद्ध ब्रह्माची सर कोणास येणार?

२) पिंड ब्रह्मांडाच्या निरसनामुळे ब्रह्मच निराभास होऊन राहाते, मग येथून तेथपर्यंतचा विस्तार भकास बनतो.

३) ब्रह्माच्या संबंधात शब्द निरर्थक ठरतात. कल्पना कल्पू म्हणू शकत नाही म्हणून कल्पनातीत ब्रह्माला जाणावयाचे असल्यास विवेक, हेच एक साधन आहे.

प्र. २ दासबोधासारख्या महान ग्रंथाच्या लेखनाचे श्रेय श्रीसमर्थांनी स्वत:कडे घेतले नाही. त्या संबंधात ते स्वत: काय उद्‌गार काढतात ते सविस्तर लिहा.

प्र. ३ दासबोधाचा अभ्यास करण्यासाठी साधकांना कोणत्या सूचना त्यांनी केल्या आहेत?

प्र. ४ 'अ' आणि 'ब' गटामध्ये ओव्यांचे अर्धचरण अव्यवस्थितपणे मांडले आहेत, ते नीट जुळवून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| जालें साधनाचें फळ । | कृपा केली दाशरथीने। |
| समस्तांचे मस्तकीं राहे। | आवघें दाटलें अपार। |
| आकाशाचा डोहो भरला। | माध्यानीं मार्तंड जैसा। |
| ब्रह्मासी शब्दचि लागेना। | संसार जाला सफळ। |
| कल्पना कल्पूं शकेना | कदापि नाहीं उचंबळला। |

प्र. ५ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) 'पत्रद्वारा दासबोध' या उपक्रमात यापुढेही आपण भाग घेणार का?

२) स्वाध्याय लिहिण्यासाठी समास किती वेळा वाचणे आपणास आवश्यक वाटले? प्रत्यक्ष लेखनासाठी किती वेळ लागत असे?

३) दासबोध ग्रंथ हाताशी नसताना वरील प्रश्नपत्रिका आपणास सोडवावयास दिली, तरी उत्तरे लिहू शकाल का?

४) आपण पाठविलेल्या स्वाध्यायाची प्रत आणि त्याचे परीक्षण यांची स्वतंत्र फाईल आपण ठेवली आहे का?

५) आपले सर्व स्वाध्याय (१२ स्वाध्याय) पूर्ण झाले आहेत काय?

# जनकल्याण-कारिणी : समर्थ रामदासकृत श्रीरामप्रार्थना

कल्याण करी रामराया। जनहित विवरी।।धृ।। तळमळ तळमळ होतचि आहे। हे जन हातिं धरी।।१।। अपराधी जन चुकतचि गेले। तुझा तूंचि सांवरी।।२।। कठीण त्यावरी कठीण जालें। आतां न दिसे उरी।।३।। कोठें जावें काय करावें। आरंभिली बोहरी।।४।। दास म्हणे आम्ही केले पावलों। दयेसि नाहीं सरी।।५।।

।। श्री ।।

# ।। आरती दासबोधाची।।

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला। श्रुति शास्त्रग्रन्थ गीता साक्ष संगम केला। महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला। अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला।।१।। जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा। आरति वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा।।धृ०।। नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी। चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी। हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी। बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी।।२।। वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे। नित्यनेम विवरितां स्वयें ब्रह्मचि होये। अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे। ‘कल्याण’ लेखकाचें भावगर्भ हृदईं।।३।।

# ।। आरती श्रीसमर्थांची।।

आरती रामदासा। सद्‌गुरु सर्वेशा। कायावाचामनोभावें। ओवाळूं परेशा।।१।। रामदास मूर्तिमंत। रामचंद्र अवतार। कलियुगीं अवतरोनी। केला भक्तांचा उद्धार।।२।। वैराग्य भक्ति ज्ञान। शांति क्षमा विरक्ती। विवेक सालंकृत क्षमा दया सर्वभूतीं।।३।। सच्चिदानंदघन। रामदास केवळ। दिनकरकृपायोगें। ‘रामचंद्र’ निर्मळ।।४।।

।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु।।।। जय जय रघुवीर समर्थ।।

# दैनंदिन जीवनात दासबोध : स्वयंमूल्यमापन

**अभ्यासार्थी बंधू / भगिनींनो -**

आपण 'दासबोध प्रवेश' स्तराचा अभ्यासक्रम पूर्ण केलात. आता डिसेंबर महिन्यात आपणास स्वाध्याय पाठवावयाचा नाही. पण या महिन्यात आपल्या चिंतनासाठी काही विचार या पाठ्यपुस्तकातून देण्याचा मानस आहे. आपण दासबोधाचा अभ्यास करतो त्याची फलप्राप्ती अशी आहे की, आपल्या आचारात बदल झाला पाहिजे. ''आतां श्रवण केलियांचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।।''

क्रोध, मोह, मत्सर, अहंकार इत्यादि आपले विकार हळूहळू कमी होत जातात का, याबद्दल आत्मपरीक्षण आपले आपण करावे.

माणसाचे मन हा त्याच्या वर्तनामागील सूत्रधार आहे. आपले मन हे आपणास दिसू शकत नाही पण याचा शोध घेण्यासाठी आपणच त्याच्या वर्तनाबद्दल विचार करून त्याचे मूल्यमापन केले पाहिजे. हे काम तसे फारसे अवघड नाही. त्यासाठी एक प्रश्नपत्रिका मा. श्री. वि. वि. चिपळूणकर (माजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य) यांनी सज्जनगडावरील त्यांच्या भाषणात मांडली. १९८२ मध्ये दासबोध अभ्यासार्थींच्या मेळाव्यापुढे समर्थ समाधीमंदिरापुढील अशोक वनातील भाषणात त्यांनी वर्तन-मूल्यमापनाची एक मोजपट्टीच सर्वांपुढे सादर केली.

प्रत्येक प्रश्नाला गुण देताना पुढीलप्रमाणे विचार करावा. आपल्या प्रयत्नांचे प्रमाण मुळीच नसेल तर शून्य गुण, थोडेसे प्रयत्न असतील तर १ गुण; बऱ्यापैकी प्रयत्न असल्यास २ गुण, चांगले प्रयत्न असल्यास ३ गुण आणि भरपूर किंवा समाधानकारक प्रयत्न असल्यास ४ गुण द्यावेत. २५ प्रश्नांच्या एकूण १०० गुणांपैकी किती गुण आपण मिळविता ते आपले आपणच पहावे.

१) प्रात:काळी ६.०० पूर्वी आपण उठतो का?
२) आपण नित्य काही वाचन आणि पाठांतर करतो का?
३) अक्षर आणि वाचन सुंदर करण्याचा यत्न करतो का?
४) आपण नित्य उपासनेकडे मन लावतो का?
५) आपण यत्नशील आहोत का?
६) आपला व्यवसाय दक्षतेने आपण करतो का?
७) आपण अखंड सावधानता कितपत पाळतो?
८) वागण्यात नियमितपणा कितपत पाळतो?
९) आपण आपल्या जिभेवर कितपत (बोलण्यात व आहारात) ताबा मिळवला?
१०) आपण अनासक्तवृत्ती राखतो का?
११) संकटप्रसंगी आपण धीराने वागतो का?
१२) वर्तनात परिमितता राखतो का? (अति सर्वत्र वर्जयेत् ।)
१३) समजले ते आचरणात आपण आणतो का?
१४) आपण बोलल्याप्रमाणे वागतो का?
१५) दुसऱ्याचे अभिष्टचिंतन आपण करतो का?
१६) दुसऱ्याचे दु:ख समजून घेण्याचा प्रयत्न करतो का?
१७) दुसऱ्याचे सुखाने आपणही सुखी होऊ शकतो का?
१८) उत्तम पदार्थ दुसऱ्यास देण्याचा प्रयत्न करतो का?
१९) अनेक लोकांसाठी कष्ट घेतो का?
२०) संकटात मदतीचा हात इतरांना देतो का?
२१) आपले ज्ञान इतरांना देऊन शहाणे करतो का?
२२) उत्तम संगत धरण्याचा प्रयत्न करतो का?
२३) उत्कट आणि भव्य असेल ते स्वीकारण्याचा

प्रयत्न करतो का?

२४) आपला 'मी' पणा कमी करण्याचा यत्न करतो का?

२५) मरणाचे स्मरण आपण नेहमी राखतो का?

वरील सर्व प्रश्न अंतर्देशीय पत्रावर लिहावेत आणि वरील प्रश्नावलीला स्वत:चे स्वत:च विचारपूर्वक गुण द्यावेत आणि स्वयंमूल्यमापन करावे. समीक्षकांकडे अवलोकनार्थ पाठवावे.

मा. चिपळूणकर यांनी असे उद्‌गार काढले की 'हा समाज बदलला पाहिजे; वाढलेला भ्रष्टाचार आणि घसरणारी नीतीमूल्ये यांची चिंता वाटते; असे उद्‌गार सर्वजण काढतात पण आपण स्वत: बदलण्याचा आणि सदाचारी होण्याचा प्रयत्न कितपत करतो यालाच खरे महत्त्व आहे.'

स्वत:च्या वर्तनाचे मोजमाप करणारी मोजपट्टी त्यासाठी एक साधन आहे. तिचा वारंवार उपयोग करून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे सुलभ होऊ शकते याचा अनुभव घ्यावा.

---

# परिशिष्ट

(संत तुकाराम महाराजांच्या (१५९८–१६४९) काही निवडक अभंगांचा परिचय अभ्यासार्थींना व्हावा यासाठी ते अभंग येथे देत आहोत. ह.भ.प. वै. स. के. नेऊरगावकर यानी 'श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा'संपादित केली आहे. येथे अभंगांनंतर दिलेले क्रमांक त्या ग्रंथातील असून अर्थही त्यातूनच घेतला आहे. त्यांचा अंतर्भाव या पुस्तकामध्ये करण्यास अनुमति दिल्याबद्दल 'प्रा. दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङमय प्रकाशन मंडळाचे' आम्ही आभारी आहोत. श्री. अनिरूद्ध कुलकर्णी आणि श्री. सुनील चिंचोलकर यांनी त्यासाठी तत्परतेने सहाय्य केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद. उपर्निर्दिष्ट ग्रंथ ''कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०'' येथे उपलब्ध होऊ शकेल.

## प्रपंच विज्ञान

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ।
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माता ।
भूतदया गाई पशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ।
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ।
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ।। ३९५० ।।

उत्तम प्रकारे व्यवहार करून धन मिळवतो व त्याचा उदास वृत्तीने खर्च करतो, तोच एक उत्तम गतीला जाईल आणि उत्तम जीव खाणीत जन्म घेऊन तेथील भोग भोगील.

जो परोपकार करतो, परनिंदा करीत नाही. ज्याला परस्त्रिया नेहमी माता व बहिणीप्रमाणे आहेत. ज्याच्या ठिकाणी भूतदया आहे. गाईपशूचे पालन करतो आणि वनामध्ये तहानेल्या लोकांसाठी पाण्याची व्यवस्था करतो. शांतीरूप असून कोणाबरोबर वाईट वागत नाही. जो आपल्या वडिलांचे महत्त्व वाढवितो. तुकाराम महाराज म्हणतात, ''अशा (गृहस्थाश्रमी) पुरुषाला परमपदासाठी वैराग्याचे बळ प्राप्त होते; हेच त्याचे फळ आहे.''

## विवेक, नम्रता

भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ।
शिकल्या बोलाचा धरीसील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें ।
हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संतां तैसी ।
सरिता वाहळा गंगे सागरा समान । लेखी तयाहून अधम नाहीं ।
आणीक अमुप होती तारांगणें । रविशशिमानें लेखूं नये ।
तुका म्हणे नाही नम्रता अंगीं । नव्हे तें फिरंगीं कठिण लोह ।। ३९०३ ।।

जसा प्राणी असेल त्याप्रमाणे भूतदया करावी. पण संतांना मात्र सर्वभावाने नमस्कार करावा.

जे शिकला आहेस त्या ज्ञानाचा ताठा धरलास तर यमाच्या मार्गाने तू जाशील. हिरा, परिस, मोहरा, माणिक, हे काही सामान्य पाषाण नव्हेत, त्याप्रमाणे संत हे सामान्य लोकांसारखे मानू नयेत. नदी, ओहळ हे गंगासमुद्र यासारखे मानतो त्याचपेक्षा दुसरा अधम नाही. तारांगणे अमूप असतात पण ती सूर्यचंद्राप्रमाणे समजू नयेत. तुकाराम महाराज म्हणतात, ''ज्याच्या ठिकाणी नरमपणा नाही तो काही तलवार होत नाही. ते कठिण लोखंड आहे''.

## नेटका प्रपंच / दांभिकता नको उसने नको / योग्य प्रयत्न

जायांचे अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ।
घुसळितां ताक कांडिता भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वायां ।
तुका म्हणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ।। ३९१७ ।।

उसने अलंकार आणून अंगावर घातले तर मान मिळत नाही. शोभत नाही. लोक मात्र हसतात.

ताक घुसळले, भूस कांडले, तर काही सार मिळत नाही. सोसलेले क्लेश वाया जातात.

तुकाराम महाराज म्हणतात,''ज्याच्याजवळ स्वत:चे भांडवल नाही त्याचे भीक मागून आणिलेले पेरण्यास उपयोगी होत नाही.

## मर्दाप्रमाणे जगावे, आगळीच कीर्ती मिळावी

पाडावी ते वरी । गांठी धुरेसवें खरी ।
नये मरो लंडीपणें । काय बापुडें ते जिणें ।
लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ।
तुका म्हणे नांवें । कीर्ति आगळीनें ज्यावें ।। ३९५६ ।।

श्रेष्ठाबरोबर खरी गाठ घालावी ते बरे. मनुष्याने भेकडासारखे मरू नये. दीनपणाचे जीवन काय कामाचे?

ज्याला पार नाही असे भांडार लुटावे.

तुकाराम महाराज म्हणतात इतरांपेक्षा कीर्ती व नाव करून आयुष्य जगावे.

## मूर्खता, जाणपण निरूपण

चोरटे काचे निघाले चोरी । आपलें तैसें पारखे घरीं ।
नाहीं नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ।
बुद्धिहीन नये कांहींचि कारणा । तयासवें जाणा तेंचि सुख ।
तुका म्हणे नाही ठाउकें वर्म । तयासीं तें कर्म वोढवलें ।। ३१३८ ।।

चोरटा चोरी करावयास निघाला पण तो होता कच्चा, म्हणून आपल्या घरातल्याप्रमाणे दुसऱ्याच्या घरी वावरू लागला.

तेथे नफा तर मिळालाच नाही पण त्याची नागवण झाली. घरमालकाने त्याचे कान, हात, पाय कापले.

बुद्धी नसली म्हणजे काही उपयोग होत नाही, तसाच त्याच्याबरोबर जो असतो त्याची तशीच स्थिती होते.

तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला कर्माचे वर्म ठाऊक नसते त्याच्या कर्माने त्याचे दुर्दैव ओढवते.

## वर्म जाणून घेऊन कर्मे करा.

निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळही ।
न पाहिजे झाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वायां ।
संपादिलें व्हावे धरिलें तें सोंग । विटंबना व्यंग पडिलिया ।
तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी तो बुद्धि अवकळा ।। ३८०४ ।।
शेवटचा घास (चांगला) गेला म्हणजे जेवण चांगले झाले, हे ठरते. त्याचप्रमाणे सगळ्या व्यवहारांतील आहे.
शेवटपर्यंत सद्बुद्धी पालटता कामा नये, नाही तर केलेली सर्व खटपट फुकट जाते.
जे सोंग घेतले आहे त्याची संपादणी शेवटपर्यंत व्यवस्थित केली पाहिजे त्यात काही व्यंग पडले तर जगांत विटंबना होते.
तुकाराम महाराज म्हणतात, कळून न घेता जो स्वयंपाक (काम) करतो त्याच्या बुद्धीला अवकळा येते. तो मूर्ख आहे.

## सारशोधन

आपणा लागे  काम वाण्याघरीं गूळ । त्याचे याति कूळ काय किजे ।
उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकवी ते कैसी ठायागुणे ।
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दूध काय सेवूं नये ।
तुका म्हणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढूनि घ्यावें ।। ३८३६ ।।
वाण्याचे घरी, आपणास हवा आहे तो गूळ आहे, एवढेच पहावे, त्याच्या जाती कुळाशी काय कर्तव्य आहे?
तुळस उकिरड्यावर वाढली म्हणून त्या जागेमुळे ती टाकून द्यावी काय?
गाय अमंगळही खाते म्हणून तिचे दूध काय पिऊ नये?
तुकाराम महाराज म्हणतात, आपणाला फणसाच्या सालपटाशी काय काम आहे? त्यातील गर काढून घ्यावा.

## अभ्यास, प्रयत्नवाद

साधूनी बचनाग खाती तोळातोळा । आणिकातें डोळां न पाहवे ।
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ।
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।। ३५२८ ।।
अभ्यासाने साध्य करून काही लोक तोळा तोळा बचनागाचे विष खातात. ते इतरांना डोळ्याने पाहवत नाही.
गारूडी अभ्यास करून जिवंत नाग हातात धरतात. पण ते पाहून इतर लोक थरथर कापतात.
सामान्य लोकांना जे असाध्य वाटते, ते परिश्रम केल्याने साध्य होते. कारण अभ्यास मुख्य आहे.

## असद्क्रिया टाळावी

जेणें वाढें अपकीर्ति । सर्वार्थीं तें त्यजावें ।
सत्य रूचे भलेपण । वचन तें जगासी ।
होईजे तें शूर त्यागें । वाउगें तें सारावें ।
तुका म्हणे खोटे वर्म । निंद्य कर्म काळिमा ।। ३९४३ ।।
ज्यामुळे अपकीर्ति वाढतें ते सर्वस्वी टाकून द्यावे.
सत्य बोलणे हे भलेपणाचे आहे. ते जगाला आवडते.
वाउगे आहे ते टाकून द्यावे. त्या त्यागाने शूर व्हावे.
तुकाराम महाराज म्हणतात, ''निंद्यकर्म हा काळिमा आहे; ते खोटे आहे.''

## अज्ञानी भक्ती नको!

अज्ञानाची भक्ति इच्छिति संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा ।
अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैचा ।
अज्ञानाचे कर्म फळीं ठेवीं मन । निष्काम साधन तया कैंचें ।
अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैचें ।
तुका म्हणे जळो ऐसियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ।। १२८६ ।।

अज्ञानी माणसांची भक्ती म्हणजे संपत्ती मिळविण्यासाठी असते. त्यांच्या चित्तामध्ये बोध (ज्ञान) कसा असणार?
अज्ञानी भक्तांनी केलेली पूजा, कामिक भावनेने केली जाते, त्यांच्या ध्यानात देव कोठून येणार?
अज्ञानी भक्तांचे मन कामनिक फळाचे ठिकाणी गुंतलेले असते. त्यांना निष्काम साधन कसले होणार?
अज्ञानी माणसाचे ज्ञान म्हणजे विषयावर सर्व लक्ष. त्याला सनातन ब्रह्म कोठून कळेल?
तुकाराम महाराज म्हणतात, अशा भक्तांचे तोंडाला आग लागो, ते अज्ञानी भक्तीचे बंड वाढवितात.

## सद्विद्या निरूपण

नसावे ओशाळ । मग मानिती सकळ ।
जाय तेथें पावे मान । चालें बोलिलें वचन ।
राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ।
व्हावा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणा ।। ३९१३ ।।

ओशाळ नसले म्हणजे सर्व लोक मानतात. जेथे जाईल तेथे मान मिळतो आणि त्याचा शब्द मानला जातो. कोणाची बाकी ठेवू नये आणि ज्याचे देणे असेल ते देऊन टाका.

तुकाराम महाराज म्हणतात, अंगी चांगले गुण असले म्हणजे लोकांना हवासा वाटतो.

## सावधानता

बरें सावधान । राहावें समय राखोन ।
नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावत अवकळा ।
लाभ अथवा हानी । थोड्यामध्येंच भोवनी ।
तुका म्हणे राखा । आपणा नाहीं तोंचि वाखा ।।३४२१।।

समय पाहून चांगले सावध राहावे. सर्वच वेळा सारख्या नसतात. कांहीमध्ये अवकळा प्राप्त होते. लाभ अथवा हानी होणार हे थोड्या मध्येच सुरुवातीस कळून येते.

तुकाराम महाराज म्हणतात, ‘‘आपल्यावर संकट आले नाही त्या आधीच रक्षण करावे.‘‘

## चित्त-मन शुद्ध करा.

निवडावें खडे । तरी दळण वोजें घडे ।
नाहीं तरी नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ।
निवडावें तन । सेती करावें राखण ।
तुका म्हणे नीत । न विचारितां नव्हे हित ।। ३७६२ ।।

धान्यातील खडे निवडून काढावे लागतात, तरच चांगले दळण घडते. नाहीतर दळण नासून जाते. आळस केला तर हाय हाय उरते (आळसामुळे पश्चात्तापाची वेळ येते.)

शेताचे रक्षण करावयाचे तर तण काढून टाकावे लागते.

तुकाराम महाराज म्हणतात, ''नीतीचा विचार केला नाही तर हित होणार नाही.''

## हिताहिताचा प्रांजल उपदेश

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ।
सत्य तेचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ।
गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ।
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ।
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ।। ३७३१ ।।

दुसऱ्यावर उपकार करणे हे पुण्य आहे आणि त्याला पीडा करणे हे पाप आहे. याशिवाय दुसरे पापपुण्य नाही.
सत्याने वागणे हाच धर्म आहे आणि असत्य कर्म करणे हे पाप कर्म आहे. याशिवाय दुसरे वर्म नाही.
मुखात नामस्मरण असणे हीच श्रेष्ठ गती आहे. नामाला विन्मुख असल्याने अधोगती प्राप्त होते.
संतांच्या संगतीत राहणे म्हणजे स्वर्गवासाचे सुख आहे आणि त्याविषयी उदास होऊन राहणे म्हणजे/हा नरकवास आहे.
तुकाराम महाराज म्हणतात, मी हा हिताचा व घाताचा निवाडा स्पष्ट केला आहे. ज्याला जे योग्य वाटेल ते त्याने तसे करावे.

## दयेचा परखड विचार

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ।
धर्म नीतीचा हा ऐका वेव्हार । निवडीलें सार असार तें ।
पाप त्याचें नांव न विचारी नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ।
तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ।। ३८६२ ।।

भूतांचे रक्षण करणे याचे नाव दया आहे. तसेच दुष्टांचा नायनाट करणे (हीहि दया आहे.)
धर्मनीतीचा विचार (मी सांगतो) तो तुम्ही ऐका. सार व असार याचा विचार करून तो मी निवडून काढला आहे.
नीतीकडे लक्ष न देणे हे पाप आहे. उन्मत्त लोक नेहमी अनीतीने वागतात/वागत असतात.
तुकाराम महाराज म्हणतात, ''धर्म रक्षणाचे काम इतके महत्वाचे आहे की त्यासाठी देवालाही जन्म घेऊन आटाटी करावी लागते.''

## जनी जनार्दन पाहाण्याची इच्छा : त्यासाठी प्रार्थना.

ऐसें भाग्य कईं लाहता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ।
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ।
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ।
विवेकासहित वैराग्याचें बळ । धग्‌धगित ज्वाळ अग्नि जैसा ।
भक्ति नवविधा भाव शुद्ध वरी । अलंकारावरी मुगुट मणी ।
तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ।। ९३७ ।।

सर्व लोक मला ब्रह्मरूप दिसतील असे भाग्य मला केव्हा प्राप्त होणार आहे? असे झाल्यावर माझ्या सुखाला अंतपार राहणार नाही. माझ्या अंतरी आनंदाचे सागर उचंबळून येतील. कामादिकांचा संबंध दूर होईल आणि क्षमा, दया, हे गुण माझे अंगी मूर्तिमंत बिंबतील. अग्नीच्या धगधगणाऱ्या ज्वालेप्रमाणे विवेकासहित वैराग्याचे बळ अंगी यावे. शुद्ध भावाने केलेली नवविधा उत्तम भक्ती घडावी. सर्व अलंकारावर तो मुगुट मण्याप्रमाणे शोभणारा आहे.

तुकाराम महाराज म्हणतात, ''हे नारायणा, ही माझी वासना पुरी करणारा तुझ्याशिवाय कोण आहे?''

# श्री. दा. अ. प्रचारासंबंधात काही मुद्दे

१) **निवृत्त झाल्यावर अभ्यास करू. आता कशाला?**

जीवनाला वळण लावणारा हा ग्रंथ जीवनात जितक्या लवकर अभ्यासला व अवलंबिला जाईल तेवढे जीवनाचे खरे कल्याण साधेल. पदोपदी उपयोगी पडणारी जीवनतत्त्वे यात आहेत.

२) **परीक्षा, प्रश्नोत्तरे यामुळे मनावर ताण पडतो!**

पुस्तके समोर ठेवून उत्तरे द्यायची असतात. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व सोप्या आणि तरीही चिंतनाला प्रवृत्त करणाऱ्या आहेत. समीक्षण हे फक्त मार्गदर्शन करणारे असते. बारा स्वाध्याय झाले की सर्वांसाठी १००% एकच निकाल - उत्तीर्ण.

३) **आध्यात्मिक आनंद, सुख आणि व्यक्तित्व घडविणे यासाठीच दासबोध आहे तर प्रश्नपत्रिका कशाला?**

स्वाध्याय लेखन, समीक्षण हे अभ्यासाला उद्युक्त करणारे साधन आहे. असामान्यांना त्याची गरज नाही हे खरे. सामान्य माणसाच्या बाबतीत आध्यात्मिक विषयाचा घरच्या घरी अभ्यास होणे प्राय: अशक्य आहे. व्यावहारिक अभ्यासासाठीसुद्धा शाळा कॉलेज लागते. मग जीवनातील सूक्ष्म तत्त्वांचे चिंतन स्वत:च्या बळावर कसे करता येईल?

४) **सांसारिक जबाबदारी, नोकरी यातून वेळ मिळत नाही.**

आवश्यकता पटली की सवड मिळू लागते. सुरुवातीला निर्धाराने अभ्यास केलात तर होणाऱ्या व्यक्तिमत्व विकासामुळे सांसारिक जबाबदारीत व नोकरीतही तुम्ही अधिकाधिक जबाबदाऱ्या घेऊ शकाल आणि तरीही आपल्याला स्वत:च्या अभ्यासाला आता वेळ मिळतो आहे असे आपल्या लक्षात येईल. याबाबतीत **वाचन करताना वाचनाचा वेग हा लिहिण्याच्या वेगाएवढा हळू ठेवला तरी खूपच अर्थबोध सहज होऊ शकतो.** हे अभ्यासातील एक अतिशय महत्त्वाचे मर्म आहे. त्याचा अनुभवच घ्यायला हवा.

५) **संकटाला तोंड देण्यास दासबोध समर्थ करतो असे म्हणतात. पण माणसाचा खरा गुरु परिस्थितीच असते. त्यासाठी दासबोध कशाला?**

आपत्ती आल्यावर त्याला तोंड कसे द्यावे हे शिकवणे हा शिकवणीचा नकारात्मक भाग आहे. सावधपणे वागून, प्रसंग ओळखून चातुर्याने आपत्ती टाळण्याचे शिकवणे हा दासबोधातील होकारात्मक भाग महत्त्वाचा आहे. तो दासबोध अभ्यासल्याखेरीज कसा लक्षात येणार? संकटे टाळणे वा संकटाला सामोरे जाणे हा दासबोधातील प्रवृत्ती लक्षण धर्माचा भाग तर आहेच, त्याशिवाय सुखदु:खाच्या पलीकडे असलेल्या आनंदरूप आत्मारामाकडे घेऊन जाणारा निवृत्तीलक्षणधर्मही दासबोधात आहे. त्याचे महत्त्व अनुभवाखेरीज कळणार नाही आणि त्यासाठी अभ्यास पाहिजे.

## 'श्री. दा. अ.' अभ्यासार्थींची संख्या वाढविणाऱ्या प्रसारकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना

आपण नवीन प्रवेशार्थी तयार करीत आहात ही समर्थसेवाच आहे.

१) प्रवेशार्थींनी प्रवेशपत्रिका पूर्णपणे भरली आहे का ते पहावे.

२) ज्या विभागात प्रवेशार्थी रहात आहे त्या उपकेंद्राच्या संचालकांचा पत्ता पोस्टाच्या पाकिटावर त्यांनी लिहिला आहे का ते पहावे.

३) अभ्यासार्थींना पहिला स्वाध्याय लिहिताना थोडेसे मार्गदर्शन करावे.

४) सदर स्वाध्यायाला प्रवेशपत्रिका टाचून ती उपकेंद्राकडे पाठविण्याच्या पाकिटात घातल्यावर दुसऱ्या एका पोस्टाच्या पाकिटावर स्वतःचा पत्ता लिहून घडी करून ते पाकीटही स्वाध्यायाच्या पाकिटातच घालण्यास सांगावे. (ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अनेक अभ्यासार्थी उत्तरासाठी स्वतःच्या पत्त्याचे पाकीट पाठविण्याचे विसरतात.)

५) प्रवेशार्थींना उपकेंद्राकडून समीक्षकांचा पत्ता व अभ्यासार्थी क्रमांक मिळाला किंवा कसे याबद्दलही चौकशी करावी. इतके केल्यावरच आपले कर्तव्य पूर्ण होते.

६) उत्तर भारतातील मराठी माध्यमाचे स्वाध्याय खांडवा उपकेंद्राकडेच पाठविले जावेत. (बरेच स्वाध्याय पुणे केंद्राकडे पाठवले जातात. ही चूक आहे.)

७) प्रवेशार्थींनी प्रवेश घेताना १) प्रवेशपत्रिका २) पहिला स्वाध्याय ३) स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीटच केंद्र संचालकांकडे पाठवायचे आहे. वरील तीनपैकी कोणतीही त्रुटी असेल तर प्रवेश दिला जाणार नाही.

खालील प्रवेश पत्रिका पूर्णपणे भरून पाठवावी. एकतर ती कापून पाठवावी किंवा स्वतःच्या हस्ताक्षरात हाच मजकूर दुसऱ्या कागदावर लिहून पाठविला तरी चालेल. प्रवेशपत्रिकेखाली स्वाक्षरी करण्यास विसरू नये.

---

## 'श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)' प्रवेश पत्रिका

१) पूर्ण नाव : (श्री./ सौ./कु.)......................................................

२) वय................ वर्षे (३) शिक्षण..................... (४) व्यवसाय/नोकरी ..........

५) छंद, ग्रंथवाचन, सामाजिक कार्य ................................................

६) आपला पत्ता ..........................................................................

........................................................................पिन ...............................

७) संपर्कासाठी फोन नंबर (एस. टी.डी. सह) व मो. नं. –

८) आपणांस उपक्रमात कोणी आणले ? नाव ............................ फोन...................

९) अन्य काही कारण .............................................

१०) माझा स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीट आणि १ला स्वाध्याय सोबत पाठविला आहे. मला उपक्रमात प्रवेश देऊन समीक्षकांचे नाव पत्ता कळवावा. मी दरमहा नियमितपणे स्वाध्याय त्यांचेकडे पाठवीन. क.हे.वि.

दिनांक : अभ्यासार्थीची स्वाक्षरी :

दासबोध प्रवेश

''पत्रद्वारा दासबोध'' अभ्यासार्थींसाठी माहिती : १) २१ वर्षांवरील कोणासही या उपक्रमात प्रवेश दिला जातो. (तरुण आणि प्रौढांसाठीच हा अभ्यासक्रम असल्याने वयाची अट महत्त्वाची आहे. ) २) नवीन अभ्यासार्थींना जानेवारी ते १ मार्चपर्यंत प्रवेश दिला जातो. ३) या उपक्रमात भाग घेण्यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. यातील पहिली प्रश्नपत्रिका सोडवून तो स्वाध्याय आपल्या विभागाच्या केंद्रप्रमुखाकडे पाठवावा.

स्वाध्याय कोठे पाठवावा – आपण ज्या विभागात राहतो त्यासाठी असलेल्या खालीलपैकी केंद्राकडेच पहिला स्वाध्याय पाठवावा. उत्तरासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीटच पाठवावे. (अंतर्देशीय किंवा कार्ड पाठवू नये) खालीलपैकी योग्य केंद्राचा पत्ता लिहून स्वाध्याय पाठवावा. सोबत प्रवेशपत्रिका त्यातील मजकूर लिहून पाठवावी. डाव्या कोपऱ्यात प्रेषकाने स्वतःचा पत्ता लिहावा.

कव्हर पान ३

'श्री. दा. अ.' अभ्यासार्थींसाठी काही आवश्यक माहिती

श्रीसमर्थांनी अकराशे मठ भारताच्या निरनिराळ्या भागात स्थापन केले होते. हजारो महंत त्यांनी निर्माण केले आणि शिष्य–प्रशिष्यांच्या सहाय्याने समाजामध्ये प्रचंड संघटन घडवून तेजस्वी नवविचाराने समाज जागृत केला. श्रीशिवछत्रपतींना त्या जनप्रबोधनाचा उपयोग स्वराज्यस्थापनेच्या कार्यात खचितच झाला असेल.

शिवय–समर्थांच्या पश्चातही सुमारे तीस वर्षे त्यांचे तेज सर्वत्र पसरले होते. सूर्यास्तानंतर जसा काही काळ प्रकाश मागे रेंगाळतो, तसा तो प्रकार होता. त्यानंतर मात्र समर्थ संप्रदायाला अवकळा आली ती विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ! त्यानंतर दासबोध ग्रंथ मुद्रित स्वरूपात बाहेर पडला. कै. शंकरराव देव यांनी समर्थांचे वाङ्मय जतन करणे व प्रकाशित करणे यासाठी 'श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर' ही संस्था धुळे येथे काढली. लोकांच्या श्रवणात आणि वाचनात 'समर्थ विचार' येऊ लागले.

सज्जनगड, चाफळ ही देवस्थाने नीट जतन व्हावीत म्हणून श्रीशिवाजी महाराजांनी जमिनी देऊन तरदूद करून ठेवली होती. देवस्थानाची ही आबाळ नष्ट व्हावी म्हणून श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड' या संस्थेची स्थापना स.भ. श्रीधरस्वामी (१९०८–१९७३) यांच्या प्रेरणेने इ.स. १९५०मध्ये करण्यात आली. या कार्यासाठी कै. बाबूराव वैद्य (१८९९–१९५८), कै. माधवराव हिरळीकर (१९०२–१९६५) व कै. दत्तोपंत परांजपे (१८९४–१९८२) यांचे योगदान फार मोलाचे ठरले. यथासमय चाफळ, शिवथरघळ येथेही जीर्णोद्धार कार्ये झाली, पण केवळ वास्तूंचा व तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करण्याने हे कार्य पूर्ण होणार नव्हते. लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये समर्थ रामदासांच्या विचारांचा स्पर्श करण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणे अगत्याचे होते.

'सज्जनगड' मासिकाचे प्रकाशन ही त्या दृष्टीने महत्त्वाची घटना होय. या मासिकामुळे श्रीसमर्थांचा उपदेश, त्यांचे चरित्र आणि त्याचबरोबर श्रीसमर्थ संप्रदाय आणि अन्य संप्रदाय याबद्दलचे विपुल वाङ्मय प्रसिद्ध होऊ लागले. श्रीसमर्थांच्या पादुकांचा दौराही देशभर होऊ लागला. त्यामुळे वाङ्मय प्रसारही होऊ लागला. सज्जनगड मासिकासाठी जसे मा. आण्णाबुवा कालगांवकर (१९०३–१९९९) यांनी चिकाटीने कार्य केले, त्याचप्रमाणे श्री. मारुतीबुवा भोसले रामदासी यांनी प्रचार दौरे काढण्याचे यशस्वी तंत्र हस्तगत केले.

समर्थ–विचार प्रसारांची केवळ लाट येऊन ती विरून जाता कामा नये, तर लोकांच्या अभ्यासाचाच तो एक विषय बनला पाहिजे. या दृष्टीने जे प्रयत्न झाले त्यातच दासबोध अभ्यास वर्गाचे संचालन ही महत्त्वाची

घटना होय. आजवर जो ग्रंथ निव्वळ सोवळ्यात ठेवून त्याची केवळ पारायणेच होत राहीली होती, त्या ग्रंथाचा अभ्यास व्हावा, त्यातील विचारांबद्दल चर्चा व्हावी यासाठी शिवथरघळीमध्ये दा. अ. वर्गाचे संचालन स.भ.धों. वा. तथा आप्पा वैद्य (१९०३-१९९६) यांनी अनेक वर्षे निष्ठेने व चिकाटीने केले.

श्रीसमर्थांच्या विचारातून समाजाची ऐहिक आणि पारमार्थिक उन्नती होते, पण ते विचार जनमानसात सुप्त बीजावस्थेत पडले होते त्यांचेही पुन्हा महाराष्ट्रभूमीत आरोपण होऊन आता तो अक्षय्य वटवृक्ष पुन्हा बहरू लागला आहे. श्रीसमर्थ सेवामंडळाचे विविध उपक्रम म्हणजे त्या वृक्षाच्या जणू पारंब्या आहेत. आपले 'श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)' उपक्रमाचे कार्य हेसुद्धा एका पारंबीप्रमाणे आहे. हजारो आभ्यासार्थी, शेकडो समीक्षक यांच्या चिकाटीच्या परिश्रमाने हा उपक्रम वर्धमान होतो आहे.

या उपक्रमातून अभ्यासार्थींना घरच्या घरी, फावल्या वेळात दासबोधाचा अभ्यास करण्याची सोय अल्पशा खर्चात होऊ शकते आहे, पण अभ्यासार्थींना अधिक मार्गदर्शन व्हावे, यासाठी त्यांनी स्वतःच दासबोध अभ्यास मंडळे गावोगावी चालविण्याची गरज आहे.

''क्रिया करूनी करवावी । बहुताकरवीं ।।''

''श्री.दा.अ.'' उपक्रमाचे ब्रीद-वाक्य वर उद्धृत केले आहे. व्यक्तिगत साधनेइतकाच समर्थांचा भर जनप्रबोधनावर होता. ''सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथे भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।।'' या ओवीचा उत्तरार्ध पहिल्या भागाइतकाच महत्त्वाचा आहे. ईश्वराचे अधिष्ठान असलेली चळवळ व्यक्तीला आणि समाजालासुद्धा तारक आहे. ''आपण करावें करवावें । आपण विरावें विवरवावें । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ।।'' असा समर्थ रामदासांचा आग्रह आहे. पण -

''विवेकें क्रिया आपुली पालटावी । अतिआदरें शुद्ध क्रिया धरावी ।।'' याप्रमाणे आपण स्वतः आचारविचार शुद्ध व्हावयाचे आणि मगच लोकांना तसे बनविण्याचा यत्न करावयाचा, यात सर्वांचेच कल्याण असते. या पाठ्यपुस्तकांचा उपयोग करून ''दासबोधाचा पत्रद्वारे अभ्यास'' आपण करावा आणि मग इतरांनासुद्धा तशी प्रेरणा प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार देण्याचा यत्न करावा. या छोट्या पुस्तकाचा उपयोग करून दासबोध अभ्यासवर्ग घेणे शक्य आहे. या पुस्तकाचे केवळ पारायण नको. अर्थ समजणे अगत्याचे आहे.

''श्री. दा.अ.'' उपक्रमाचा अभ्यासक्रम समर्थ रामदासांच्या खालील सहा बोधवचनांवर आधारित आहे. १) यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।। (श्री समर्थ हृदय पृ. १४६- श्री. शंकर श्रीकृष्ण देव ) २) या शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ।। (दा. २०-८-११) ३) आधीं तें करावें कर्म । कर्ममार्गें उपासना ।। (समर्थ ग्रंथ भांडार, श्री. ल. रा. पांगारकर, पृष्ठ १०६ मानपंचक ३ ओवी १) ४) आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ।। (दा. १२-१-१) ( ५) प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।।(दा. १२-१-९) ६) विवेकाचें फळ तें सुख । (दा. १३-७-२८) हीच सहा बोधवचने मुखपृष्ठावरही दिली आहेत.

सामुहिक अभ्यास - दासबोध अभ्यास मंडळे

सामुहिक वाचन, चर्चा यांनी आवश्यकता बुद्धीच्या वरच्या टप्प्यातील लोकांना वाटत नाही. परंतु पारमार्थिकदृष्ट्या बहुतांश सर्वजण अगदी पूर्वप्राथमिक स्तरावरच असतात. तसेच सामुहिक वाचनात नियमबद्धता येथे व अनेकांच्या अनुभवातून झालेल्या चर्चेमुळे आपली जीवनदृष्टी अधिक विशाल होते. परमार्थात (जीवनाचा खरा अर्थ उलगडण्याचे दृष्टीने) हे उपयोगीच नव्हे तर उलट आवश्यक ठरते.

श्री. दा. अ. उपक्रमातील अभ्यासार्थींनी छोटी दासबोध अभ्यास मंडळे काढावी. दर आठवड्यास किंवा

महिन्यातून दोनदा एकत्र जमून समासाचे वाचन करावे. प्रा. बेलसरे यांचा सार्थ दासबोध, श्री अनंतदास रामदासींचा दासबोध-प्रवेश (याचे पुनर्मुद्रण 'मोरया प्रकाशन' यांनी केले आहे) यांचेही संदर्भ पहावे. यामुळे ओव्यांचे अर्थ चांगले समजतील. सज्जनगड मासिकातही श्री. दा.अ. स्वाध्यायासंबंधी दरमहा लेख असतो, तसेच इतर लेखही चर्चा, मनन, चिंतनाला उपयुक्त असतात. अभ्यास मंडळातील सहभागामुळे स्वाध्याय सोडविणे सोपे होईल. परंतु प्रत्येकाने स्वाध्याय स्वतःच्याच शब्दात लिहावेत म्हणजे अपेक्षित असलेले स्वयंचिंतन घडेल. इतरांची नक्कल करू नये. दरवर्षी बारा स्वाध्याय पूर्ण झाल्यावर समीक्षकांकडून प्रमाणपत्रे दिली जातात त्यामुळे सात्त्विक समाधान मिळते. तीन वर्षांचा अभ्यास पूर्ण झाला की संपूर्ण दासबोध पुन्हापुन्हा क्रमवार, विषयवार वगैरे अभ्यासाची गोडी लागते. दैनंदिन जीवनातही आनंद व समाधान मिळू लागते.

सज्जनगड मासकाची वार्षिक वर्गणी २०० रु. आणि १० वर्षांसाठी वर्गणी १५०० रु. व्यवस्थापक 'सज्जनगड' मासिक, १७९, सोमवार पेठ, 'समर्थसदन', सातारा ४१५ ००२ येथेच पाठवावी. नवीन ग्राहकांनी म. ऑ. कूपनवर 'नवीन ग्राहक' असे लिहावे. जुन्या ग्राहकांनी आपला ग्राहक क्रमांक कूपनवर लिहून सहकार्य करावे. आपला पूर्ण पत्ता लिहावा.

## ''क्रिया करूनी करवावी । बहुताकरवीं ।।'' ।। ११-५-१६ ।।

''श्री.दा.अ.'' उपक्रमाचे ब्रीद-वाक्य वर उद्‌धृत केले आहे. व्यक्तिगत साधनेइतकाच समर्थांचा भर जनप्रबोधनावर होता. ''सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथे भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।।'' या ओवीचा उत्तरार्ध पहिल्या भागाइतकाच महत्त्वाचा आहे. ईश्वराचे अधिष्ठान असलेली चळवळ व्यक्तीला आणि समाजालासुद्धा तारक आहे. ''आपण करावें करवावें । आपण विवरावे विवरवावे । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ।।'' असा समर्थ रामदासांचा आग्रह आहे. पण -

''विवेकें क्रिया आपुली पालटावी । अतिआदरें शुद्ध क्रिया धरावी ।।'' याप्रमाणे आपण स्वतः आचार विचाराने शुद्ध व्हावयाचे आणि मगच लोकांना तसे बनविण्याचा यत्न करावयाचा, यात सर्वांचेच कल्याण असते. या पाठ्यपुस्तकांचा उपयोग करून ''दासबोधाचा पत्रद्वारे अभ्यास'' आपण करावा आणि मग इतरांनासुद्धा तशी प्रेरणा प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार देण्याचा यत्न करावा. या छोट्या पुस्तकाचा उपयोग करून दासबोध अभ्यासवर्ग घेणे शक्य आहे. या पुस्तकाचे केवळ पारायण नको. अर्थ समजणे अगत्याचे आहे.

''श्री. दा.अ.'' उपक्रमाचा अभ्यासक्रम समर्थ रामदासांच्या खालील सहा बोधवचनांवर आधारित आहे.

**१) यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।। (श्री समर्थ हृदय पृ. १४६- श्री. शंकर श्रीकृष्ण देव ) २) या शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ।। (दा. २०-८-११) ३) आधीं तें करावें कर्म । कर्ममागें उपासना ।। (समर्थ ग्रंथ भांडार, श्री. ल. रा. पांगारकर, पृष्ठ १०६ मानपंचक ३ ओवी १) ४) आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ।। (दा. १२-१-१) ( ५) प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।।(दा. १२-१-९) ६) विवेकाचें फळ तें सुख । (दा. १३-७-२८) हीच सहा बोधवचने मुखपृष्ठावरही दिली आहेत.**

### सामुहिक अभ्यास - दासबोध अभ्यास मंडळे

सामुहिक वाचन, चर्चा यांची आवश्यकता बुद्धीच्या वरच्या टप्प्यातील लोकांना वाटत नाही. परंतु पारमार्थिकदृष्ट्या बहुतांश सर्वजण अगदी पूर्वप्राथमिक स्तरावरच असतात. तसेच सामुहिक वाचनात नियमबद्धता येते व अनेकांच्या अनुभवातून झालेल्या चर्चेमुळे आपली जीवनदृष्टी अधिक विशाल होते. परमार्थात (जीवनाचा खरा अर्थ उलगडण्याचे दृष्टीने) हे उपयोगीच नव्हे तर उलट आवश्यक ठरते.

श्री. दा. अ. उपक्रमातील अभ्यासार्थींनी छोटी दासबोध अभ्यास मंडळे काढावी. दर आठवड्यास किंवा महिन्यातून दोनदा एकत्र जमून समासाचे वाचन करावे. प्रा. बेलसरे यांचा सार्थ दासबोध, श्री अनंतदास रामदासींचा दासबोध-प्रवेश (याचे पुनर्मुद्रण 'मोरया प्रकाशन' यांनी केले आहे) यांचेही संदर्भ पहावे. यामुळे ओव्यांचे अर्थ चांगले समजतील. सज्जनगड मासिकातही श्री. दा.अ. स्वाध्यायासंबंधी दरमहा लेख असतो, तसेच इतर लेखही चर्चा, मनन, चिंतनाला उपयुक्त असतात. अभ्यास मंडळातील सहभागामुळे स्वाध्याय सोडविणे सोपे होईल. परंतु प्रत्येकाने स्वाध्याय स्वतःच्याच शब्दात लिहावेत म्हणजे अपेक्षित असलेले स्वयंचिंतन घडेल. इतरांची नक्कल करू नये. दरवर्षी बारा स्वाध्याय पूर्ण झाल्यावर समीक्षकांकडून प्रमाणपत्रे दिली जातात त्यामुळे सात्त्विक समाधान मिळते. तीन वर्षांचा अभ्यास पूर्ण झाला की संपूर्ण दासबोध पुन्हापुन्हा क्रमवार, विषयवार वगैरे अभ्यासाची गोडी लागते. दैनंदिन जीवनातही आनंद व समाधान मिळू लागते.

**सज्जनगड मासिकाची वार्षिक वर्गणी २०० रु. आणि १० वर्षांसाठी वर्गणी १५०० रु. व्यवस्थापक 'सज्जनगड' मासिक, १७९, सोमवार पेठ, 'समर्थसदन', सातारा ४१५ ००२ येथेच पाठवावी. नवीन ग्राहकांनी म. ऑ. कूपनवर 'नवीन ग्राहक' असे लिहावे. जुन्या ग्राहकांनी आपला ग्राहक क्रमांक कूपनवर लिहून सहकार्य करावे. आपला पूर्ण पत्ता लिहावा.**

---

**: अधिक माहितीसाठी पुणे संपर्क :**

**श्री. दिलीप कोठारी** : मो. ०९८२२३७५८६६

'श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)' प्रकाशन विभाग, श्रीसमर्थ सेवामंडळ, सज्जनगड, सातारा ४१५ ०१३ यांच्या वतीने प्रकाशित.

## ‘श्री. दा. अ.’ अभ्यासार्थींसाठी काही आवश्यक माहिती

श्रीसमर्थांनी अकराशे मठ भारताच्या निरनिराळ्या भागात स्थापन केले होते. हजारो महंत त्यांनी निर्माण केले आणि शिष्य-प्रशिष्यांच्या सहाय्याने समाजामध्ये प्रचंड संघटन घडवून तेजस्वी नवविचाराने समाज जागृत केला. श्रीशिवछत्रपतींना त्या जनप्रबोधनाचा उपयोग स्वराज्यस्थापनेच्या कार्यात खचितच झाला असेल.

शिव-समर्थांच्या पश्चातही सुमारे तीस वर्षे त्यांचे तेज सर्वत्र पसरले होते. सूर्यास्तानंतर जसा काही काळ प्रकाश मागे रेंगाळतो, तसा तो प्रकार होता. त्यानंतर मात्र समर्थ संप्रदायाला अवकळा आली ती विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ! त्यानंतर दासबोध ग्रंथ मुद्रित स्वरूपात बाहेर पडला. कै. शंकरराव देव यांनी समर्थांचे वाङ्मय जतन करणे व प्रकाशित करणे यासाठी ‘श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर’ ही संस्था धुळे येथे काढली. लोकांच्या श्रवणात आणि वाचनात ‘समर्थ विचार’ येऊ लागले.

सज्जनगड, चाफळ ही देवस्थाने नीट जतन व्हावीत म्हणून श्रीशिवाजी महाराजांनी जमिनी देऊन तरतूद करून ठेवली होती. देवस्थानाची ही आबाळ नष्ट व्हावी म्हणून ‘श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड’ या संस्थेची स्थापना स.भ. श्रीधरस्वामी (१९०८-१९७३) यांच्या प्रेरणेने इ.स. १९५० मध्ये करण्यात आली. या कार्यासाठी कै. बाबूराव वैद्य (१८९९-१९५८), कै. माधवराव हिरळीकर (१९०२-१९६५) व कै. दत्तोपंत परांजपे (१८९४-१९८२) यांचे योगदान फार मोलाचे ठरले. यथासमय चाफळ, शिवथरघळ येथेही जीर्णोद्धार कार्ये झाली, पण केवळ वास्तूंचा व तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करण्याने हे कार्य पूर्ण होणार नव्हते. लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये समर्थ रामदासांच्या विचारांचा स्पर्श करण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणे अगत्याचे होते.

‘सज्जनगड’ मासिकाचे प्रकाशन ही त्या दृष्टीने महत्त्वाची घटना होय. या मासिकामुळे श्रीसमर्थांचा उपदेश, त्यांचे चरित्र आणि त्याचबरोबर श्रीसमर्थ संप्रदाय आणि अन्य संप्रदाय याबद्दलचे विपुल वाङ्मय प्रसिद्ध होऊ लागले. श्रीसमर्थांच्या पादुकांचा दौराही देशभर होऊ लागला. त्यामुळे वाङ्मय प्रसारही होऊ लागला. सज्जनगड मासिकासाठी जसे कै. आण्णाबुवा कालगांवकर (१९०३-१९९९) यांनी चिकाटीने कार्य केले, त्याचप्रमाणे श्री. मारुतीबुवा भोसले रामदासी यांनी प्रचार दौरे काढण्याचे यशस्वी तंत्र हस्तगत केले.

समर्थ-विचार प्रसारांची केवळ लाट येऊन ती विरून जाता कामा नये, तर लोकांच्या अभ्यासाचाच तो एक विषय बनला पाहिजे. या दृष्टीने जे प्रयत्न झाले त्यातच दासबोध अभ्यास वर्गाचे संचालन ही महत्त्वाची घटना होय. आजवर जो ग्रंथ निव्वळ सोवळ्यात ठेवून त्याची केवळ पारायणेच होत राहीली होती, त्या ग्रंथाचा अभ्यास व्हावा, त्यातील विचारांबद्दल चर्चा व्हावी यासाठी शिवथरघळीमध्ये दा. अ. वर्गाचे संचालन कै. धों. वा. तथा आप्पा वैद्य (१९०३-१९९६) यांनी अनेक वर्षे निष्ठेने व चिकाटीने केले.

श्रीसमर्थांच्या विचारातून समाजाची ऐहिक आणि पारमार्थिक उन्नती होते, पण ते विचार जनमानसात सुप्त बीजावस्थेत पडले होते त्यांचेही पुन्हा महाराष्ट्रभूमीत आरोपण होऊन आता तो अक्षय वटवृक्ष पुन्हा बहरू लागला आहे. श्रीसमर्थ सेवामंडळाचे विविध उपक्रम म्हणजे त्या वृक्षाच्या जणू पारंब्या आहेत. आपले ‘श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)’ उपक्रमाचे कार्य हेसुद्धा एका पारंबीप्रमाणे आहे. हजारो अभ्यासार्थी, शेकडो समीक्षक यांच्या चिकाटीच्या परिश्रमाने हा उपक्रम वर्धमान होतो आहे.

या उपक्रमातून अभ्यासार्थींना घरच्या घरी, फावल्या वेळात दासबोधाचा अभ्यास करण्याची सोय अल्पशा खर्चात होऊ शकते आहे, पण अभ्यासार्थींना अधिक मार्गदर्शन व्हावे, यासाठी त्यांनी स्वतःच दासबोध अभ्यास मंडळे गावोगावी चालविण्याची गरज आहे.